RNI. MAHMUL02805/2010/33461

IMPACT FACTOR 6.20

ISSN 0976-0377

International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

## REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XXV, Vol. V
Year - 13 (Half Yearly)
(July 2021 To Dec. 2021)

**Editorial Office :**
'Gyandeep',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 - 241913
09423346913,09637935252,
09503814000,07276301000

**Website**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com
drkamblebg@rediffmail.com

**Publisher :**
Jyotichandra Publication,
Latur, Dist. Latur.-415331
(M.S.) India

Price: ₹ 200/-

**CHIEF EDITOR**

Dr. Balaji G. Kamble
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Latur, Dist. Latur (M.S.)
Mob. 09423346913, 9503814000

**EXECUTIVE EDITORS**

Dr. Aloka Parasher Sen
Professor, Dept. of History & Classics,
University of Alberta, Edmonton,
(CANADA).

Dr. Laxman Satya
Professor, Dept. of History,
Lokhevan University, Loheavan,
PENSULVIYA (USA)

Dr. Huen Yen
Dept. of Inter Cultural
International Relation
Central South University,
Changsha City, (CHAINA)

Bhujang R. Bobade
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Insititute,
Malakpet, Hyderabad. (A.P.)

Dr. Omshiva V. Ligade
Head, Dept. of History,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur. (M.S.)

Dr. Sadanand H. Gone
Principal,
Ujwal Gramin Mahavidyalaya,
Ghonsi , Dist. Latur. (M.S.)

Dr. G.V. Menkudale
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

Dr. Balaji S. Bhure
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**DEPUTY-EDITORS**

Dr. S.D. Sindkhedkar
Vice Principal
PSGVP's Mandals College,
Shahada, Dist. Nandurbar (M.S.)

Veera Prasad
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, (A.P.)

Dr. C.J. Kadam
Head, Dept. of Physics
Maharashtra Mahavidhyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

Johrabhai B. Patel,
Dept. of Hindi,
S.P. Patel College,
Simaliya (Gujrat)

**CO-EDITORS**

Sandipan K. Gaike
Dept. of Sociology,
Vasant College,
Kej, Dist. Beed (M.S.)

Dr. Shivaji Vaidya
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani,Dist. Parbhani.(M.S.)

Ambuja N. Malkhedkar
Dept. of Hindi
Gulbarga, Dist. Gulbarga,
(Karnataka State)

Dr. Shivanand M. Giri
Dept. of Marathi,
B.K. Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

RNI MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue:XXV,Vol.V, July 2021 To Dec. 2021

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Changes in Indian Banking System and Adopting Technology<br>**Sunil Wasudeo Mamalkar** | 1 |
| 2 | Marketing of new Product with the help of Patent and Copyright<br>**Vasanta Vithoba Aru** | 5 |
| 3 | Pesticides Effects in Indian Agriculture<br>**Sunil V. Devhade** | 10 |
| 4 | Social Consciousness in Anita Desai's Voices in the City<br>**Dr. M. S. Mane** | 18 |
| 5 | Socio-Cultural study of Vijay Tendulkar's "Silence! The Court is in session."<br>**Bhimrao S. Jambharunkar** | 23 |
| 6 | The Identity of Women in African-American Society: Gloria Naylor's The Women of Brewster Place<br>**Sanjaykumar B. Deshmukh** | 28 |
| 7 | Application of Intellectual Property Rights in Libraries<br>**Nandkishor Gaikwad** | 36 |
| 8 | A Cultural Study of the Chambhar community<br>Dr. Yogesh Singh, Dr. Dinkar Umberkar, Snehal<br>**Rameshwar Khandare** | 43 |
| 9 | भीष्म साइनी के उपन्यासो में व्यक्त पारिवारिक समस्याएँ<br>डॉ. के. बी. गिते | 50 |
| 10 | ग्रामीण भागातील महिला बचतगट व स्वावलंबन<br>**डॉ. जितेंद्र पांडुरंगराव काळे** | 55 |
| 11 | दलित चळवळीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान<br>**प्रकाश सुभाषराव राठोड** | 60 |


PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

RNI MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue : XXV, Vol. V, July 2021 To Dec. 2021

# ग्रामीण भागातील महिला बचतगट व स्वावलंबन

**डॉ. जितेंद्र पांडुरंगराव काळे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
मुक्रमाबाद, जि. नांदेड

10 Research Paper -Economics

**प्रस्तावना -**

ग्रामीण क्षेत्रातील आर्थिक विकासाचा अभ्यास करत असताना खऱ्या अर्थाने महिला चा आर्थिक विकासात सहभाग आहे हे अभ्यासावे लागते.महिलांनी आपल्या विकासासाठी बचतगट याच्या माध्यमातून स्वतःचे स्वावलंबन केले आहे हे निदर्शनात येते. महिलांमधील कर्मशक्ती सामर्थ्यांचे बळखटीचे पंख देणारी संस्था म्हणजे बचत गट म्हणून ओळखले जाते.प्रत्येक घराच्या दृष्टीने आजच्या काळात आर्थिक नियोजन आवश्यक आहे. आर्थिक नियोजन हे बचतीपेक्षा कमालीचे असते. परंतु सर्वसामान्य वर्गाचा विचार करता लहान-लहान बचत ही बचतीची कल्याणकारी योजना म्हणून ओळखली जाते.

बचत गटातील सुरुवात बांग्लादेशातील चितगाव विद्यापीठातील अर्थशास्त्रज्ञ व ग्रामीण बँकेचे प्रणेते व नोबेल विजेते डॉ. महंमद युनुस यांनी स्वयंसहाय्यता गटाची प्रथम सुरुवात केली आहे. सन १९८३ साली ग्रामीण बँक प्रकल्पाचे रुपांतर ग्रामीण बँकेत करून लहान लहान गटांना बँकेच्या मुख्य व्यवहारात आणले तेच गट आज बचतगट, स्वयंसाहाय्यगट, लघुवित्त रोजगार गट या नावाने वाटचाल करीत आहेत.

भारत देशात सर्व प्रथम कर्नाटक राज्याने सन १९८६-८७ मध्ये बचत गटाची चळवळ उभी केली. सन २००१ पासून भारत देशात महिलांच्या आर्थिक क्रांतीसाठी सुरुवात झाली. देशातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात लोक वास्तव्य करतात, विविध समस्यांना तोंड देत स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी विविध मार्गाचा अवलंब करतात त्यांने मुख्य बचत गट हा एक मार्ग दिसून येतो.

भारत देशात सहकारी चळवळ भारतीय पहिला कायदा १९०४ पासून पतसंस्था निर्माण झाल्या नरंतु एक उद्देशीय संस्था असल्याने भारतीय सहकार दुसरा कायदा १९१२ अस्तित्वात आला व बहुउद्देशीय धोरण राबवले जाऊ लागले यातच ग्रामीण क्षेत्राच्या विकासाला चालना मिळाली.



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

ग्रामीण भागात राहत असलेल्या महिला वर्गाच्या मदतीलना बचत गट हा कामी आला. महिला वर्गाने बचत गटाच्या माध्यमातून स्वतःचा विकास करण्यासाठी ग्रामीण भागातील महिला वर्गाने व त्याकाळच्या सरकारनेही पुढाकार घेऊन महिलांचा विकास केला आहे.

**व्याख्या -**

"समान गरजा असणाऱ्या स्वइच्छेने एकत्रीत येऊन सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या लोकांना सामुहिक एकत्रीकरणाला स्वयंसहाय्यता गट असे म्हणतात."

"बचत गट म्हणजे निश्चित स्वरुपाचे सामुहिक तयार केलेली लोकांची संघटना होय."

**उद्दीष्टे :**

१) महिला बचत गटाची वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.

२) ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक समृद्धीचा अभ्यास करणे.

३) महिला बचत गटाच्या माध्यमातून विविध उद्योगसमुह स्पष्ट करणे.

४) महिला बचत गटासमोरील समस्याचा आढावा घेणे.

**संशोधनाची पद्धती -**

प्रस्तु शोध निबंधासाठी द्वितीयक सामग्रीचा वापर केला आहे. यामध्ये संदर्भग्रंथ, संशोधन प्रबंध, मासिके, वर्तमानपत्रे व इंटरनेटचा वापर केला आहे.

**गृहितके :**

१) महिलांच्या आर्थिक विकासात बचत गट हा महत्त्वाची भूमिका बजावतात.

२) बचत गटामुळे ग्रामीण भागातील महिला स्वकृत्वावर स्वावलंबी बनल्या आहेत.

३) महिलामध्ये नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, आर्थिक व्यवहारात सहभाग वाढला आहे.

**महिला बचत गटाची वैशिष्ट्ये :**

१) सन १९९८ पासून भारत सरकारने आपल्या अर्थसंकल्पात बचत गटांना कर्ज वाटपाबाबत तरतूद केली आहे.

२) बचत गटांना अल्प व मध्यम काळासाठी अल्प व मध्यम स्वरूपाचा कर्जपुरवठा कमी व्याजदराने केला जातो.

३) केंद्र व राज्य सरकारने विविध योजना राबविल्या आहेत.

४) समता, समानता, बंधुभाव, एकात्मता, स्वावलंबन, समुहाने यातत्त्वाची वाढ झाली आहे.

ग्रामीण भागातील महिलांचा आर्थिक समृद्धीचा अभ्यास करणे -

१) व्यवसायात ठसा - लघुउद्योग, कुटीरउद्योग, हस्तकला उद्योग, कौशल्य विकास मसाल्याचे

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

पदार्थ, पीठ गिरण्या, पापड निर्मिती इतर कामातून ग्रामीण भागात महिला व्यवसायात ठसा उमटावत आहेत.

**२) शेतीत महिलांची मोलाची साथ -**

शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात महिला वर्ग कामगिरी बजावत असलेले दिसून येते. जवळपास शेतीतील सर्वच कामे महिला सक्षमपणे करित आहेत. पारंपारीक शेती व आधुनिक शेती देखील महिला करत आहेत.

**३) सामाजिक व राजकीय क्षेत्रात नावलौकिक -**

स्वयंसेविका माध्यमातून सामाजिक व राजकारणाच्या माध्यमातून विविध पदापर्यंत महिलांनी कामगिरी करीत आहेत.

महिला बचत गटाच्या माध्यमातून विविध उद्योग समुह स्पष्ट करणे

१) दुग्ध व्यवसाय - पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यामध्ये छोट्याशा गावात कमी लोकसंख्या असलेल्या भागात मानकखाडी येथील सरस्वती महिला बचत गटाने दुग्ध व्यवसाय सुरु केला आहे.

२) रेशीम उद्योग - खामगाव तालुका शहराजवळ असलेल्या खुटाला खुर्द येथील कलांगण महिला बचतगट यांनी रेशीम उद्योग सुरु केला आहे. कच्चा माल खरेदी करून पक्का माल तयार करणे व विकणे यातुन त्यांची आर्थिक प्रगती केली आहे.

३) मोत्याची शेती -आर्णी तालुक्यातील लोणी गावामधील जय दुर्गामाता महिला बचत गटाने मोत्याची शेती केली आहे. या गटात १२ महिला आहेत. मानव विकास मशिन व महिला आर्थिक विकास महामंडळाकडून आर्थिक मदत घेतली आहे.

शेतात मुवलक पाणी असल्याने १२ फूट खोल व १२ फूट लांब २ खड्डे घेतले व एक दोरीची जाळ्या तयार करून शिंपले त्यात सोडले त्यात दोन्ही खड्यात २५०० शिंपले आहेत यात हजार मोत्याचे उत्पादन घेतले आहे मोत्याला सरासरी ३०० रु. ते ९०० रु. भाव मिळेल.

४) नांदेड जिल्हा बचतगट - जिल्ह्यातील महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून पुदिनाशेती, फुलशेती, भाजीपाला शेती, शेळीपालन, दुग्धव्यवसाय आदी पूरक व्यवसाय सुरु केले आहे. महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत नांदेड जिल्ह्यात तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सबलीकरण योजना राष्ट्रीय नागरी योजना, उत्पादने विका अभियान, वॉटर शक्ती अभियान, राबविण्यात येतात.

आजवर जिल्ह्यात ३ हजार ६०५ महिला गट स्थापन केले आहे. महिला सदस्य संख्या ३९

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

हजार २१० आहे, आजवर १९ कोटी ६ लाख रु. बँकेत बचत आहेत. ११९ कोटी ५१ लाख कर्ज देवाण घेवाण आहे. बँकेकडून ८३ कोटी ४० लाख कर्ज उपलब्ध केले आहे. बँकेचे कर्जपरतफेड प्रमाण ९९ टक्के आहे.

**महिला बचत गटातील समस्या -**

१) महिला बचत गटातील महिला सर्व शिक्षीत असतातच असे नाही.

२) ग्रामीण भागातील महिला बचत गटाला अपूरे भांडवल हि समस्या भेडसावते.

३) आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव.

४) शासकीय मदत व अनुदान प्राप्त घेत नाही.

५) नविन कौशल्याचा अभाव.

६) शिक्षण व प्रशिक्षणाचा अभाव

७) एकाधिकार शाहितून तंटे-भांडणे-वादविवाद निर्माण होतात.

८) ग्रामीण भागात उत्पादन केलेल्या मालाचा योग्य बाजार पेठेचा अभाव.

९) भांडवला अभावी व्यवसाय बंद करतात.

१०) बाजार पेठेतील खुल्या स्पर्धेत टिकणे शक्य होत नाही.

११) ग्रामीण भागात वाहातूक-दळणवळण सोयीचा अभाव.

१२) तंज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शनाचा अभाव.

**निष्कर्ष -**

ग्रामीण भागातील महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून स्वावलंबी बनण्याचा मार्ग निवडला आहे व त्यात त्यांनी आपले यश मिळवले आहे. बचत गटाच्या माध्यतून सर्वसामान्य कुटुंबातील महिलांनी पुढाकार घेऊन आर्थिक समस्यावर बचत गट हा एक उपाय आहे ही हे सिद्ध केले आहे. ग्रामीण भागात बचत गट स्थापन करून ग्रामीण भागातच बचत गटाच्या माध्यमातून व्यवसाय उद्योग निर्माण करणे व चालवणे महत्त्वपूर्ण कार्ये करत आहेत. महिला बचत गटामुळे महिलाचा विकास झाला आहे.

१) ग्रामीण भागातील महिलांची आर्थिक सुधारणा झाली आहे.

२) ग्रामीण भागात लघुउद्योग, कुटीर उद्योग, हस्तकला उद्योग, मसाल्याचे पदार्थ, शेतीपुरक व्यवसाय इ. महिला बचत गटामुळे सुरु झाले आहेत.

३) ग्रामीण भागातील महिलांना व्यक्तीमत्व विकासाला वाव मिळाला.

४) ग्रामीण भागातील महिलामध्ये सामाजिक एकात्मता निर्माण झाली.

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

५) ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळाली.

६) दारिद्र्याचे प्रमाण कमी झाले.

७) बेकारीचे प्रमाण कमी होऊन नवीन रोजगाराच्या संधीत वाढ झाली.

८) शेती क्षेत्राच्या विकासाला चालना मिळाली.

९) बँकांच्या बचतीत वाढ झाली.

१०) राजकारणात नेतृत्व करण्याची संधी निर्माण झाली.

## संदर्भ सूची :-


१) महिला बचतगटात झालेल्या परिवर्तनांचा एक आर्थिक अभ्यास प्रकल्प

२) यशस्वामीनी - यशोदा फाऊंडेशन

३) भारतीय प्रतिभूमी और विनिमय बोर्ड

४) योजना मासिक

५) इंटरनेट, वृत्तपत्रे, मासीके, साप्ताहिके इ.

६) मार्गदर्शिका - चौधरी पब्लिकेशन

७) बचत गट - डॉ. प्रमोज जोगदेव

८) बचत गटासाठी कार्यक्षम व्यवस्थापन
प्रशिक्षण पुस्तिका - ज्ञान प्रबोधिनी पुणे.

९) महिला स्वयंसहाय्यता बचत गट - प्रा. ष्म. यू. मुलानी


PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded

2021-2022

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 6.10 ISSN 2229-6190

International Registered & Recognized
Research Journal Related to Higher Education for Social Sciences

# SOCIAL GROWTH

UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XXIII, Vol. VI
Year - XII (Half Yearly)
(Nov. 2021 To April 2022)

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** - (02382) 241913
09423346913 / 09503814000
09637935252 / 07276301000

**Webside**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**Price : ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College, Latur, Dist. Latur (M.S.) India.

**EDITOR**

**Robert Huet**
Professor, Dept. Of History,
University of Lowa (USA).

**Dr. Arun Tawar**
Head Dept. of Economics,
D.S.M. College,
Parbhani, Dist. Parbhani (M.S.)

**Michael Strayss,**
Director,
International Relation & Diplomacy,
Schiller International University,
Paris. (France)

**Verena Blechinger Talcott**
Director, Dept. of History
& Cultural Studies,
University of Barlin.
Barlin. (Germany)

**EXECUTIVE EDITORS**

**B.R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Insititute,
Hyderabad. (A.P.)

**Dr. Nilam Changani**
Dept. of Economics,
SKNG Mahavidyalaya,
Karanja Lad, Dist. Washim(M.S.)

**Dr. Sadanand H. Gone**
Principal,
Ujwal Gramin Mahavidyalaya,
Ghonsi, Dist.Latur. (M.S.)

**Dr. Laxman Satya**
Professor, Dept. of History
Lokhevan University, Lokheavan,
Pensulviya, (USA)

**DEPUTY-EDITORS**

**Dr.Santosh Kute**
Chairman, BOS,Economics,
SGB Amravati University,
Amravati, Dist. Amravati (M.S.)

**Dr. Karamsingh Rajput**
Head Dept. of Economics,
Lokmanya Tilak College,
Vani, Dist. Yavatmal (M.S.)

**CO-EDITORS**

**Prof. Veeraprasad**
Dept. of Political Science & P. A.,
S.K. University,
Anantpur (A.P.)

**Dr. Babasaheb Gore**
Principal,
Smt. Sushiladevi Deshmukh Mahila
College, Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. P.M. Shinde**
Head, Dept. of Sociology,
D.S.M. College,
Jintur, Dist. Parbhani. (M.S.)

**Dr. Baban D. Todkar**
Head, Dept. Defence Study
New Arts, Sci.& Comm. College
Ahmednagar, (M.S.)

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

RNI MAHMUL/62937/2010/35848 IMPACT FACTOR-6.10 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH
Issue:XXIII, Vol.VI, Nov. 2021 To April 2022

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | Total Quality Management in Library<br>**Pandurang C. Gadekar** | 1 |
| 2 | अर्थार्जनासह कोशल्य प्राप्तीचा गुरुमंत्र - गांधी विचार<br>**एन. व्ही. कदम** | 9 |
| 3 | वस्त्रोद्योग क्षेत्रात रोजगार व सर्वसमावेशक विकासाच्या संधी<br>**डॉ. निलम छंगाणी** | 17 |
| 4 | भारतातील श्रमिका समोरील आव्हाने<br>**डॉ. रुपाली कांबळे** | 22 |
| 5 | छत्रपती शाहू महाराजाचे शेतीविषयक विचार<br>**डॉ. गजानन सोनेने** | 27 |
| 6 | मानव विकास निर्देशांक आणि भारत<br>**डॉ. जितेंद्र पांडुरंगराव काळे** | 32 |
| 7 | जागतिक तापमान वाढ एक पर्यावरणी समस्या<br>**डॉ. माया पुंडलिकराव सरवदे** | 42 |
| 8 | स्थानिक स्वराज्य संस्थेची वाटचाल<br>**डॉ. आनंद शिंदे** | 50 |
| 9 | वृध्द महिलांच्या समस्येची कारणे आणि उपाय<br>**डॉ. महानंदा राऊतखेडकर** | 58 |


PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

RNI MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 6.10 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH
Issue : XXIII, Vol.VI, Nov.2021 To April 2022 | 32

6

# मानव विकास निर्देशांक आणि भारत

डॉ. जितेंद्र पांडुरंगराव काळे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
मुक्रमाबाद, जि. नांदेड

*Research Paper - Economics*

**प्रस्तावना :-**

देशातील सर्वसामान्य माणसांना आपल्या पसंतीचे जीवनमान जगण्यासाठी आवश्यक असलेलया विकल्पांची व्याप्ती वाढविण्यासाठीची प्रक्रिया म्हणजेच मानव विकास असुन यात दीर्घ व आरोग्यपूर्ण जीवन जगणे, ज्ञान प्राप्त करणे आणि चांगल्या प्रतिचे राहणीमान उपभोगणे यासारख्या अत्यावश्यक बार्बीचा समावेश होतो. स्त्री/पुरुष समानता आर्थीक समानता सामाजिकम व सांस्कृतिक अधिकार, इत्यादी मान विकासाचे महत्वाचे पैलू आहेत. निरोगी व शिक्षित लोकांमुळे उत्पादक्ता वाढुन परिणामत: उतपादनातील वृध्दीस हातभार लागतो. विकासावर खर्च करणे व संसाधने निर्माण करणे यासाठी उच्च वृध्दीदराची आवश्यकता आहे. तथपी या वाढीचा लाभ समाजातील सर्व घटकांना समानतेने विशेषता दुर्बल व पिडीत घटकांना मिळणे गरजेचे आहे.

सन १९९० मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम, (U.N.D.P.) यांनी पहिला मानव विकास अहवाल प्रकाशिति केला आणि त्यावर प्रत्येकावर्षी तो प्रकाशित केला जात आहे. भारतासह इतर अनेक देशांनी त्यांचे राष्ट्रीय मानव विकास अहवाल प्रसिध्द केले आहेत. राष्ट्रीय स्तरावर मानव विकासातील तफावती व त्यांचे समाजातील पिडीत घटकावर होणारे परिणाम दर्शविण्यामध्ये राष्ट्रिय मानव विकास अहवालाचे मोठे योगदान आहे. हे अहवाल दारिद्रय निर्मुलनासंबंधी राष्ट्रीय विकास आराखडा आणि विशेष कृती योजनांची आखणी करण्यासाठीची ही परिणाम कारक साधने आहेत. यातून सरकारने सर्वसमावेशक विकासाकडे वाटचाल करणे आतंराष्ट्रीय स्पर्धात्मकता व देशांतर्गत विषमता या दृष्टीकोनातून आवश्यक ठरते.

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाद्वारे प्रकाशित मानव विकास अहवाल २००५ नुसार भरताचा २००५ मधील मानव विकास निर्देशांक ०.४८२ होता तर २०१० मध्ये यात ०.५१९ पर्यंत वाढ झाल्याची दिसून येते.

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

RNI. MAHMUL 02937/2010/35848 IMPACT FACTOR - 6.10 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH
Issue : XXIII, Vol.VI, Nov 2021 To April 2022 

**मानव विकास निर्देशांक :-**

मानव विकास निर्देशांक हा (१) जन्मवेळच्या अपेक्षेत आर्युमानानुसार दीर्घ व आरोग्यपूर्ण जीवन (२) प्रोघ साक्षरता दर व एकात्रित पटसंख्यांच्या प्रमाणनुसार प्राथमिक माध्यमीक व उच्च शिक्षण ज्ञान आणि (३) देशांतर्गत दरडोई खुली उत्पन्न क्रयशक्ती समभुल्य चलनात अमेरिकन डॉलरप्रमाणे आर्थीक साध्य यातील घनदयावर आधारीत आहे.

**भारताचे मानव विकासा संबंधीजगामध्ये स्थान :-**

जगामध्ये मानव विकासाच्या बाबतीत नावे ०.९३८ (१) प्रथम क्रमांकावर आहे तर ऑस्ट्रेलिया ०.९३७ (२) दुसऱ्या स्थानावर आहे भारत मात्र ०.५१९-११९ च्या स्थानावर असलयाचे दिसून येते यावरुन जगातील मानव विकासाच्या क्रमवारीत भारत खुपच मागे असलयाचे दिसून येते.

तक्ता क्र. १.१

| देश | एच.डी.आय २०१० | प्रतिव्यक्ती निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (पी.पी.पी. २००८ यूएस डॉलर२०१०) | जन्मवेळचे अपेशित आर्युमान | स्कुली शिक्षा के औरात | स्कुली शिक्षा के संभावीत वर्ष २०१० |
|---|---|---|---|---|---|
| नॉर्वे | ०.९३८(१) | ५८८१० | ८१.० | १२.६ | १७.३ |
| ऑस्ट्रोलिया | ०.९३७(२) | ३८६९२ | ८१.९ | १२.० | २०.५ |
| पोलंड | ०.७९५(४१) | १७८०३ | ७६ | १०.० | १५.२ |
| मलेशिया | ०.७४४(५७) | १३९२७ | ७४.७ | ९.५ | १२.५ |
| रुस | ०.७१९(६५) | १५२५८ | ६७.२ | ८.८ | १४.१ |
| ब्राझील | ०.६९९(७३) | १०६०७ | ७२.९ | ७२ | १३.८ |
| तुर्की | ०.६७९(८३) | १३३५९ | ७२.२ | ६.२ | ११.८ |
| चीन | ०.६६३(८९) | ७२५८ | ७३.५ | ७.५ | ११.४ |
| श्रीलंका | ०.६५८(९१) | ४४८९ | ७४.४ | ८.२ | १२.० |
| थायलंड | ०.६५४(९२) | ८००१ | ६९.३ | ६.६ | १३.५ |
| फिलीपिन्स | ०.६३८(९७) | ४००२ | ७२.३ | ८.७ | ११.५ |
| मिश्र | ०.६२०(१०१) | ५८८९ | ७०.५ | ६.५ | ११.० |
| इंडोनेशिया | ०.६००(१०८) | ३९५७ | ७१.५ | ५.७ | १२.७ |
| दक्षिण आफ्रीका | ०.५९७(११०) | ९८१२ | ५२.० | ८.२ | १३.४ |
| वियतनाम | ०.५७२(११३) | २९९५ | ७४.९ | ५.५ | १०.४ |
| भारत | ०.५१९(११९) | ३३३७ | ६४.४ | ४.४ | १०.३ |
| पाकिस्तान | ०.४९०(१२५) | २६७८ | ६७.२ | ४.९ | ६.८ |
| केनिया | ०.४७०(१२८) | १६२८ | ५५.६ | ७.० | ९.६ |

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR-6.10 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH
Issue : XXIII, Vol.VI, Nov.2021 To April 2022

वरील सारणीवरुन मानव विकासाच्या बाबतीत भारताचा जगाच्या तुलनेत खुपच कमी विकास झालेला आहे जगामधील १६९ देशामध्ये भारत मानव विकासाच्या बाबतीत ०.५१९)११९ च्या स्थनावर आहे. जगामध्ये नॉर्वे, ऑस्ट्रोलिया, पोलंड,मलेशिया उच्च स्तिनावर आहेत तर पाकिस्थान, केनिया,बांगलादेश कनिष्ठ स्थनावर असल्याचे दिसून येतात. भरत अजुनही चीन थायलंड फिकीपान्स, मिरज, इडोनेशिया आणि दक्षिण आफ्रीका यासारख्या देशासोबत मध्यम मानव विकास नैणीमध्ये आहे.

भारताचे दरडोई उत्पन्न पाकिस्थन, कोनिया व बांग्लादेश देशपेक्षा अधिक असले तरी जगातील स्पर्धात्मकतेत भारतातील शाश्वत विकास साध्य करावयाचा असेल तर देशांतर्गत सर्वच क्षेत्रात वेगवान श्रमताविष्ठित विकास साध्य करणे आवश्यक आहे तरच आपण आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपली पत निर्माण करु शकतो.

देशातील व्यक्तीचे आरोगय सुदृढ व दिर्घायुषी जीवन असेल तर पूती व्यक्ती उत्पादक्तेत वाढ होउुन देशचे राष्ट्रीय उत्पन्नन वाढु शकते व विकासास प्रोत्साहन मिळते जगामध्ये ऑस्ट्रोलिया या देशातील आयुर्मान ८१.९ सर्वाधिक आहे तर आर्यमानाच्या बाबतीत ऑस्ट्रोलिया नंतर नॉर्व जगता ८१ दुसऱ्या क्रमांकावर आहे. भरताचे आयुर्मान ६४.४ इतके आहे भारताचे आयुर्मान पुढीलपेक्षा वाढले असले तरी जगातील नॉर्वे ऑस्ट्रोलिया, पोलंड, मलेशीया या देशांच्या तुलनेत कमी आहे आणी जागतीक सरासरि आयुर्मानापेक्षा भारतातील व्यक्तीचे अपेक्षित आयुर्मान कमी आहे. की निश्चीतच चिंताजनक बाब आहे. याच बरोबर शालेय शिक्षण घेणाऱ्यांची सरासरीच्या दृष्टीकोनातून सुध्दा भारताचे शालेय शिक्षण घेंणाऱ्यांचे प्रमाण केवळ श्रीलंका, चीन,मिस्त्र आणि वियतनाम सारख्या देशाच्या तुलनेत खुपच कमी आहे. परतु जागतीक सरासरीपेक्षाही कमी आहे.

स्त्री पुरुष समानतेच्या दृष्टीकोणतून भारताचा २००८ मध्ये ०.७४८ च्या निदेशांक मुल्याबरोबर एकुण १६८ देशामध्ये १२२ वा क्र. होता. स्त्री-पुरुष समानता निदेर्शांक पुनरुत्पादन आरोग्य सशक्तिकरण आणि श्रमशक्ती भागीदारीच्या क्षेत्रामध्ये स्त्री-पुरुष असमानतेमुळे या क्षेत्रामध्ये ० पूर्ण समानता ते १ समग्र समानता च्या रेजमध्ये मुल्यांची घट दिसते. ०.७४८ हा भारताचा स्त्री-पुरुष समानता निर्देशांक मुल्य चीन ०.४०५ आणि श्रीलंका ०.५९९ यासारख्या देशाच्या तुलनेत भारतात स्त्री-पुरुष जासत प्रमाणात दिसते.

**गरीव आणि समावेशी विकास :-**

जगातील तुलनेत भारतीय गरिवीचा निर्देशांक निश्चित दारिद्रय रेषेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या संख्याचे प्रमाण आणि राष्ट्रीय दारीद्रयाचे प्रमाण

वहुआय

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

## वहुआर्यामी गरीवी सुललांक

| देश | वहुआर्यामी गरीवी निर्देशांक २०००-२००८ | गरीवी रेषेपेक्षा कमी उत्पन्न असणारी लोकरांख्या | |
|---|---|---|---|
| | | $ १.२५ पी.पी.पी. प्रतिदिन २०००-०८ | राष्ट्रीय गरीवी रेषा २०००-२००८ |
| पोलंड | ४१ | २ पेक्षा कमी | १४.८ |
| मलेशिया | ५७ | २ पेक्षा कमी | १२.८ |
| रुस | ०.००५६५ | २ पेक्षा कमी | १९.६ |
| ब्राझील | ०.०३९७३ | ५.२ | २१.५ |
| तुर्की | ०.०३९८३ | २.६ | २७ |
| चीन | ०.०५६८९ | १५.९ | २.८ |
| श्रीलंका | ०.०२१९१ | १४ | २२.७ |
| थायलंड | ०.०६९२ | २ पेक्षा कमी | ---- |
| फिलीपिन्स | ०.०६७९७ | २२.६ | ---- |
| मिश्र | ०.०२६१०१ | २ पेक्षा कमी | १६.७ |
| इंडोनेशिया | ०.०९५१०८ | २९.४ | १६.७ |
| दक्षिण आफ्रीका | ०.०१४११० | २६.२ | २२.० |
| वियतनाम | ०.७५११३ | २१.५ | २८.९ |
| भारत | ०.२९६११९ | ४१.६ | २८.६ |
| पाकिस्तान | ०.२७५१२५ | २२.६ | ---- |
| केनिया | ०.३०२१२८ | १९.७ | ४६.६ |
| वांगलादेश | ०.२९११२९ | ४९.६ | ४०.० |

स्त्रोत H.D.R. २०१०

कॉलम दोन मध्ये कोष्टकात दिलेले आकडे १६९ देशामध्ये त्याची क्रमवारीता दर्शवितात.

विकासाच्या वहुआयामी दृष्टीकोणतून लोकसंख्यापैकी जो गरीव लोकसंख्याचा भाग वाटा हिस्सा हे दर्शवितात जरी जो जीवनमानाचा स्थर आणि शैख्झणी दृष्टीकोणतून अतीशय मागासलेपणने ज़ीवन जगतो. या निर्देशकानुसार जेंव्हा चीन आणि श्रीलंगा सारख्या देशाची तुलना केलयास भातरला ०.२६९६ गरीवी निर्देशांक आणि ४१.६ प्रतिशत गरीवी अनुपात १.२५ ppp प्रतिक्षत नुसार किंवा २८.६ प्रतिशत राष्ट्रीय गरिवी रेषा अशा असमाधानाकार आवस्थेत आपल्या देशातील गरीबीची

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

स्थिती ठेवता येणार नाही.

जगातील पोलंड,मलेशिया, रुस, श्रीलंका व मिर इत्यादी देशाचा गरीबी अनुपात दोन पेक्षा कमी आहे. तर भारतातील हे गरिबीचा अनुपात ४१-६ इतका प्रचंड आहे हे लक्षात येते. देशातील भांडवली साधनांचा विकास म्हणजे शास्वत विकास महणता येणार नाही. देशातील लोकांचे आयुर्मान, आरोग्य शिक्षण, मृत्यूदर,जन्मदर,स्त्री-पुरुष पगमाण दरडोई उत्पन्न, प्रतिव्यक्ती सकालि राष्ट्रीय उत्पन, गरीबी प्रमाण इत्यादीमध्ये मुलभुत व दुरगामी बदल घरुन येणे अपेक्षीत आह तरच सव्रसामावेशक विचासाचा विश्वसाच्या बाबीत देशाची जगातील पातळीवर पत राहील अन्यथा जगातील बँक, आय.एम.एम. इत्यादीचे फायदे घेण्यास भारतातील नक्कीच आडचणी निर्माण होण्याच्या शक्यता आहेत.

जगातील पातळीवर भारताचे मानव विकसाच्या दृष्टीकोणातून भारताचे अध्यन केले असता. अनेक सर्वसमावेशक विकासाच्या अनेक बाबतीत भारत, जगातील १६९ राष्ट्रापैकी खुपच मागे असल्याचा दिसुन येतो. शेजारील चीन व श्रीलंका या देशातील सर्वसमावेशक विकासाची तुलना केली असता आवश्यक सुविधा निर्माण करण्यामध्ये गरीबीचे प्रमाण कमी करण्यामध्ये स्त्री-पुरुष प्रमाण बालमृत्युदर जननदर, कुपोषण, इत्यादीचे प्रमाण कमी करण्यामध्येही भारत अयशस्वी ठरलेला दिसून येतो. जागतीक पातळीवर इतर देशाच्या तुलनेत तो खुपच आहे. परंतु देशातही विषमता निर्मुलनातही तो अयशस्वी ठरलेला दिसुन येतो.

**भुखमारी आणि कुपोषण :-**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणुन ओळखला जात होता. परंतु तरीही सध्य ही स्थिति राहिलेली नाही. भारतामध्ये भुखमारीचे प्रमाण १.९ असल्याचे दिसून येते. ही चिंताजनक बाब आहे. प. बंगाल ९.० असात५.० ओरिसा ५.३ तसेच बिहार २.७ या राज्यात भुखमारीचे प्रमाण अधीक असल्याचे दिसून येते. याला खाद्य:न्नाची पर्याय उपलब्धता न करण्यामध्ये सर्वाधिक वितरण व्यवस्ाा प्रमुख जबाबदार आहे. दारीद्रयरेखाली लोकांना पर्याय खाद्यान्न पुरवठा करण्यासाठी सरकारचे उद्दीष्ट मोठे असले तरी ते दुर्लक्षतच आहे कारण अकराव्या पंचवार्षीक योजनेतून सर्वाधिक वितरण व्यवस्था पूर्णत असफल णाल्याची दिसुन येते. अन्न सुरक्षेसाठी सरकारने जरी सरकारी गोदामे मोठया प्रमाणात अन्नधान्यानी

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

भारतातील प्रमुख राज्यातील भुख,गरीबी,कुपोषण आणि जनस्वास्थ्य विषयक स्थिती २००५-०६

| राज्य | अपर्याप्त जेवण(%) २००४-०५ | गरीबी रेषेखालील लोकसंख्येचे प्रतिशत प्रमाण २००४-०५ | कुपोषण ३ वर्षे पेक्षा कमी वयाचे कमी वजनाचे मुले २००५-०६ | [illegible] प्रतिशत प्रमाण २००५ | [illegible] प्रतिशत प्रमाण २००५-०६ |
|---|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | ०.५ | १५.८ | ३६.१ | ८०.१ (६७.८) | ४२.४ |
| आसाम | ५.० | १९.७ | ४०.४ | ५८.८ (११.६) | ४६.४ |
| बीहार | २.७ | ४१.४ | ५८.४ | ८६.६ (४.२) | २५.२ |
| गुजरात | ०.२ | १६.८ | ४७.४ | ८४.१ (७२.७) | २४.६ |
| हरीयाण | ०.१ | १४.० | ४१.९ | ८६.१ (६१.१) | ५२.३ |
| हिमाचल प्र. | ०.० | १०.० | ३६.२ | ८८.६ (६५.१) | ४५.६ |
| कर्नाटक | ०.२ | २५.० | ४१.१ | ८४.६ (५७.४) | ४६.५ |
| केरळ | २.३ | १५.० | २८.८ | २३.४ (२४.६) | ९६.० |
| मध्यप्रदेश | १.६ | ३८.३ | ६०.३ | ६८.४ (२५.०) | २७.० |
| महाराष्ट्र | ०.८ | ३०.७ | ३९.७ | ७९.८ (७८.६) | ५३.० |
| उडीसा | ५.३ | ४६.४ | ४४.० | ६४.२ (१०.२) | १९.३ |
| पंजाब | ०.७ | ८.४ | २७.० | ९७.६ (५४.६) | ७०.८ |
| राजस्थान | ०.० | २२.१ | ४४.० | ६८.२ (४५.४) | ३०.८ |
| तामीळनाडू | ०.३ | २२.५ | ३३.२ | ८५.६ (८४.२) | ४२.९ |
| उत्तरप्रदेश | १.५ | ३२.८ | ४७.३ | ८७.८ (१०.३) | ३३.१ |
| बंगाल | ९.० | २४.७ | ४३.५ | ८८.५ (२७.९) | ५९.५ |
| छत्तीसगड | २.२ | ४०.९ | ५२.१ | ७०.५ (१६.८) | १८.७ |
| झारखंड | ०.६ | ४०.३ | ५९.२ | ४२.६ (११.३) | २२.६ |
| भारत | १.९ | २७.५ | ४५.९ | ७७.९ (४२.०) | ४४.५ |

स्त्रोत Economic आर्थीक समस्या २००८-०९

प्रमाणत भरली असली सरकारच्या अनियंत्रणामुळे हे अन्नधान्य मोठया प्रमाणत काळ्या बाजारात विकले गेल्याच्या नोंदी आहेत. यातूनच तेलगाफियासारखी प्रकरणे अदयास आलेली दिसून येतात. त्याच बरोबर उगरा---------व्यक्तीला याचा लाभ निश्चित प्रमाणानुसार मिळत नाही परिणामी यावर दारिद्रय रेषेच्या वरच्या लोकांचाही सुरुंग लागलेला दिसून येतो. त्यामुळे देशातील वासतवीक भुखमारीचे प्रमाण कमी करण्यासाठी भ्रष्ट प्रशसणीय व्यवस्था सुधारणे आवश्यक आहे.

देशातील गरीबीच्या प्रमाणात काही अशी घट झाली असली तरी ती इतर शेजारी राष्ट्र

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq. Mukhed, Dist.

चीन,श्रीलंका,ऑस्ट्रोलिया राष्ट्रांपेक्षा भारतातील गरिबीचे प्रमाण २८.६ खुप मोठे आहे. देशतील गरिबीच्या प्रमाणापेक्षा कुपोषणची समस्या अतिशय उग्र झाल्याची दिसून येते. देशातील तीन वर्षापेक्षा कमी वयातील मुलांचे कुपोषणचे प्रमाण ४५.९ इतके बेशुमार आहे. सन १९९८-९९ मध्ये भरताचे कुपोषणाचे प्रमाण ४७ टक्के हते तर सन २०१० मध्ये हे फक्त ४१ टक्के पर्यंत खाली आले आहे. म्हणजे बारा वर्षामध्ये देशतील नियोजन कराने कुपाषण निर्मुलनासाठी केलेल्या राबलेल्या खाच आराखडयाची नियोजनाची दिश आणि अमलबजावणी किती निरुपयागी ठरली याची कल्पना येते.

शेशकाली किंवा लहानपनात मुलांना पर्यापत पोष्क आहाराची उपलब्धता न झाल्याने तसेच इतर सेवेक कारणाने व मातेच्या दूध न मिळाल्याने कुपोषणचे प्रमाण वाएत आहे तर हे कुपोषणचे प्रमाण देशने इतर विकासीत देशाबरोबर नियंत्रित नाही केले तर देशाच्या दिर्घकालीन उत्पादनावर वगचतीवर विपरीत आणि राष्ट्रीय उत्पन्नावर परिणाम घडवून येतील आणि देशाच्या सामाजिक आणि आर्थीक विकासाला धोका निर्माण होण्याची दाट शकयता आहे.

देशातील व्यक्तीला आरोगयपूर्ण जीवन जगण्यासाठी अन्य धान्य महत्वपूर्ण ठरतात यामध्ये शुध्द पेय जल पुरवठा दवाखानयाची उपलब्धता तसेच प्रति कुटुंब शौचालयाची उपलब्धता याही बाबी पर्यापत प्रमाणत उपलब्ध असणे आवश्यक आहे. देशमध्ये सन २००१ मध्ये शुध्द पेय जलाची उपलब्धता असणाऱ्या कुटुंबाचे प्रतितशत प्रमाण ७७.९ इतके होत तर शोचालय सुविधा उपलब्ध कुटुंबाचे प्रतशत प्रमाण ४४.५ इतके असल्याचे आहे. यावरुन आपणाला देशतील पेय पुरवठयाची स्थिती सुधरणा होत असल्याचे दिसुन येते. मात्र शोचालयाची उपलब्धता मात्र आजुनही खुपच कमी असल्याचे लक्षात येत व्यक्तीच्या आयुर्मानरात सुधारण करण्यासाठी वेळेवर उपचार देणारे सुविधा केंद्र निर्माण करणे आवश्यक आहे याचबरोबर रोगराई कमी करण्यासाठी प्रतिकूटूंब शौचालय उपलबध असणे आवश्यक आहे मात्र भारतातील हे प्रमाण खुपच कमी आहे. साठवणे सुध्दा आरोगयासाठी आवश्यक आहे.

**निष्कर्ष :-**

१. भारताचा मानव

१. जगातील इतर देशाच्या तुलनेत नॉर्वे ०.९३८ (१) ऑस्ट्रोलिया ०.९८७२ चीन ०.६६५८९ श्रीलंका ०.६५८९१ भारताचा मानव विकास निर्देशांक ०.८१९ (११९) खुपच कमी आहे.

२. भारताचे प्रातव्यक्ती निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न खुपच कमी आहे. जगामध्ये सर्वाधीक प्रतीव्यक्ती निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न नॉर्वेचे ५८८१० आहे ४४८६ चीन ७२५८ तर भारताचे प्रतीव्यक्ती निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न ३३३७ डॉलर इतके अल्प आहे.

३. आयुर्मानीच्या बाबतीतही नॉर्वे-८१ ऑस्ट्रेलिया ८१-९ चीन ७३.५ श्रीलंका ७४.४ जगातील इतर देशाच्या तुलनेत भारतातील जन्मवेळचे अपलीच आयुर्मान ६४.४ कमी असल्याचे

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

RNI MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 6.10 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH Issue : XXIII, Vol.VI, Nov.2021 To April 2022 39

दिसुन येते.

४. भारतातील शालेय शिक्षण घेणाऱ्यांची सरासरी (नॉर्वे १२.६) ऑस्ट्रेलिया१२.० चीन ७.५ श्रीलंका ८.२ भरत ४.४ जगतील इतर राष्ट्राच्या तुलनेत खुपच कमी आहे.

५. भारतातील दारिद्रय रेषेखाली जीवन जगण्याऱ्याचे प्रमाण २८.६ आहे ते जगातील इतर देशाच्या तुलनेत पोलंड १४.८ मलेशिया १२.८ रुस १९.६ श्रीलंका २२.० चिंताजनक आहे.

६. मानव विकासाच्या बाबतीत भारत हा जागतीक पातळीवर मध्यम स्तरातील राष्ट्राच्या यादी विषमतेमध्ये शेवटच्या ठिकाणी आहे. परंतु देश अंतरीत विषमतेमध्ये चिंताजनक असल्याचे दिसून येतो. गजरात, पंजाब,हरियाण,केरला,तामीळणाडू, महाराष्ट्र,कर्नाटक हे राज्य विकासाच्या दृष्टीकोणतून आघडीवर आहेत तर आसाम प., बंगाल, ओरिसा, छत्तेसगड, झारखंड, इत्यादी शन्य मागासलेले आहेत. यामध्ये भुखमारी, गरीबी,कुपोषण निरक्षता, शुध्यापर्यंत जन्मदर, मृत्युदर, स्त्री पुरुष प्रमाण शौचालयाची उपलबधता इत्यादी बाबतीत मागस कमालीचा मागासलेपणा दिसून येतो.

उपाय :-

१. देशातील व्यक्तीचे सरासरी दरडोई उत्पन्नात होणारी वाढ हि संख्यात्तम आहे. गुणात्मक नाही यासाठी सरकारने रोजगारानितीच्या अनेक योजना आखल्या असल्या तरी त्याची अमलबजावणी काटेकोर होणे आवश्यक आहे. तसेच १०० दिवस रोजगार हम जेवढी ३०० दिवस रोजगार हमी द्यावी व यातुन जलद ग्रामीण भागात रस्ते जलसंधरण, जमीनीला बांध घालणे, वृक्ष पडीत जमीनीवर वृक्ष लागवड इत्यादी कामे करुन घ्यावेत यातून जास्तीत जास्त बेकारांना रोजगार मिळून पायाभूत संरचना निर्माण करण्यास यश मिळेल.

२. शालेय शिक्षणाचा आराखडा हा रोगगारामिमुख शिक्षणपध्दती समोर ठेवून आखणे आवश्यक ाहे.

३. देशातील व्यक्ती च्या आयुर्मानात वाढ करण्यासाठी आरोग्यविषयक सुविद्यांची व योजनांची संख्यात्मक निर्मीती गुणात्मत्तेतर भर देणे गरजेचे आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात आजुनही डॉक्टरची उपलब्धता कमी प्रमाणत आहे. तसेच ग्रामीण प्राथमीक भागात आरोग्य केंद्रात डॉक्टर वकमचारी यांची अनुपस्ती चे प्रमाण चितांजनक आहे यासाठी काटेकोर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

४. मृत्युदराच्या बाबतीत ओरीसा, मध्यप्रदेश,आसाम आणि आणि उत्तरप्रदेश या राज्यातील स्थिती सुधरणे आवश्यक आहे यासाठी सरकारने या राज्यात आरोगय विषयक सुविधा वाढवणे आवश्यक आहे

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya

RNI. MAHMUL02937/2010/35548 IMPACT FACTOR - 6.10 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH
Issue : XXIII, Vol.VI, Nov.2021 To April 2022 40

५. देशातील कुपोषणची समस्या अतीशय गंभीर आहे यासाठी केंद्रसरकारचे प्रयत्न चांगल्या प्रकारचे आहेत. तरीसुध्दा कुपोषण निर्मुलनासाठी बालकांना बी.पी.एल खालील बालकांना सकस व पोषक आहार पर्यायी प्रमाणात पुरवठा पाहिजे. जो पुरवठा जातो त्याचा दर्जा खालावलेला दिसून येतो.

६. देशातील गरिबीचे दारिद्रयाचे प्रमाण कमी करण्यासाठी बी.पी.एल खालील व्यक्तींना,मोफत चांगल्या दर्जाची घरकुल शासनामार्फत देण्यात यावीत. तसेच आरोग्यविषयक सुविधेसाठी शस्त्रक्रिया मुत्रपिंड, कॅन्सर, क्षयरोग, ह्दयरोग संपूर्ण खर्चाची तरतुद करण्यात यावी. व पडितीग्रसतांना याचा लाभ मिळण्यासाठी १०० टक्के सवलत बी.पी.एल. याद्वारे देण्यात यावी.

७. देशातील दारिद्रयाचे प्रमाण कमी करण्यासाठी श्रीमंत व्यक्तीवरील कराच्या प्रमाणत वाढ करावी तर कर स्वरुपाने मिळालेल्या महसुलाचा खर्च बी.पी.एल. धारकांच्या सुध (शिक्षण,आरोग्य,निवास,विज) सुधारणेवर करावा.

८. देशातील सकल राष्ट्रीय उत्पन्न वाढण्यासाठी सर्व क्षेत्राचा मुलाधार असलेल्या कृषीक्षेत्रात सरकारची गुणात्मक गुंतवणुक वाढली पाहिजे, सिंचनाचे क्षेत्र वाढले पाहिजे, उर्जा निर्मिती साठी पुण्यशास्वत प्रयत्न केले पाहिजे यावर कृषी उद्योग व सेवा तीन्ही क्षेत्राचा विकासदर अवलंबुन आहे येणाऱ्या ७० वर्षाचा विचार करुन उर्जानिर्मीती करणे आवश्यक आहे.

**समारोप :-**

देशाचा आर्थीक विकास म्हणजे मानव विकास हे सुत्र वापरणे आवश्यक आहे केवळ भांडवलीसाधनांचा संख्यात्मक विकास साधुन व आर्थीक विकास दिर्घकाल टिकाणार नाही देशात श्रीमंत गरिब दरी कमी होत नाही, दारिद्रयाच्या प्रमाणात घट होत नाही प्रत्येक राज्यातील निरक्षरतेचे प्रमाण गतीने कमी होत नाही बालमृत्युदर व कुपोषणचे प्रमाण कमी होत नाही. तोपर्यंत सर्वांना शुध्दपेयजल मिळत नाही, सकस पुर्णआहार मिळत नाही तोपर्यंत नियोजनाचे उद्दीष्ट पूर्ण णले असे आम्हाला म्हणता येणार नाही. वरील विकल्यांची पुर्ती करण्यासाठी बृहत आराखडे व योजना आखुन चालणार नाही तर त्याची काटेकोर अमलबजावणी होणे आवश्यक ठरते सरकारचे प्रयत्न प्रात्साहन असेल तरी देशातील लवासा, आदर्श टु.मी. स्पेक्रमा राष्ट्रकुल संघटीत या इत्यादी घोटाहयाची नोंदी घेतली असता सरकारने मानव विकास सुधारणे दुरच राहिले परंतु देशातील गरिबांचे रक्तज शोषण केल्याचे दिसुन येते मग शाश्वत मानव विकास होणे अवघड आहे. यासाठी जनतेनेच सरकारने राभवलेल्या योजनांचा घोरणत्मक आढावा घेणे गरजेचे आहे.

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

## संदर्भ सूची :-

१. UNDP J Human Development
२. UNDP Human Development Report २००५-०६
३. आर्थीक समस्या २१०-११ व प्रकरण २९२ , २९६ प्रसारण मंत्रालय भारत सरकार
४. आर्थीक समस्या २००८-०९ P.No. २६३
५. महाराष्ट्राची आर्थीक पहाणी २००९-१० P.No. १९७
६. अर्थ व सांख्याकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई
७. Madhusudan Ghosh २००६ Economic growth and human development in indian stare epu. vol.XLI No./३० २९ august ४
८. Economic and political week EPW vol. २८ No. १९ pp ९३९८ ९४१

IMPACT FACTOR 6.10

डॉ. ओमव

ISSN 2229-4406

UGC Approved International Registered & Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

URA

## UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue - XXII, Vol. V
Year - XI (Half Yearly)
Sept. 2021 To Feb. 2022

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 -241913
9423346913 / 9503814000
9637935252 / 7276301000

**Website**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Publisher :**
Jyotichandra Publication
Latur, Dist. Latur - 413531. (MS)

Price : ₹ 200/-

CHIEF EDITOR

Dr. Balaji G. Kamble
Professor & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur(M.S.)India.

EXECUTIVE EDITORS

Dr. Rajendra R. Gavhale
Head, Dept. of Economics,
G. S. Mahavidyalaya,
Khamgaon, Dist. Buldhana

Dr. D. Raja Reddy
Chairman, International Neuro Surjery Association,
Banjara Hill, Hayderabad (A.P.)

Dr. E. Siva Nagi Reddy
Director, National Institue of Hospitality & Tourism Management,
Hyderabad (A.P.)

Dr. A. H. Jamadar
Chairman, BOS Hindi,SRTMUN & Head, Dept. of Hindi, BKD College,Chakur, Dist. Latur (M.S.)

Dr. Yu Takamine
Professor, Fafulty of Law & Letters,
University of Ryukyas,
Okinawa, (Japan).

Dr. Shaikh Moinoddin G.
Dept. of Commerce,
Lal Bahadur Shastri College,
Dharmabad, Dist. Nanded(M. S.)

Prashant Kshirsagar
Dept. of Marathi,
Vasant Mahavidyalaya
Kaij, Dist. Beed (M.S.)

Scott A. Venezia
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

DEPUTY-EDITOR

Dr. N. G. Mali
Head, Dept. of Geography,
M. B. College,
Latur,Dist. Latur.(M.S.)

Dr. Babasaheb M. Gore
Principal,
Smt. S.D.D.M.College
Latur, Dist. Latur (M.S.)

CO-EDITORS

Dr. V.J. Vilegave
Head, Dept. of P.A.,
Shri. Guru Buddhiswami College,
Purna, Dist. Parbhani (M.S.)

Dr. Omshiva V. Ligade
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

Dr. S.B. Wadekar
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli (M.S.)

Dr. Shivanand M. Giri
Dept. of Marathi,
Bhai Kishanrao Deshmukh College,
Chakur Dist. Latur (M.S.)

Swami Vivekanand Mahavidyalaya, Mukramabad, Tq. Mukhed, Dist. Nanded

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

Issue : XXII, Vol. V
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 6.10
ISSN 2229-4406
Sept. 2021 To Feb. 2022

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Network Markets & Strategies in Respect of Innovations **Dr. Vijaykumar R. Gawhale** | 1 |
| 2 | Violence and Globalization **Dr. Baljit Kaur Oberay** | 10 |
| 3 | Performance in Sports **Mahesh R. Patil** | 15 |
| 4 | A Sociological Visions on the Impact of Globalization on Indian rural Women - Critical Reality **Dr. Shyam S. Khandare** | 19 |
| 5 | जयशंकर प्रसाद की काव्य मे नारी **एम. एस. मंगरुळे** | 26 |
| 6 | राष्ट्रीयकृत बँकाच्या विलिनीकरणाचा चिकित्सक अभ्यास **डॉ. राजेंद्रकुमार आर. गव्हाळे** | 34 |
| 7 | भारतातील आर्थिक सुधारणा - एक अभ्यास **डॉ. निलम छंगाणी** | 42 |
| 8 | भारतातील औद्योगिक विकास आणि आर्थिक सुधारणा **डॉ. जितेंद्र पांडुरंगराव काळे** | 49 |
| 9 | महात्मा फुले यांचे सामाजिक विचार **डॉ. उल्हास एन. राठोड** | 57 |



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

Issue : XXII, Vol . V
URA UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 6.10
ISSN 2229-4406
Sept. 2021 To Feb. 2022

8

# भारतातील औद्योगिक विकास आणि आर्थिक सुधारणा

**डॉ. जितेंद्र पांडुरंगराव काळे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
मुक्रमाबाद, जि. नांदेड

Research Paper - Economics

## सारांश

*औद्योगिकरणाशिवाय कोणत्याही देशाचा विकास गतिमान होऊ शकत नाही. १८ व्या शतकापूर्वीच युरोपिय राष्ट्रांनी औद्योगिक क्रांतीची बिजे रोवण्यास सुरुवात केली. त्यामुळेच ब्रिटीशांनी संपूर्ण जगावर व्यापार व व्यवहाराच्या माध्यमातून साम्राज्य विस्तार केला व राज्य केले. भारतासारख्या विकसनशील देशात जगाच्या एकुण भूक्षेत्रफळाच्या केवळ २४ टक्के भूक्षेत्रफळ आहे, तर जागतिक एकूण लोकसंख्येच्या सुमारे १७ टक्के लोकसंख्या भारतात वास्तव्यास आहे. देशातील दारिद्र्य, बेकारी, उपासमार, बेरोजगारी व प्राथमिक क्षेत्रावरील अवलंबीत्व कमी करणे व आर्थिक विकासाची प्रक्रिया गतीमान करावयाची असेल तर औद्योगिकरणाशिवाय तरूणोपाय नाही.*

**प्रस्तावना :-**

स्वातंत्र्यानंतर नियोजनाच्या माध्यमातून कृषी व उदयोगाच्या विकासावर सर्वाधिकार भर देण्यात आला. त्यातून उत्पादनाच्या बाबतीत स्वावलंबित्व निर्माण व्हावे व विकासाला गती प्राप्त व्हावी हा उद्देश होता. पंचवार्षिक योजनेद्वारे सार्वजनिक क्षेत्राबरोबर खाजगी क्षेत्रातून मोठी पायाभूत गुंतवणूक निर्माण झाली. तसेच लघुउद्योगाच्या माध्यमातून समतोल आर्थिक विकास होण्यास मदत झाली. त्याचबरोबर मोठया उद्योगातून पायाभूत संरचना आधिक मजबूत होऊन एकंदरीत देशातील रोजगार गुंतवणूक व उत्पादनात वृद्धी होण्यास मुबलक मदत झाली.

१९९१ च्या नवीन आर्थिक सुधारणानंतर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील नविन तंत्रज्ञान, उत्पादन वैविध्य, रोजगार उपलब्धता नवीन बाजारपेठा, नैसर्गिक संसाधनाचे उपलब्ध स्त्रोत, कौशल्य विकास, विदेशी गुंतवणूकीस वाढ परकिय दुर्मिळ चलनांची प्राप्ती असे अनेक फायदे भारतीय

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

उद्योगक्षेत्राला प्राप्त झाले. जागतिकीकरणानंतर भारतातील औद्योगिकदृष्ट्या अस्थीर वातावरण पतमानांकन संस्थांचे प्रतिकुल अहवाल, देशातील राजकीय प्रतिनिधीचे स्वास्थ्य, देशातील वाढता भ्रष्टाचार या गोष्टी बरोबरच औद्योगिक क्षेत्रातील उद्योग संस्था आंतरराष्ट्रीय बलाढ्य कंपन्यांना स्पर्धात्मकतेच्या बाबतीत, औद्योगिक वस्तूंचे उत्पादन व दर्जा, नवतंत्रज्ञानन हे विकरीत करण्यात स्पर्धा करू शकल्या नाहीत. तसेच उत्पादना खर्च कमी करून किंमती कमी करण्यातही भारतीय उद्योग संस्था टिकल्या नाहीत. तसेच सरकारचे उद्योगक्षेत्राला वारंवार अनुदान व कर्जमाफी देणे हे उद्योग क्षेत्रातील उत्पादनाची प्रेरणा नष्ट करण्यासारखेच झाले. यामुळे अलिकडच्या काळात भारतीय उद्योग क्षेत्रातील जीडीपी मधील वाटा स्थिर असला तरी अमुलाग्र उत्पादन करण्यामध्ये व स्पर्धात्मक कंपन्यांचा सामना करून भारतीय बाजारपेठेतील उपभोगत्याबरोबर इतर विकसनशील देशातील बाजारपेठा काबीज करणे, नवसंशोधनातून उत्पादन करणे व अल्प किंमतीत इतर बाजारपेठेमध्ये विकणे अजूनही भारतीय उद्योगक्षेत्राला शक्य होत नाही. यातून औद्योगिक विकासाचा दर घसरत चालला आहे. वाढत्या लोकसंख्येला नव्याने रोजगार निर्मिती होत नाही. परिणामी प्रभावी मागणीत घट होते व उद्योग क्षेत्रातून उत्पादनाची प्रेरणा नष्ट होते.

अलिकडच्याकाळात भारतीय उद्योगक्षेत्राचा गतिमान विकास करण्यासाठी, रोजगार निर्मिती, निर्यातवाढ, परकिय गुंतवणूक आकर्षित करणे इत्यादी दृष्टीने भारत सरकारने प्रयत्न केले. तसेच नवीन औद्योगिक धोरणांच्या माध्यमातून, डिजीटल इंडिया, स्किल इंडिया, स्मार्ट सिटी, मेक इंन इंडिया, स्टार्ट अप इंडिया, स्टँड अप इंडिया, उडान योजना, उदय योजना, मुद्राकर्ज योजना, इज ऑफ डुइंग बिजनेस योजना गुंतवणूक धोरणात बदल, वस्तू व सेवाकर, रोख विरहीत व्यवहार, सौरउर्जा निर्मिती, सेंदाई योजना, स्वच्छ भारत योजना, नविन कपडा पार्क देशभर उभारणे इत्यादी योजनांच्या माध्यमातून रोजगार, निर्यात, उत्पादन, परकिय चलनसाठा वाढविण्यासाठी व औद्योगिक क्षेत्राची सर्वांगीण प्रगती साध्य करण्यासाठी भारत सरकार प्रयत्न करत आहे. यातून निश्चितच देशाच्या औद्योगिक प्रगतीला चालना मिळून भारतीय उद्योग क्षेत्र अंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये दबदबा निर्माण करेल.

सन २०१७-१८ मध्ये औद्योगिक विकासाचा दर ४.४ टक्के होता. २०१८-१९ मध्ये तो ३.६ टक्के इतका साध्य झाला. देशाच्या जीडीपीमध्ये उद्योगक्षेत्राचा वाटा २९.७३ टक्के राहिला आहे. तर रोजगार निर्मितीमध्ये २४.६९टक्के योगदान उद्योगक्षेत्राचे आहे. तर निर्यातीमध्ये इतका वाटा भारतीय उद्योगक्षेत्राचा राहिला आहे. तसेच भांडवल निर्मितीचा दर सन २०१७-१८ मध्ये ७.६ टक्के साध्या झाला आहे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तूत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी प्रामुख्याने द्वितीय सामुग्रीचा आधार घेण्यात आला

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

आहे. त्यामध्ये प्रामुख्याने विविध शासकीय व निमशासकीय प्रकाशनाद्वारे प्रकाशित ग्रंथ, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे इत्यादीचा वापर करण्यात आला.

**शोधनिबंधाची उद्दीष्टये :-**

प्रस्तूत शोधनिबंधाच्या अभ्यासाला योग्य दिशा प्राप्त होण्यासाठी काही उद्दिष्टये निश्चित करण्यात आली आहेत. ती पुढील प्रमाणे आहेत.

१) औद्योगिक विकासाच्या विविध स्थित्यंतराचा अभ्यास करणे.

२) औद्योगिक विकासासाठी सरकारने अलीकडच्या काळात राबविलेल्या मोजक्या योजनांचा आढावा घेणे.

३) औद्योगिक क्षेत्राचे भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदानाचा शोध घेणे.

४) महत्वपूर्ण निष्कर्ष काढणे व शिफारशी करणे.

**अलीकडच्या काळातील औद्योगिक क्षेत्रातील सुधारणा :-**

अलीकडच्या काळात औद्योगिक क्षेत्रात अमुलाग्र बदल करण्यासाठी भारत सरकारने २०१४ नंतर काही महत्वपूर्ण सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. यातील पहिले पाऊल म्हणजे औद्योगिक धोरणात सुधारणा तसेच नवमाहिती व तंत्रज्ञानावरील भर, सुचना व प्रसारण.
मेक इन इंडिया, स्टार्टअॅप इंडिया, स्टँड अप इंडिया, विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक इत्यादी योजनांच्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्रात सुधारणा करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**१) मेक इन इंडिया :-**

२५ सप्टेंबर २०१४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याद्वारे राष्ट्रीय आणि राज्यसतरावर मेक इन इंडियाची सुरूवात करण्यात आली. या योजनेचा मुख्य उद्देश गुंतवणूकीस चालना देणे, तरूण उद्योजकांना प्रोत्साहीत करणे, कौशल्य विकासात वाढ करणे, बौध्दीक संपदेचे संरक्षण करणे व आधुनिक सोयी-सुविधांची निर्मिती करणे या उद्देशाने मेक इन इंडिया हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. या योजनेअंतर्गत जागतिक व्यापारात हिस्सेदारी वाढविण्यासाठी लूक इष्टच्या बरोबर लिंक वेष्टची कल्पना सुचविण्यात आली. मेक इन इंडिया कार्यक्रमात-

१) वाहन उद्योग २) विमान ३) जैवतंत्रज्ञान ४) निरोगीपणा ५) अवकाश ६) बंदर ७) खाणकाम ८) रेल्वे ९) आयटी आणि बीपीएम १०) रसायने ११) चामडे १२) बांधकाम १३) अन्नप्रक्रिया १४) औषधे १५) औष्णीक उर्जा १६) पर्यटन १७) पुनर्निर्मितीक्षम उर्जा १८) कापड १९) तेल आणि वायु २०) मनोरंजन २१) रस्ते आणि महामार्ग २२) इलेक्ट्रॉनिक यंत्रणा २३) इलेक्ट्रॉनिक मशिनरी २४) संरक्षण उत्पादने २५) वाहनांच्या सुट्या भागाचे उद्योग इत्यादी २५ उत्पादनक्षेत्राची निवड करण्यात आली आहे. या कार्यक्रमांतर्गत गुंतवणूक वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी संरक्षण क्षेत्रात ४९ टक्के, रेल्वे १०० टक्के आंतराळ ७४ टक्के, समचार मिडीया- २६ टक्के प्रत्यक्ष

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

विदेशी गुंतवणूकीला अनुमती देण्यात आली. योजनेचा परिणाम म्हणून २०१५ मध्ये भारतात चीन युएसडॉलर ६३अरब पेक्षाही अधिक म्हणजेच ४.०६ लाख करोड प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक झाल्याचे निदर्शनास येते.

तसेच जपानी कंपन्यांच्या व्यापारातही वाढ झाल्याचे दिसून येते. फेब्रुवारी २०१६मध्ये मुंबई येथे मेक इन इंडिया सप्ताह कार्यक्रमात वांद्रे-कुर्ला संकुलात पार पाडला. या कार्यक्रमाला ६८ देशातील २५०० अंतरराष्ट्रीय आणि ८००० खाजगी प्रतिनिधी मंडळांनी भाग घेतला होता. यावेळी २५९४ सांमजस्य करार करण्यात आले. याचाच परिणाम म्हणून एकूण १०२ देशांचा सहभाग नोंदविण्यात आला. त्यातून महाराष्ट्रात १) मराठवाडा व विदर्भ १ लाख ५० हजार कोटी रूपये २) पूणे ५० हजार कोटी ३) खानदेश २५ हजार कोटी ४) मुंबई कोकण विभाग - ३ लाख २५ हजार कोटी रूपयांची गुंतवणूक झाल्याचे दिसून येते. हे औद्योगिककरणाच्या व रोजगार निर्मितीच्या दृष्टीने महत्वाचे पाऊल दिसून येते.

**२) स्टार्ट अप इंडिया :-**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०१५ रोजी स्टार्टअप इंडियाची घोषणा केली. या योजनेचा मुख्य उद्देश नवउद्योजकास प्रोत्साहन देणे व रोजगारनिर्मिती घडवून आणणे हा आहे. स्टार्ट अप इंडिया म्हणजे अशी कंपनी किंवा व्यवसाय आहे. जी बौध्दीक आणि तंत्रज्ञानावर आधारित नवनवीन उत्पादन व सेवांचे व्यापारीकरण व आधुनिकीकरण करते. स्टार्ट अप इंडिया योजनेची वैशिष्टये असे की, १) नव उद्योजकांसाठी सरकारी नियम आणि बंधने कमी करणे. २) नव उद्योग निर्मितीतील परवाना राज (Licence Raj) व परकीय गुंतवणूक अडथळे समाप्त करणे. ३) रोजगार निर्मितीस चालना देण्यासाठी **शाश्वत** आर्थिक वृध्दीस चालना देणे. ४) देशातील महिला उद्योजकांस (अनुसूचित जाती/जमाती) प्रोत्साहन देणे.

स्टार्ट अप इंडिया या योजनेत पुढील तरतुदी करण्यात आल्या.

१) पहिल्या तीन वर्षासाठी उद्योजकाच्या कायद्याच्या पालनासाठी कोणतीही शासकीय पाहणी होणार नाही.

२) पतहमी निधीची तरतुद

३) नविन उद्योजकासाठी अर्ज आणि वेब पोर्टल सुरू असेल याद्वारे नोंदणी करणे सोपे होईल.

४) अर्ज सादर करण्याच्या शुल्कात ८० टक्के सुट असेल

५) स्टार्ट अपची गरज पूर्ण करण्यासाठी नवउदयोजकासाठी दहा हजार कोटी रूपयाचे भांडवल उभे करण्यात येईल.

६) स्टार्टअप अंतर्गत उद्योगांना भांडवली लाभ करात सुट देण्यात येईल.

७) या योजने अंतर्गत नवउद्योजकास तीन वर्षापर्यंत उत्पन्न करातून सूट देण्यात आली आहे.

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

८) योजनेअंतर्गत सार्वजनिक आणि खाजगी भागीदारी मॉडेल सहभागी करण्यात आले आहे. त्याचबरोबर इतर ३१ मॉडेलचा समावेश आहे इत्यादी तरतुदींद्वारे नवउद्योजकास प्रोत्साहन देऊन औद्योगिक विकासास गती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यावर परिणाम म्हणून २,३७,९०२ व्यावसायिकांनी योजना तयार करण्यासाठी या कार्यक्रमाचा लाभ घेतला आहे.

**स्टार्टअप कार्यक्रमातील मान्यताप्राप्त उद्योगाची टक्केवारी २०१८-१९**

| | | | |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | १८.९१ | हरियाना | ५.३३ |
| कर्नाटक | १४.६७ | तमिळनाडू | ५.१८ |
| दिल्ली | १३.३८ | गुजरात | ५.१७ |
| उत्तरप्रदेश | ८.२३ | केरळ | ४.०० |
| तेलंगाणा | ५.५९ | पश्चिम बंगाल | ३.०३ |

**स्टार्टअप अंतर्गत प्रमुख उद्योगांचे प्रमाण २०१८-१९**

| अ.क्र. | राज्य | टक्केवारी | अ.क्र. | राज्य | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुचना व सेवा | १५.२३ | २ | आरोग्य सुधार औद्योगिक व मानव विज्ञान | ८.९७ |
| ३ | शिक्षण | ८.०७ | ४ | व्यवसाय व वाणिज्य सेवा | ४.१५ |
| ५ | खादय पदार्थ | ४.१ | ६ | शेती | ३.७३ |
| ७ | अधिकांशन | ३.१० | ८ | नविकरणीय उर्जा | ३.०९ |
| ९ | इंटरनेट | ३.०५ | १० | औद्योगिक हार्डवेअर | ३.०४ |

वरील सारणीवरून स्टार्ट अप इंडिया या योजनेअंर्तगत अतिशय अल्प काळात सुरू झालेल्या नव उद्योगाची माहिती राज्यनिहाय व उद्योगनिहाय आपणास निदर्शनास येते. यातून महाराष्ट्र, कर्नाटक व दिल्ली या राज्यात सर्वाधिक उद्योग व सेवा सुरू झाल्या आहेत. तर सुचना प्राद्योगिकी, आरोग्य व शिक्षण क्षेत्रात गुंतवणूकीचे प्रमाण सर्वाधिक दिसून येते.

**स्टॅंड अप योजना :-**

स्टॅंड अप योजना १५ ऑगस्ट २०१५ रोजी पंतप्रधानाद्वारे घोषित करण्यात आली. या योजनेची प्रत्यक्ष सुरूवात ५ एप्रिल २०१६ रोजी माजी उप पंतप्रधान बाबू जगजीवन राम यांच्या जयंती

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed Dist.Nanded

...विषी करण्यात आली. या योजनेचा प्रमुख उद्देश अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिला उद्योजकांच्या उदयोजकतेला प्रोत्साहन देणे हा आहे. या योजनेचे लक्ष्य पुढील तीन वर्षात किमान २.५ लाख व्यवसायिकांना स्टँड अप इंडिया या योजनेचा लाभ मिळवून देणे हे आहे.

स्टँड अप इंडिया या योजनेत १) भारतीय लघूउद्योग विकास बँकेमार्फत (SIDBI) १०,००० कोटी रूपये स्टँड अप इंडिया योजनेस वित्तपूरवठा करण्यात येणार आहे. २) योजनेअंतर्गत प्रत्येक बँक शाखेतून अशा किमान २ प्रकल्पनांना लाभ मिळणार आहे. ३) बिगर कृषी क्षेत्रातील व्यवसायिकांना दहा लाख ते एक कोटी रूपये कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार असून या कर्ज फेडीचा कालावधी सात वर्षे असेल. ४) योजनेअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के रक्कम लाभार्थ्याद्वारे तर उर्वरित ७५ टक्के रक्कम कर्ज स्वरूपात उपलब्ध करण्यात येईल ५) या योजने अंतर्गत केंद्रीय अर्थमंत्रालयाचा वित्तीय सेवा विभाग समन्वयक म्हणून, तर राष्ट्रीय पतहमी वि[illegible]स्त कंपनी व एनसीजीटीसी योजनेचे संचालक देण्यात येणाऱ्या कर्जाची हमी घेतील.

अशा प्रकारच्या विविध महत्वपूर्ण तरतुदी अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व महिला उद्योजकासाठी उद्योजकीय स्थिरता व नवउद्योग सुरू करण्यासाठी करण्यात आल्या आहेत. या योजनेच्या माध्यमातून आद्योगिक क्षेत्रामध्ये मागास प्रवर्गातील उद्योजकांना व महिलांना नवसंधी उपलब्ध होणार आहे.

२. भारतीय अर्थव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या बाबींवर प्रकाश टाकणे.

**शोध निबंधाची गृहितके :**

१. २१ व्या शतकात भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकास दरात बदल झाला आहे.

२. भारतीय अर्थव्यस्थेने आधुनिक काळात अनेक नविन बदल आत्मसात केले आहे.

३. भारतीय अर्थव्यवस्थेत विकासाबरोबर अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.

**१. विकास दरातील बदल :**

आज भारताची आर्थिक महासत्तेच्या दिशेने वाटचाल होत आहे. याचे प्रमाण आपल्याला विकास दराच्या आधारावर करता येईल. भारताचा उच्च विकास दर हा १९५१ नंतर पहिली ३६ वर्षे आपला विकास दर वार्षिक सरासरी केवळ ३.५ टक्के इतका उच्च होता. व लोकसंख्या वाढीचा दर वर्षाला २.२ टक्के इतका उच्च होता. आर्थिक सुधारणांच्या पहिल्या दशकामध्ये विकासदर सहा

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

टक्क्यांवर गेला. २००८ पर्यंत तो नऊ टक्क्यांवर गेला. सप्टेंबर २००८ मध्ये सारे जग मंदीच्या खाईमध्ये लोटले गेले. परंतु भारताच्या आर्थिक विकासावर त्याचा थोडा प्रतिकुल परिणाम झाला. मात्र तो मर्यादीत होता. भारताचा विकासदर ६.८ टक्क्यांपर्यंत खाली आला. त्यानंतरच्या वर्षामध्ये प्रगत देश मंदीतून बाहेर येण्यासाठी धडपडत असताना भारताच्या अर्थव्यवस्थेने पुन्हा उसळी घेतली आणि विकासदर पुन्हा आठ टक्के झाला. २०१०-११ या आर्थिक वर्षात तर हा दर ८.६ टक्क्यांपर्यंत जाऊन पोहचला. बाराव्या पंचवार्षिक योजनेत (२०१२-२०१७) विकासदराचे उद्दिष्ट ९ ते ९.५ टक्के आहे. यावरुन असे म्हणता येईल की, बदललेल्या सहस्त्रकात भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर सुध्दा वाढीस लागला आहे.

**२. कृषी क्षेत्रातील परिवर्तने :**

२१ व्या शतकात भारतात अन्नधान्य उत्पादन आणि निर्यातीत वाढ झाली आहे. अगदी अलीकडचे उदाहरण पाहता सन २०१० मध्ये २३२.०७ दशलक्ष टन अन्नधान्य उत्पादन झाले. उत्पादकता आणि निर्यात वाढली. गुंतवणूक वाढल्याशिवाय शेतीक्षेत्राचा विकास होणार नाही हे लक्षात घेऊन शासनाने फूड सिक्युरिटी मिशनसारख्या योजना राबविल्या आहेत. त्यासाठी पुढील बदल करण्यात आले.

अकराव्या पंचवार्षिक योजनेत २००७-०८ मध्ये हजार कोटी रूपयांची राष्ट्रीय कृषी विकास योजना सुरू केली.

१ २००७-१२ या कालावधीत ७८९५.१२ कोटी रूपयांचा निधी या योजनेतंर्गत उपलब्ध करण्यात आला.

२ विविध पिकांच्या किमान आधारभूत किंमतीतही भरघोस वाढ करण्यात आली.

३ १९९९-२००० मध्ये ९२०० कोटी रूपये फूड सबसिडी देण्यात आली होती. ती २००९-१० मध्ये ती ५८,९८३ कोटी रूपयांपर्यंत ९,९२१ कोटी रूपयांवर पोहचली आहे.

४ मत्स्य, मांस, दूध उत्पादनात वाढ.

५ फूड सिक्युरिटी मिशन राष्ट्रीय कृषी विकास योजनांची अंमलबजावणी पिकांच्या किमान आधारभूत किंमतीतही वाढ.

६ १९९१ मध्ये शेतीतील गुंतवणूक ३,३५८ कोटी रूपये होती, २००९ मध्ये ती ३१,७५५ कोटी रूपयापर्यंत वाढली.

**३. शिक्षण क्षेत्रात परिवर्तन :**

१९९१ मधील जागतिकीकरणानंतर भारतीय अर्थव्यवस्था खुली झाली या खुल्या अर्थव्यवस्थेमध्ये शिक्षण व्यवस्थाही खुली आहे. गेल्या दोन दशकांमध्ये शिक्षणक्षेत्र खुले झाले. कालानुरूप अर्थव्यवस्थेला उपयुक्त मनुष्यबळ पुरविण्याचे आव्हान शिक्षणसंस्थांनी पेलले. इंजिनीअरिंग, कॉम्प्युटर, एमबीएसह

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

व्यावसायिक अभ्यासक्रमाची चलती झाली. सध्या सुमारे २० टक्के विद्यार्थी व्यावसायिक शिक्षण घेत आहेत.

२००३ साली सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतहासिक निर्णयामुळे शिक्षण संस्थाचालकांनी नफा घेण्याची मुभा देण्यात आली. त्यामधूनच बालवाडीपासून पदव्युत्तर दर्जाच्या शिक्षणामध्ये खासगीकरणाची लाट आली. उद्योग विश्वातील अग्रणींनी शिक्षणसंस्था काढल्या. परंतु खासगी विरूद्ध सरकारी असा लढाही शिक्षण विश्वात उभा राहिला. एकूणच २०१२ पर्यंत देशातील शिक्षणविश्वाची ६८ अब्ज डॉलरची बाजारपेठ उभी राहत आहे.

**शिक्षण क्षेत्रातील प्रामुख्याने घडून आलेले बदल**

१ १९९१ साली देशात १८४ विद्यापीठे होती. सध्या ४५० पेक्षा अधिक विद्यापीठे आहेत.

२ १९९१ मध्ये ५७४८ महाविद्यालये सध्या ३५ हजारापेक्षा अधिक महाविद्यालये आहेत.

३ परदेशात शिक्षण घेण्याऱ्यांवर ५५०० कोटी रू. खर्च केला जात असून परदेशी विद्यापीठे भारताच्या उंबरठ्यावर आहेत.

४ १९९१ मध्ये शिक्षणासाठी ९७७ कोटी रू. अर्थसंकल्पीय तरतूद तर २०११ मध्ये ५२,००० कोटी रू. तरतूद करण्यात आली.

**४. तंत्रज्ञानातील बदल**

२१ व्या शतकात भारतीय अर्थव्यवस्थेने तंत्रज्ञानातील व्यापकता आणि परिपूर्णतः हा एक प्रमुख बदल आत्मसात केला आहे. कम्प्यूटर्सच्या क्षेत्रात मूर्स लॉ आहे. याचा व्यापक अर्थ असा की, दर दोन वर्षांनी दुप्पट क्षमता असणारे तंत्रज्ञान विकसीत होत आहे. कम्प्यूटर्सपासून मोबाईल फोनपर्यंत विविध तंत्रज्ञानाबाबत हा अनुभव आपण सारे घेत आहोत. तंत्रज्ञान क्रांतीमुळे सामान्य माणसाकडेही मोबाईल फोन आला असून, त्यामुळे त्यांचे सबलीकरण होण्यास मदत होत आहे. मोबाईल फोन, कम्प्यूटर आणि इंटरनेट यांच्या सहाय्याने दारिद्रय निर्मुलन करण्याचे विविध प्रयोग चालू आहेत. याच तंत्रज्ञान क्रांतीमुळे ज्ञानाला भांडवल म्हणून मान्यता मिळाली आहे. सॉफ्टवेअर क्षेत्रातील भारताच्या यशोगाथेचा पायाच यामुळे रचला गेला आहे. खुद्द भारतात पुण्यामध्ये सीडॅकने सुपर कम्प्यूटर विकसित केला. इंटेलपासून मायक्रमोसॉफ्टपर्यंत अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात संशोधनकेंद्र सुरू केल्याने ग्लोबल आर अॅड डी सेंटर म्हणूनही भारताकडे पाहिले जात आहे.

तंत्रज्ञानामुळे घडून आलेले बदल

१ दर दोन वर्षांनी तंत्रज्ञानाच्या क्षमतेत दुपटीने वाढ होत असून तंत्रक्रातीमुळे ज्ञानाला भांडवल म्हणून मान्यता मिळाली.

२ ग्लोबल आर अॅड डी म्हणून भारताचा उदय झाला असून भारताची वाटचाल ज्ञानधिष्ठित समाजाकडे वाटचाल होत आहे.

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

५. भारत हा शहरांचा देश :

२१ शतकात भारतीय अर्थव्यवस्थने केलेला ग्लोबलायझेशन स्वीकार यामुळे भारत हा खेड्यांचा देश ही भारताची ओळख हळूहळू पुराली जात असून, नवा भारत शहरामध्ये विराजमान होत आहे. सध्या देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ३० टक्के जनता शहरात राहत आहे. यासाठी शहरी भागातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी महत्त्वाकांक्षी जेएनएनयूआरएम शहरांनी पायाभूत सुविधांच्या विकासासाठी भरीव निधी देण्यात येत आहे. भारतात सध्या दहा लाखांहून अधिक लोकसंख्या असणारी ५० शहरे आहेत. देशांत सर्वात जास्त शहरीकरण झालेले राज्य म्हणून तामिळनाडू आघाडीवर (५४.४ टक्के) असून त्यापाठोपाठ महाराष्ट्राचा (४६.२ टक्के) दुसरा क्रमांक लागतो.

१ शहरांतील २५.७ टक्के जनता दारिद्रयरेषेखाली असून बृहन्मुंबईतील तब्बल ५४ टक्के जनता दारिद्रयरेषेखाली आहे.

२ २०३१ पर्यंत शहरी लोकसंख्या ६० कोटीवर पोहचणार असून शहरातील समस्या कमी करण्यावर भर देण्यात येत आहे.

६. भारतीय अर्थव्यवस्थेतील बदल :

भारतीय अर्थव्यवस्थेतील जी.डी.पीचे क्षेत्रनिहाय विवरण अभ्यासता अर्थव्यवस्थेत क्षेत्रनिहाय झालेल्या परिवर्तनाचे आकलन होण्यास मदत होते.

तक्ता क्र. १ भारताच्या जी.डी.पी मधील विविध क्षेत्राचा हिस्सा

| वर्ष | कृषी क्षेत्राचा (% हिस्सा) | उद्योग क्षेत्र (% हिस्सा) | सेवा क्षेत्र (% हिस्सा) |
|---|---|---|---|
| १९५०-५१ | ५३.१ | १६.६ | ३०.३ |
| १९६०-६१ | ४८.७ | २०.५ | ३०.८ |
| १९७०-७१ | ४२.३ | २४.० | ३३.८ |
| १९८०-८१ | ३६.१ | २५.९ | ३८.० |
| १९९०-९१ | २९.६ | २७.७ | ४२.७ |
| २०००-०१ | २२.३ | २८.० | ५०.४ |
| २००५-०६ | १८.३ | २७.८ | ५३.८ |
| २०१०-११ | १४.५ | २७.० | ५७.७ |

(स्त्रोत : भारतीय अर्थव्यवस्था, भागीरथ स्पर्धा परिक्षा केंद्र पुणे. पृष्ठ क्र. १२)

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

उपरोक्त तक्त्यावरून स्पष्ट होते की, १९५१ नंतर झालेल्या नियोजनाच्या विकास भारतीय अर्थव्यवस्थेत बदल घडून आणण्याचा मार्ग ठरल्या त्या भारतीय अर्थव्यवस्थेत एकेकाळी कृषी क्षेत्राचा वाटा जास्त होता तो नियोजनानंतर कमी होत गेला आणि २१ व्या शतकात हा वाटा २२.३ टक्के नंतर १८.३ आणि आता १४.५ टक्क्यावर येऊन पोहचला आहे. तसेच उद्योगांचा वाटा हा वाढला असून सन २००५ मध्ये हे प्रमाण २७.७ वरून २८.० टक्के वर पोहचले. विकासाचे सूचक म्हणून जागतिक पातळीवर देशाच्या सेवा क्षेत्रातील हिस्सा वाढणे आवश्यक असून हे प्रमाण १९५०-५१ पासून वाढत जाऊन २१ व्या शतकात ५०.४ टक्के तर सन २०१०-११ मध्ये ५७.७ टक्क्यावर पोहचले आहे. ही बाब विकासासाठी अनुकूल आहे.

२१ व्या शतकात भारतीय अर्थव्यवस्थेचा चेहरामोहरा बदलण्यास महत्त्वपूर्ण ठरलेल्या काही महत्त्वपूर्ण बाबी पुढीलप्रमाणे

१ सर्विस सेक्टरचा खऱ्या अर्थाने उदय झाला. १९९० पूर्वी भारतातील हे सेक्टर मर्यादित होते.

२ स्वातंत्र्यानंतर औद्योगिकीकरणावर भर दिला. त्यामुळे एकूण देशांतर्गत उत्पादात शेती खालोखाल औद्योगिक क्षेत्राचा वाटा अधिक होता. मात्र उदारीकरणानंतर म्हणजे १९९० नंतर सेवा क्षेत्राने हळूहळू गती पकडण्यास सुरुवात केली. हॉटेल्स, कम्युनिकेशन, रिअल, इस्टेट, वित्त, इन्फोमेशन टेक्नॉलॉजी (आयटी) यांची वाढ जोमाने झाली. आयटी आणि आयटीईएस यांच्यामुळे देशाची वाढ होण्यास मोठा हातभार लागला.

३ आयटी क्षेत्राचा नव्याने उदय झाला असून एकूण रोजगारात सेवा क्षेत्राचा वाटा २३ टक्के इतका आहे.

४ १९९१ मध्ये सेवा क्षेत्राचा देशातील जीडीपीतील वाटा १८ टक्के होता तो २००९-१० मध्ये ५७ टक्क्यापर्यंत वाढला.

५ आयातीवरील बंधने उठली असून थेट परकीय गुंतवणूकीचा मार्ग मोकळा झाला आहे.

६ देशातील जीडीपीतील वाटा १९९१ मध्ये ५.५६ टक्के होता तो २०११ मध्ये ७.८ टक्के झाला.

**भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने :**

भारतीय अर्थव्यवस्थेत झपाट्याने झालेले बदल व त्यामुळे महासत्तेचे स्वप्न पाहणाऱ्या अर्थव्यवस्थेची ही वाटचाल निष्कंटक असेल असे मानणे अर्थातच चुकीचे आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत विकासमार्गावर अनेक आव्हाने उभी आहेत तर काही उभी राहण्याचा संभव आहे. ती आव्हाने म्हणजे-

१ पाणी, वीज, रस्ते, बंदरे, टेलिकम्युनिकेशन यांसारख्या पायाभुत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी लागणार आहे.

२ आर्थिक विकासाच्या प्रत्येक संधीच्या बाबतीत पर्यावरणाचे परिणाम लक्षात घ्यावे लागतील.

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded

ISSN 2250-169X
June 2022 To Nov. 2022

विकासदर वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहत असतानाच पर्यावरणाची हेळसांड करून चालणार नाही.

३. भ्रष्टाचाराच्या भस्मासुराला प्रभावी आळा घालण्यासाठी पारदर्शी प्रशासन पाहिजे अन्यथा विकासात्मक योजना केवळ कागदावर राहतील त्यांची अंमलबजावणी होणार नाही.

४. देशात व्यावसायिक शिक्षण केवळ २ टक्केच आहे. हे शिक्षण क्षेत्रातील एक आव्हान आहे. त्यात वाढ करण्याची गरज आहे.

५. शिक्षण व्यवस्थेवर होणारा खर्च किमान सहा टक्के असण्याची शिफारस कोठारी आयोगाने केली होती परंतु अद्यापही हा खर्च ४ टक्क्यांपेक्षा जास्त होऊ शकला नाही.

६. वेगाने वाढणाऱ्या शहरीकरणाला नियोजनाची जोड आवश्यक आहे.

एकंदरीत एकीकडे भारतीय अर्थव्यवस्था वेगाने पुढे जात आहे परंतु देशांतर्गत वाढणारा भ्रष्टाचार, लोकसंख्या, दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण, स्त्रियांचे कमी होणारे प्रमाण, बेरोजगार, व्यसनाधिनता या आव्हानांना तोंड देत भारतीय अर्थव्यवस्था विकासाच्या दिशेने पुढे जात आहे. परंतु भारतीय अर्थव्यवस्था सक्षम होत आहे. गेल्या दोन दशकातील अनुभव घेता आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये आहे.

## संदर्भ सूची :-

१) Report on Trends and progress of India. २००२.
२) Business world, ४ Dec २००६. Page no.८४
३) साठे मधुसूदन. भारताच्या आर्थिक समस्या भाग-१
४) गुप्ता सी.एस. आधुनिक भारतीय अर्थव्यवस्था.
५) भोसले के.एम. काटे. के.बी., स्वांत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्था,
६) राजन कोलांबे, भारतीय अर्थव्यवस्था, भागीरथ प्रकाशन, पुणे.

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

3

2021-2022

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*1 June-2021 Volume-11 Issue-16*

*On*

## *Sustainable Development Goals: Initiatives, Execution and Challenges*

Balaji p. Kharabe

**Chief Editor**

Dr. R. V. Bhole

'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

**Guest Editor**

Dr. Prof. H. B. Rathod
Principal
Gramin (ACS) Mahavidyalaya, Vasantnagar (Kotgyal), Tal. Mukhed

**Executive Editors**

**Dr. V. T. Naik** **Mr. B. C. Rathod**

Co- Editors

**Dr. D. K. Kendre**
**Mr. S. A. Jewale**
**Dr. U. D. Padamwar**

Editorial Board

| | | | |
|---|---|---|---|
| Mr. Thorve A. B. | Prof. Zamapalwad S. S. | Prof. Kalyan G. S. | Dr. Kshirsagar S. G. |
| Shri. Dethe S. K. | Shri. Kalimath S. K. | Shri. Babarao S. | Mr. Kankute S R. |
| Prof. Shinde P. A. | Prof. Pawar S. K. | Sow. Itkapalle A. P. | Dr. Gore S. Y. |
| Shri. Mathpati G. H. | Shri. Patil S. S. | Mr. Naik N. U | |

**Published by- Principal, Dr. Prof. H. B. Rathod, Gramin (ACS) Mahavidyalaya, Vasantnagar (Kotgyal), Tal. Mukhed**

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

**PRINCIPAL**
**Swami Vivekanand Mahavidyalaya**
**Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded**

| | | | |
|---|---|---|---|
| 23 | शाश्वत कृषी विकास : एक भौगोलीक अभ्यास | प्रा.डॉ. निनकर विजय गोजी | 89-90 |
| 24 | NPS एक संस्था – एक चिकित्सक अभ्यास | प्रा. गोवर्धन कृष्णाहरी विकोंवा | 91-93 |
| 25 | कोकणातील लाल सोनं - जांभा दगड (Laterite stone) | Tendolakar Dipa Dattaram | 94-96 |
| 26 | हदगाव भोकर तालुक्यातील साक्षरता प्रमाण | बोधले कविता केरबा | 97-100 |
| 27 | लिंगभाव व लिंगभेद असमानता सामाजिक समस्या: एक अभ्यास | प्रा.कदम करुणा लक्ष्मणराव | 101-102 |
| 28 | शाश्वत उपाय जलपुनर्भरण एक भौगोलिक अभ्यास | प्रो. डॉ. नाईक व्ही.टी., प्रा. देडे एस. के. | 103-105 |
| 29 | लिंगभाव समानता आणि साहित्य : स्त्री संतांचे समाज विकासातील योगदान | प्रा.डॉ.कविता चंद्रकांत लोहाळे | 106-109 |
| 30 | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार व सद्यस्थिती | प्रा.डॉ.सखाराम यशवंतराव गोरे | 110-112 |
| 31 | शाश्वत विकास आणि भारतातील ग्लोबल हंगर इंडेक्स | प्रा.रोहिणी निवृत्ती अंकुश | 113-116 |
| 32 | लिंग समभाव : काळाची गरज | प्रा. कांबळे शिवाजी ईरबा | 117-121 |
| 33 | अनुसूचित जातींच्या संकल्पनेचा विश्लेषणात्मक अभ्यास | प्रा.डॉ.बसंत तुकाराम नाईक नारायण हणमंतराव पांचाळ | 122-125 |
| 34 | चिरंतन विकास - एक भौगोलिक आढावा | प्रा.डॉ.अनिल निवृत्ती शिंदे | 126-130 |
| 35 | लातूर जिल्ह्यातील प्राथमिक बाजारकेंद्राचे व्यापारक्षेत्र एक भौगोलिक विश्लेषण | प्रा. डॉ. गोंड नामदेव संपतराव | 131-133 |
| 36 | समाजाच्या जडणघडणीत साहित्याची भूमिका:एक अभ्यास | प्रा.डॉ.बालाजी परबतराव खराबे | 134-138 |
| 37 | लिंगभाव विरहित समाज रचना एक अभ्यास | पांचाळ नारायण हनमंतराव | 139-144 |
| 38 | दर्जेदार शिक्षण आणि वास्तव परिस्थिती | स.प्रा. भारतभूषण वामनराव बाळबुधे | 145-149 |
| 39 | नैसर्गिक व मानवी संसाधने एक अभ्यास | प्रा.डॉ.भरत माधवराव मुस्कावाड | 150-154 |
| 40 | शाश्वत विकासात जलसंवर्धनामध्ये 'आभासी पाणी' संकल्पनेचे महत्त्व | डॉ. नागनाथ माधवराव फड | 155-158 |
| 41 | प्राथमिक व माध्यमिक विद्यार्थ्यांचा भाषाविकास | कदम गणेश पुंडलिकराव, प्रा.डॉ.वैजयंता ना.पाटील | 159-163 |
| 42 | दुर्बल घटकांचे सबलीकरण ग्रामीण विकासाचा मार्ग (ग्रामीण विकास विभाग) | डॉ. संजय भास्कर तायडे | 164-166 |
| 43 | भारत : शाश्वत वाद आणि विकास | डॉ. हरी साधू वाघमारे | 167-171 |
| 44 | पर्यावरण संवर्धन काळाची गरज - एक चिकित्सक भौगोलिक अभ्यास | प्रा.डॉ. भाऊसाहेब सोनाजी देवकर | 172-176 |




PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad To.Mukhed.Dist.Nanded

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 1June-2021, Volume-11, Issue-16, Sustainable Development Goals: Initiatives, Execution, & Challenges

# समाजाच्या जडणघडणीत साहित्याची भूमिका:एक अभ्यास

*प्रा.डॉ.बालाजी परबतराव खराबे*

*मराठी विभागप्रमुख, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रामबाद, ता.मुखेड जि.नांदेड*

*E-male:kharabebalaji68@gmail.com*

**प्रस्तावना :-**

साहित्याचा समाजाशी जो संबंध आहे तो बाहय किंवा उपरा नसून ती एक अंतर्गत बाब आहे. साहित्यातून 1
मानवी जीवनाचा बोध आणि सामाजिक वास्तवता जाणून घेता येते. साहित्यिक ज्या परिस्थितीत समाजात वावरतो त्याच परिस्थितीचे साहित्याद्वारे मांडत असतो. 19 व्या शतकात आधुनिक जाणीव व दृष्टिकोणातून साहित्य निर्मीतीला, नवा आशय मांडण्याला सुरुवात झाली. त्यामुळे साहित्याद्वारे सामाजिक परिवर्तनाला आणि सामाजिक परिवर्तनाद्वारे साहित्य निर्मितीला चालना मिळाली. साहित्य आणि समाज यातील परस्पर संबंधाच्या अनुबंधाद्वारे समाजाचा
समाजशास्त्रीय अभ्यास करण्याला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. त्यामुळे समाजशास्त्रात साहित्याचे 'समाजशास्त्र' 2
(Sociology of Literature) ही ज्ञानशाखा उदयास आली. यां संदर्भात पाश्चिमात्य समाजशास्त्रज्ञाचे विचार जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. हंगेरीयन समाजशास्त्र जार्ज लुकासने सर्वप्रथम साहित्याचे 'समाजशास्त्र' ही संज्ञा उपयोगात आणली. ऑगस्त कॉम्सने 'वैज्ञानिक' दृष्टिकोणातून साहित्याचे अध्ययन केले. विल्फ्रेड पॅरोटाने 'तार्किक अतार्किक' घटकास प्राधान्य देऊन साहित्याच्या बोधासाठी अवशेष सिद्धांत मांडला. मॅक्स वेबरने 'आदर्श प्रारुपाद्वारे' साहित्याचे विश्लेषण केले. तर एमिल डरखीमने साहित्य 'समाजाप्रमाणे तथ्य' आहे असे प्रतिपादन केले. साहित्य ही व्यक्तीमूलक घटना नसून ती 'सामुहिक चेतना' (collective consciousness) चा परिपाक आहे.

**संशोधन समस्या :-**

संशोधन समस्या ही संशोधनाची प्रथम पायरी आहे. त्यामुळे कोणतेही संशोधन कार्य हाती घेत असताना संशोधकाला संशोधनाची समस्या निश्चित करावी लागते. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात **समाजाच्या जडणघडणीत साहित्याची भूमिका एक अभ्यास** ही संशोधनाची समस्या निवडली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. साहित्य आणि समाज यामधील परस्पर संबंध जाणून घेणे.
2. साहित्याद्वारे सामाजिक परिवर्तनाला चालना मिळते का? यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :-**

तथ्य संकलणाच्या अनेक पद्धती आहेत. परंतु मानव्यविद्या शाखेशी संबंधित असणारी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा प्रस्तुत संशोधनासाठी उपयोग करण्यात आला आहे.

**साहित्याचा अर्थ :-**

साहित्य म्हणजे समाजाशी निगडित एखाद्या विषयासंबंधी केलेले अथपूर्ण लिखाण म्हणजे साहित्य होय. समाजाच्या मुशीतून साहित्यिकाची वैचारिकता वैचारिक पार्श्वभूमी तयार होते. ॲलन स्विगवूडच्या मते, समाजिक दर्जा, अभिवृत्ती, बांधिलकी, जीवनात त्यांना आलेले यशापयश या सर्वांचा प्रत्यक्ष परिणाम त्यांच्या व्यक्तीमत्व यातूनच साहित्यीक उदयास येतात. साहित्य केवळ अमृत, काल्पनिक, भावनिक व चमत्कारीक ठरत नाही. तर वास्तविक ठरते



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

साहित्याद्वारे समाजातील विविध समुह, सामाजिक संस्था, सामाजिक संरचना, सामाजिक संबंध, सहकार्य, संघर्ष, प्रेरणा, अभिवृती इत्यादी पैलुंची पायाभरणी साहित्यातून होते.

**साहित्याचे प्रकार :-**

साहित्याच्या प्रकाराची दोन भागात विभागणी केली जाते. कलावादी साहित्य आणि जीवनवादी साहित्य यांचे पुढील प्रमाणे विश्लेषण केले आहे.

1. **कलावादी साहित्य**

ना.सी. फडके, बा.सी.मर्ढेकर, गंगाधर गाडगीळ, पु.शि.रेगे, माधव आचवल, डॉ.द.भि. कुलकर्णी इत्यादी साहित्यीक साहित्याला एक कलाकृती सौंदर्यकृती म्हणून पहातात. यांच्या मते, मानवी जीवन दुःख, कटु अनुभव, दाहकता इत्यादींनी व्यापले आहे. त्यातून मुक्त होण्यासाठी माणुस साहित्याकडे वळतो, तेव्हा साहित्याद्वारे पुन्हा माणसाला दुःख देणे अयोग्य ठरते असे कलावादी साहित्यिक मानतात.

2. **जीवनवादी साहित्य**

वि.स. खांडेकर, दि.के.बेडेकर, म.ना.वानखेडे, शरदचंद्र मुक्तीबोध, म.भी.चिटणीस, रा.ग.जाधव, गं.भा. सरदार, भालचंद्र फडके, नरहर कुरुंदकर, बाबुराव बागूल, रावसाहेब कसबे, यशवंत मनोहर इत्यादी साहित्यीकांनी साहित्याची मांडणी जीवनवादी दृष्टिकोनातून केली आहे. यांच्या मते, मनोरजन करणे हा साहित्याचा उद्देश नाही तर मानवी प्रश्न व दुःखाला वाचा फोडणे, समाज सुधारणा घडवून आणणे महत्वाचे ठरते, असे जीवनवादी साहित्यिक मानतात. जीवनवादी साहित्याची मानवी मूल्यांवर भक्कम श्रद्धा आहे. त्याला मानवी मूल्यावर आरुढ झालेले समाज जीवन अभिप्रेत आहे. अलिकडील काळात या जीवनवादी साहित्याने समग्र समाज व्यवस्थाच ढवळून काढली आहे. या साहित्याला जीवनात व जगण्यात अर्थ वाटतो. त्यामूळे ते जीवन वास्तवाला सामोरे जाते. जीवनाची बुद्धीनिष्ठ चिकित्सा करते. समाजाचे प्रश्न समजून घेत या साहित्यातील जीवनभिमुखता हीच या साहित्याला शक्ती व सामर्थ्य देऊ शकते.

**साहित्याची जडणघडण :-**

'साहित्याची निर्मिती हस्तिदंती मनोऱ्यात किंवा समाज व्यवहारापासून दूर असलेल्या पोकळीत होत नाही आणि तशी ती झाली तरी या प्रकारचे साहित्य श्रेष्ठ दर्जाचे ठरत नाही. वाङ्मयनिर्मितीची पाळेमुळे समाजव्यवस्थेत रुजलेली असतात. लेखकाचा साहित्यिक पिंड घडवण्याला तत्कालीन सामाजिक परिस्थिती, विचारप्रणाली, वाङमयीन शैली मोठया प्रमाणात कारणीभूत असतात. लेखकाला तत्कलीन परिस्थीतीमध्ये जे बरे-वाईट अनुभव, येतात तो जे निरीक्षण करतो ते आपल्या लेखणीद्वारे अभिव्यक्त करतो. लेखकाचे समाजातील स्थान कोणते यावरुन त्याच्या साहित्याचित्रणाचे स्वरुप स्पष्ट हाते'समाजाच्या स्थितिगतीशी व प्रतिभा शक्तीच्या प्रेरणेशी साहित्य निर्मिती निगडीत असते. साहित्य परिस्थितीजन्य, सांस्कृतिक, भावनिक, वैचारिक इत्यादी अविष्कारातून उदयास येते. कारण साहित्य स्वभावतःच समाजभिमुख असते. त्यात सामाजिक जाणिवेचे प्रतिबिंब उमटते, समाजाचे स्थितीचित्रण घडून येते. त्याहीपेक्षा त्यातून सामाजिक परिवर्तनाचे दर्शन घडते. समाजातील परपस्परविरोधी घटकांचे संबंध व्दंव्दांतमक असतात. त्यातील अंतिविरोधाची मूलगामी चिकीत्सा केल्यास ते साहित्य श्रेष्ठ दर्जाचे ठरते. साहित्य हा संस्कृतीचा एक घटक असतो. याचा अर्थ साहित्यातून समाजाचे आणि संस्कृतीचे बाह्यरुपच नव्हे तर प्रेरणा, प्रवृत्ती, परंपरा यादेखील व्यक्त होतात असे जोसेफ रुसेक यांनी Sociology of Literature या ग्रंथात म्हटले आहे. साहित्यनिर्मिती साहित्यिकाच्या निर्मीती क्षमतेचा परिपाक दिसत असली तरी समाज व त्या समाजाची संस्कृती यांचा त्या साहित्य निर्मितीमध्ये महत्वाचा वाटा असतो हे विसरता येत नाही.



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

**समाज व साहित्याचा परस्पपर संबंध :-**

साहित्य आणि समाजाचा पररपर संबंध आहे किंवा साहित्य हा समाजाचा आरसा आहे असे म्हटले जाते. साहित्यिकांच्या साहित्यकृतीत समाजाचा एक सदस्य म्हणून त्याला आलेले अनुभव, सामाजिक घटनेचे प्रत्यक्षीकरण, सामाजिक बोध यांचे यथार्थ चित्रण करण्याची क्षमता आणि इच्छा यांचा प्रभाव साहित्यावर पडतो. साहित्यिक समाजविघातक शक्तिविरुद्ध सामाजिक चेतना निर्माण करण्याचे कार्य करतो. त्याद्वारे परिवर्तनाच्या सक्रिय प्रयत्नांना प्रेरणा मिळते. या अर्थाने साहित्यिक श्रेष्ठीजणांची भूमिका मांडतो. साहित्यिकाला परिवर्तनाच्या विविध प्रवाहाचे झालले आकलन, समाज जीवनाबाबतची आलेली समज, त्याची वैचारिक बांधिलकी इत्यादींच्या बळावर तो नवसमाज निर्मितीचे चालणा देण्याचे काम करतो. समाजशास्त्रज्ञ आणि साहित्यिक यांच्यामध्ये मुलभूत फरक हा की, समाजशास्त्र वस्तुनिष्ठतेवर भर देऊन सामाजिक वास्तवतेचे चिकित्सक परिक्षण करतात तर साहित्यिक व्यक्तिनिष्ठ व संवेदनशील जाणिवेतून समाज जीवनाचे चित्रण करतात.

**साहित्यीकांचे समाज आणि साहित्य याबद्दल मतांतरे :-**

वेगवेगळया साहित्यीकांनी साहित्य आणि समाज यामधील अंतःसंबंधाचे विश्लेषण केले आहे. ते खालील प्रमाणे.

1. **एच.डी.डंकन**

यांनी साहित्यांचा आंतरक्रिया दृष्टिकोणाद्वारे एक स्वायत्त सामाजिक संस्था म्हणून विचार केला आहे. कोणत्याही साहित्याची समाजशास्त्रीय मिमांसा ही नेहमी साहित्यिक समीक्षक वाचक यांच्यात होणाऱ्या आंतरक्रियावर आधारीत असते. या तीन घटकात होणाऱ्या आंतरक्रियांची तीव्रता नेहमी सारखीच नसते. कधी वाचक व लेखक यांच्यात घनिष्ठता तर कधी लेखक व समीक्षकात घनिष्ठता प्रस्थापित होते. परिस्थितीनुसार त्यांच्यातील संबंधाचे स्वरुप बदलते. साहित्याचे मूल्यामापन, समर्पक गुण, पैलू, सामर्थ्य व मर्यादांची उकल करण्यामध्ये समीक्षकांची भूमिका महत्वाची ठरते. साहित्यातील भावविचार वास्तविक अर्थासह वाचकापर्यंत पाचवण्याचे कार्य समीक्षक करतो. क्लिष्ट समाजव्यवस्थेत समीक्षकाची चिकीत्सक विचारदृष्टी अर्थपूर्ण ठरते. परंपरागत साध्या समाजव्यवस्थेत मात्र साहित्यिक आणि वाचक यांच्यात प्रत्यक्ष संवाद प्रस्थापित होऊ शकतो.

2. **जॉर्ज हुको**

या समाजशास्त्रज्ञाने सामाजिक संरचनात्मक दृष्टीकोणाद्वारे साहित्य आणि समाज यामधील परस्पर संबंधाचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते सामाजिक संरचनेत निर्माण होणारे असंतुलन विशिष्ट प्रकारच्या सामाजिक व मानसिक तणावांना जन्म देते. त्याची अभिव्यक्ती त्या कालखंडात निर्माण होणाऱ्या साहित्यामधून व्यक्त होते. या दृष्टिकोणाद्वारे आपण साहित्याच्या माध्यमातून एखाद्या विशिष्ट कालखंडातील सामाजिक ताणतणाव व त्यामागील कारणांचे अध्ययन 1
करु शकतो. पाश्चिमात्यिकरण, औद्योगिकरण, नागरीकरण इत्यादीमूळे कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक जीवनात जो ताणतणव व संघर्ष निर्माण झाला आहे. त्याचा प्रभाव आधुनिक साहित्यावर पडलेला दिसून येतो. त्यामुळे साहित्यिकास
साहित्य निर्मिती करण्यास जी सामुहिक चेतना प्रवृत्त करते त्याअर्थाने व व्यापक दृष्टिकोणातून साहित्याचे आकलन होणे 2
महत्वाचे ठरते. 3

3. **कार्ल मार्क्स**

कार्ल मार्क्स यांच्या मते, अर्थव्यवस्था ही मुलभूत संरचना तर साहित्य हे अधिसरंचनेचा भाग ठरते असे मानले आहे. 4
परिस्थीती आणि वर्गीय जाणिवेला अनुसरुन साहित्यिक आपल्या भावना प्रकट करतो. आर्थिक स्थिती, वर्ग, वर्गीय जाणिव, वर्गीय हितसंबध, दारिद्रय, दुरावा, व्दंद्व आणि संघर्ष यासारख्या संकल्पनांना अनुसरुन मार्क्सवादी साहित्यिक आपली भूमिका स्पष्ट करतात. यासंदर्भात वि.स.जोंग म्हणतात, 'मार्क्सवाद समाज परिवर्तन घडविणारे साहित्य उत्कृष्ट



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

मानतो. नवे स्विकारण्याची प्रेरणा मार्क्स देतो म्हणून साहित्याने मार्क्सच्या प्रेरणेपासून दुर जाता कामा नये. मार्क्सने भांडवलशाही समाज व्यवस्थेतील दोषांची जाणिव करुन देऊन शोषितांना मुक्त करणे हा असला तरी आर्थिक प्रश्नाबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक अस्मिता, प्रतिष्ठा ही पण तितकीच महत्वाचे असल्याचे सांगितले. कारण आर्थिकदृष्ट्या संपन्नता आली तरी सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होईलच असे नाही. भारतीय समाजात जातिव्यवस्था आहे. त्यामूळे येथे तंतोतपणे मार्क्सवाद लागम पडत नाही, असे काही साहित्यिकांना वाटते. म्हणून डॉ. सदा क-हाडे सारखे साहित्यिक 'मार्क्स आणि आंबेडकरवादाच्या समन्वयानेच परिवर्तनाला गती येऊ शकते, यावर विश्वास ठेवतात. आंबेडकरी विचारातून निर्माण झालेली आस्मिता ज.वि.पवार यांना अस्वस्थ करुन टाकते. या संदर्भात ते म्हणतात की, रोज रात्री मार्क्स मला थोपटून झोपवतो तर आंबेडकर मात्र आतडयांत लाव्हा भरुन खडबडवतो.

वरील प्रमाणे साहित्य आणि समाज यामधील अंत:संबंधाची ग्रामीण साहित्याच्या आधारे समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून उकल करण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण साहित्य हे प्रत्यक्ष जीवन अनुभवातून निर्माण झाले असून ते जीवननिष्ठ आहे. त्यामुळे ग्रामीणाचा समाज साहित्याशी प्रत्यक्ष घनिष्ठ संबंध आहे. या संदर्भात प्रा.डॉ. प्रकाश बोबडे म्हणतात. महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गोपाळ गणेश आगरकर यांच्या लिखानात सामाजिक समतेच्या मूल्यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. या साहित्यिकांचे लिखाण आज देखील या मूल्यांच्या प्रसाराच्या दृष्टीने प्रेरणादायक आहे. स्वातंत्र्योतर काळातील ग्रामीण साहित्य चळवळींची बिजे याच लिखाणात शोधता येतील. त्या काळातील व आजही आढळून येणाऱ्या सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंब आपणास या साहित्यात दिसते. साहित्यिकांनी सामाजिक जाणिवेतून आपले जीवनानुभव अभिव्यक्त केले आहेत. त्यामुळे त्यांची अभिव्यक्ती व्यक्तिकेंद्री नसून समूहकेंद्री रुप धारण करते. कष्टप्रद जीवन जगणारा, गावगाड्यात प्रत्यक्ष कृतिशील भूमिका पार पाडणारा ग्रामीण माणूस उपेक्षित राहिला? तो संवर्णाच्या दयेवर का अवलंबून आहे याचा ग्रामीण साहित्यीक शोध घेताना दिसून येतात. सांस्कृतिक कप्पे, दुभंगलेले सामाजिक जीवन, त्यांचे कौटुंबिक जीवन, जातीव्यवस्थेतील गट आणि चळवळी करणाऱ्या सक्रीय संघटना या सर्वांची वैचारिक प्रक्रीया, स्वाभाविक प्रतिक्रीया कशा होतात. या सर्वांच्याबद्दल सत्यावलोकनाची दृष्टी ग्रामीण साहित्यातून प्राप्त होऊ शकते. ग्रामीण साहित्यिक स्वतःच सामाजिक, सांस्कृतिक भेदाचे बळी ठरले आहेत. त्यामूळे त्यांनी आपल्या अपमानित जीवनाचे सुक्ष्म निरीक्षण करुन विश्लेषण केले आहे. सामाजिक संरचना, सामाजिक परंपरा, सामाजिक परिवर्तन, व्यक्ती आणि समाज याचा परस्पर संबंध, कुटुंबजीवन, समाजकार्य, समाजसेवा, समाजकल्याण, समाजव्यवस्था इत्यादी अनेक विषय सामाजिक विश्लेषणाचे अभ्यास विषय ग्रामीण साहित्याचे विषय राहिले आहेत.

**निष्कर्ष :-**

1. साहित्याद्वारे सामाजिक परिस्थितीचे यथार्थ आकलन करता येते. कारण साहित्यिक ज्या समाज व्यवस्थेत व संस्कृतीत रहातो. त्याचा प्रभाव त्याच्या विचारसरणीवर पडतो. त्यामुळे साहित्य आणि समाज यांचा परस्पर घनिष्ट संबंध असतो.
2. पारंपरिक व आधुनिक साहित्यातून क्रियाशीलता व समाजभिमुखता विकसीत होत असल्याने सामाजिक परिवर्तनाला चालणा मिळत आहे.
3. समाजाला योग्य दिशा दाखविण्याचे काम साहित्य करीत असतात.
4. ज्या-ज्या वेळी देशावर संकटे आली तेव्हा-तेव्हा त्या संकटांचा सामाना करण्यासाठी साहित्यांनी महत्त्वपूर्ण भजावली आहे.

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad To.Mukhed.Dist.Nanded

Swami Vivekanand Mahavidyalaya, Mukramabad Ta.Mukhed

संदर्भग्रंथ :-


1. नगेन्द्र जाधव, साहित्य का समाजशास्त्र, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, नयी दिल्ली, 1982
2. प्राचार्य नरहर कुरुंदकर, निकाय, नागपूर, एप्रिल 1976
3. बालकृष्ण कवठेकर, वाङ्मय चर्चा आणि चिकित्सा, नवसाहित्य प्रकाशान, बेळगाव, 1978
4. रा.ग.जाधव, कला, साहित्य आणि संस्कृती, सुगंधा प्रकाशन, पुणे, 1986
5. दया पवार, माझे शब्द, कोंडवाडा, मागोवा प्रकाशन, पुणे, 1994
6. वि.स.जोग, मार्क्सवाद आणि दलित साहित्य, संबोधित प्रकाशन, मुंबई,1985
7. अंजली सोमण, साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे. 1982
8. रा.ग.जाधव, कला, साहित्य आणि संस्कृती, सुगंधा प्रकाशन, पुणे, 1986
9. प्रकाश बोबडे, साहित्य आणि समाज, अप्रकाशित शोधनिबंध, मराठी समाजशास्त्र परिषदेचे अधिवेशना, जळगाव दि. 7-9 नोव्हे. 1993
10. स.दा.कुऱ्हाडे, दलित साहित्याच्या निर्मित्ताने, अभिनव प्रकाशन, मुंबई, 1982
11. ज.वि.पवार, नाकेबंदी, मुक्तछंद प्रकाशन, मुंबई, 1976




PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

Balaji parabatrao Kharabe.

2021-2022

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

July -2021

ISSUE No- (CCXCIX) 299

## आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor
Dr. D. B. Tanduljekar
I/C Principal
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

Editor
Dr. Anant Dadarao Markale
Head, Dept. of Hist.
Yeshwantrao Chavan College,
Ambejogai, Dist.- Beed

The Journal is indexed in:
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication Amaravati
Website – www.aadharsocial.com Email – aadharsocial@gmail.com.

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed Dist.Nanded

| | | |
|---|---|---|
| 20 | यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक कार्य डॉ.आर.व्ही. मोरे | 73 |
| ✓ 21 | यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय क्षेत्रातील कार्य प्रा.डॉ.बालाजी परबतराव घरावे | 77 |
| 22 | यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांचे महत्त्वपूर्ण योगदान डॉ.ज्योती रामराव रामोड | 81 |
| 23 | आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान सौ.सुगंधा परेश जाधव | 84 |
| 24 | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक व सहकार विषयक विचार डॉ.नवनाथ गोविंदराव अडकिणे | 88 |
| 25 | संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील यशवंतराव चव्हाण यांची भूमिका प्रा.डॉ.देवर्णी मुकुंद अरविंद | 91 |
| 26 | यशवंतराव चव्हाण यांच्या अर्पणपत्रिकेतील वेणूताई विषयीची कृतज्ञता प्रा.डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | 97 |
| 27 | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान प्रा.मनोज बबनराव देवकर | 100 |
| 28 | राजकीय सामाजिकरणातून घडलेले नेतृत्व – यशवंतराव चव्हाण प्रा.डॉ.सुपेकर वैशाली प्रशांत | 103 |
| 29 | व्दैभाषिक राज्यातील यशवंतराव चव्हाण यांचे योगदान प्रा.सांगळे भाऊसाहेब खंडु | 107 |
| 30 | यशवंतराव चव्हाणांचे ग्रामिण सामाजिक विकासामधील योगदान प्रा.बी.एच.चौगुले | 109 |
| 31 | यशवंतराव चव्हाण यांचे पंचायत राज व सहकार क्षेत्रातील कार्य सचिन सहादू घायतडके | 114 |
| 32 | 'यशवंतराव चव्हाण यांचे साहित्यिक क्षेत्रातील कार्य प्रा.डॉ. मोरे संगीता दत्ताजी | 117 |
| 33 | महाराष्ट्राचे भाग्यविधाता मा. यशवंतराव चव्हाण डॉ संजय गोपाळराव ठवळे | 121 |
| 34 | यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य एक अभ्यास डॉ.जयदीप रा.सोळुंके | 125 |
| 35 | यशवंतराव चव्हाण यांच्या कार्य कर्तृत्वावर भारतीय स्वातंत्र्य लढयाचा प्रभाव प्रा. डी. एन. रिठे | 129 |
| 36 | यशवंतराव चव्हाण यांची रसिकता व साहित्य चिंतन प्रा. दिलीप ज्ञानोबाराव भिसे | 132 |
| 37 | आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान डॉ.शिवाजी सोमला पवार | 136 |
| 38 | यशवंतराव चव्हाणांचे शैक्षणिक व आर्थिक विचार डॉ. प्रतिमा बाळासाहेब कदम | 142 |
| 39 | आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदान डॉ. संजय सागरु सपकाळ | 146 |


PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 299 (CCXCIX)
2278-9308
July, 2021

# यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय क्षेत्रातील कार्य

प्रा.डॉ.बालाजी परबतराव खराबे
मराठी विभाग प्रमुख
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद ता.मुखेड जि.नांदेड
मोबा.९४०३९७२८२०.kharabebalaji68@gmail.com

**प्रास्ताविक :**

यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे शिल्पकार व महाराष्ट्राचे लोकोत्तर पुढारी होते. वाचन, व्यासंग, समतोल वक्तृत्व, प्रश्नांची जाण, प्रश्न सोडविण्याची हातोटी, अभ्यास आणि राजकारणातील सुसंस्कृतता हे सगळे गुणविशेष चव्हाणांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये निश्चितच होते. यशवंतराव चव्हाण एक मुत्सद्दी राजकारणी, संसदपटू, कार्यक्षम मंत्री व पक्षनेता हा त्यांचा राजकीय लौकीक जगभर पसरलेला होता. त्यामुळे त्यांचा मराठी माणसाला अभिमान आहे. यशवंतराव स्वत: एक सर्जनशील कलावंत व उत्तम समीक्षक होते. यशवंतरावांचा मूळ पिंडच प्रतिभावंतांचा होता. यशवंतरावांना प्रतिभेचे देणे त्यांच्या आईकडून उपजतच मिळाले होते. त्यातच कृष्णा कोयनेच्या प्रीतीसंगमकाठचा सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असलेला परिसर होता. त्यांच्यातल्या सर्जनशील उर्मीना खतपाणी घालणारा ठरला. त्यामुळेच यशवंतरावांच्या मनात निसर्गसौंदर्याची ओढ निर्माण झाली. राजकारणाबरोबरच कला, संगीत, खेळ, नाट्य या क्षेत्रात यशवंतरावांनी रस घेतला.

**विषय निवडीचा हेतू :**

यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दल मराठी माणसाला अभिमान आहे. यशवंतराव चव्हाण स्वत: एक सर्जनशील लेखक, कलावंत व समीक्षक होते. यशवंतरावांनी साहित्य क्षेत्रात मोलाची भर घातली आहे. यशवंतराव चव्हाण जसे साहित्य क्षेत्रात सुप्रसिद्ध आहेत तसेच राजकीय क्षेत्रातील मुत्सद्दी राजकारणी होते. त्यामुळे त्यांचे राजकीयय क्षेत्रातील कार्य सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचविण्यासाठी व राजकीय क्षेत्रातील नेत्यांना मार्गदर्शन व्हावे या हेतूने संशोधनासाठी हा विषय निवडलेला आहे.

**संशोधन पद्धती**

'यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय क्षेत्रातील कार्य' या विषयावर संशोधन करीत असताना संशोधनासाठी दोन पद्धतींचा वापर करण्यात आला असून यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

'यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय क्षेत्रातील कार्य' या विषयावर संशोधनात्मक लेखन करीत असताना संशोधनाची काही उद्दिष्टे निश्चित केलेली आहेत ती पुढीलप्रमाणे आहेत.

१)यशवंतराव चव्हाणांचे महाराष्ट्राच्या राजकारणातील स्थान समजून घेणे.
२)यशवंतराव चव्हाणांचे महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रवेश कसा झाला याची माहिती घेणे.
३)यशवंतराव चव्हाणांनी राजकारणात असताना कोणकोणती पदे भूषविली व त्यांचा उपयोग महाराष्ट्रासह देशाला कसा झाला याची माहिती मिळविणे.
४)यशवंतराव चव्हाणांना देशाच्या पंतप्रधान पदापासून दूर का ठेवण्यात आले याची माहिती घेणे.
५)यशवंतराव चव्हाणांची राजकारणातील चतुरस्त्र भूमिका समजून घेणे.

**यशवंतरावाच्या नेतृत्वाचा उदय :**

म.गांधीजींच्या चळवळीत यशवंतरावांना राजकीय जीवनाची गुरूकिल्ली सापडली. यशवंतराव मॅट्रिकला पोहोचेपर्यंत शालेय जीवनातील तीन वर्षे निरनिराळ्या चळवळीच्या निमित्ताने तुरुंगात घालविली होती. यशवंतरावांचे जिल्हा कॉंग्रेसमधील नेतृत्व निर्विवादपणे मान्य केले होते. महाराष्ट्रातील ज्येष्ठ पंडित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सातारा जिल्हा कॉंग्रेसमधील यशवंतरावांच्या स्थानाबद्दल जे गौरवोद्गार काढले आहेत ते असे - "मनाने प्रौढ व वयाने लहान असे उमेदीने भरलेले हे तरूण गृहस्थ आमच्या नव्या गटाचे नेतृत्व आत दाखल होताच थोड्यात वर्षात करू लागले."

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed Dist.Nanded

**B.Aadhar** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) -7.675, Issue NO, 299 (CCXCIX )

ISSN : 2278-9308

July, 2021

ब्रिटिश सत्ता सर्वसमर्थ व अभेद्य नाही असा आत्मविश्वास जनमानसात निर्माण करण्याच्या हेतूने कराड, तासगाव, वडूज, इस्लामपूर, पाटण, सातारा इत्यादी ठिकाणी तालुका कचेऱ्यांवर निदर्शने केली होती. जागोजागी तिरंगा ध्वज लावण्यात आले. सरकारने प्रचंड सामर्थ्यांनिशी चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. यशवंतरावांचा निःशस्त्र मार्गांनी लढा यशस्वी होणार नाही, कार्यकर्त्यांना कळून चुकले होते. नाना पाटील, जी.डी.लाड, नाथाजी लाड, अण्णासाहेब लाड, शंकरराव लुपणे, शाहीर शंकरराव निकम, आत्माराम बापुजी पाटील, नागनाथ नायकवाडी, बर्डे मास्तर, पांडुरंग मास्तर इत्यादी मंडळींनी सशस्त्र क्रांतीचा निर्णय घेऊन अंमलात आणला. त्यांच्या प्रभावी वक्तृत्वामुळे यशवंतरावांनी जनमानस जिंकले होते. ही चळवळ कॉंग्रेसची असली तरी ती पांढरपेशापुरती मर्यादित नव्हती. दलित, शोषित समाज घटकांबरोबरच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे प्रश्नही यशवंतरावांनी हाती घेतले. यशवंतराव गावोगावी हिंडून, कार्यकर्त्यांशी व्यक्तिगत संबंध जोडून ब्रिटिश सत्तेविषयी लोकांच्या मनात असलेली भीती कमी करण्याचे यशस्वी प्रयत्न केले. यशवंतरावांनी स्वतःच्या प्रयत्नातून सातारा जिल्ह्यात नव्या दृष्टीचा तरूण कार्यकर्त्यांची एक मजबूत फळीच निर्माण केली. यशवंतरावांच्या नेतृत्त्वाची वाटचाल ती त्यांच्या मृत्यूपर्यंत अखंडपणे चालूच राहिली.

**सत्ताकारणातील प्रवेश :**

यशवंतरावांनी १९३० च्या कायदेभंग चळवळीत भाग घेऊन तुरूंगवास भोगला. १९४६ च्या निवडणुका कॉंग्रेसने जिंकल्या. महाराष्ट्रात बाळासाहेब खेर मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांना यशवंतरावांना संसदीय सचिव नेमायचे होते. त्यावेळी मुख्यमंत्र्याकडे बैठक सुरू होती. तितक्यात यशवंतराव मोरारजी देसाईना भेटण्यासाठी गेले. मोरारजींनी यशवंतरावांना गृहखात्याचा संसदीय सचिव होण्याची गळ घातली. राज्यकारभाराचे बारकावे, कामाचा उरक, त्यांची निर्णयक्षमता इत्यादी गुणांचा संस्कार मोरारजींनीच गृहखात्याच्या संदर्भात यशवंतरावांवर केला. मोरारजींचा हा संस्कार यशवंतरावांना जन्मभर उपयुक्त ठरला.

काही काळानंतर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे प्रदेश कॉंग्रेसचे सचिव बनले. १९५२ च्या निवडणुकीनंतर नागरी पुरवठा व स्थानिक खात्याचे मंत्री झाले. भाषावार प्रांतपुनर्रचना झाल्यावर जेव्हा द्वैभाषिक मुंबई राज्य करायचा निर्णय कॉंग्रेसच्या नेत्यांनी घेतला तेव्हा त्या राज्याच्या मुख्यमंत्रीपदावर यशवंतराव येण्यालाही मोरारजी देसाई कारणीभूत होते. १९४६ पासून १९५६ पर्यंत म्हणजे साधारणपणे साडेदहा वर्ष यशवंतराव मोरारजींचे सहाय्यक म्हणून काम केले.

मोरारजी देसाई संयुक्त महाराष्ट्राचे विरोधक होते. त्यामुळे मोरारजींविरुद्ध महाराष्ट्र कॉंग्रेसचे मत होते. भाऊसाहेब हिरे संयुक्त महाराष्ट्रवादी असल्याकारणाने मराठी जनतेत लोकप्रिय होते. मोरारजी देसाई विरुद्ध भाऊसाहेब हिरे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या निवडणुकीत उतरले. मोरारजी देसाईंनी निवडणुकीतून माघार घेतली. भाऊसाहेब हिरे विरुद्ध यशवंतराव चव्हाण निवडणुकीच्या मैदानात उतरले. गुजराती मतांच्या पाठिंब्यावर यशवंतरावांनी भाऊसाहेब हिरेंना पराभूत करण्यात यशस्वी ठरले.

१९५७ मध्ये महाराष्ट्रात कॉंग्रेसचा पराभव झाला नाही. परंतु मराठी प्रदेशात कॉंग्रेसला निश्चितपणे पराभवास सामोरे जावे लागले. १०४ विधानसभा मतदारसंघात समितीचे आमदार निवडून आले. परंतु गुजरात व विदर्भाच्या जोरावर कॉंग्रेस सत्तेत आली होती. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती केली नाही तर १९६२ मध्ये निवडणुकीत कॉंग्रेसचा पराभव होईल असे यशवंतराव चव्हाणांना वाटत होते. यशवंतरावांनी समितीमधील विघटनाच्या प्रक्रियेला राजकीयदृष्ट्या अत्यंत हुशारीने सुरूवात केली. महाराष्ट्र राज्याची निर्मिती होताच समिती खिळखिळी झाली. १९६२ च्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्ष पूर्ण बहुमताने सत्तेवर आला. यशवंतरावांना राजकीय दूरदृष्टी होती. महाराष्ट्रातील रिपब्लिकन पक्षाचे त्यावेळचे अध्यक्ष कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्यासोबत यशवंतरावांनी कॉंग्रेस पक्षाची आघाडी केली. शरद पवारांनी यशवंतरावांचे सूत्र नेमके पकडले आणि रामदास आठवले गटाशी राजकीयदृष्ट्या जुळवून घेतले. यशवंतरावांनी संयुक्त महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर कर्तबगारीच्या बळावर दावा प्रस्थापित केला होता.

**हिमालयाच्या रक्षणार्थ धावलेला कणखर सह्याद्री :**

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण झाले. यशवंतराव अत्यंत चाणाक्ष, धुरंधर, दूरदृष्टी असलेला नेता, कार्यकर्त्यांची प्रचंड फळी, राजकीय समिकरणे जुळविण्याचे कसब या बळावर त्यांनी महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्षाचे अस्तित्त्व निर्माण केले. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. त्यावेळी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू होते. पंडित नेहरूंनी यशवंतरावांची कारकीर्द पाहून अत्यंत संकटसमयी देशाच्या संरक्षणमंत्रीपदाची अवघड जबाबदारी अत्यंत विश्वासाने सोपविली. १४ नोव्हेंबर १९६२ रोजी संरक्षणमंत्रीपदावर यशवंतराव विराजमान झाले. संरक्षण ही केवळ लष्कराशी संबंधित बाब नसून तिला राजकीय, आर्थिक व मानसशास्त्रीय पदर असतात, याचे भान ठेवून यशवंतरावांनी संरक्षण खात्याचा कारभार चालविला. लष्करी दलाची फेररचना व शस्त्रसज्जता या बाबतीत यशवंतरावांनी कधीच हस्तक्षेप केला नाही. यशवंतरावांनी लष्करी आधुनिकीकरणाचे उपाय तातडीने आखले. परदेशांकडून साहित्य व शस्त्रसामग्री मिळविली. श्री.कृष्णा मेनन यांच्या तुलनेत यशवंतरावांनी संरक्षणविषयक प्रश्नाबाबत संसदेला व सर्वसामान्य जनतेला विश्वासात घेतले. मे १९६४ मध्ये पं.नेहरूंचे निधन झाले. पं.नेहरूंच्या



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq. Mukhed Dist. Nanded

निधनानंतर लाल बहादुर शास्त्री देशाचे पंतप्रधान झाले. १९६५ चे भारत-पाक युद्ध यशवंतरावांच्या काळात झाले. भारत-पाक या दोन शेजारी देशांच्या युद्धात भारताने पाकिस्तानवर विजय मिळविला. भारतीय हवाई दलाने लष्कराला दिलेल्या उत्तम साथीमुळेच लष्कराने पाकिस्तानचा पराभव केला. १९६६ चा 'ताश्कंद करार' ही यशवंतरावांच्या काळातील आहे.

**गृहमंत्री :**

लाल बहादुर शास्त्री यांच्या निधनानंतर भारताच्या पंतप्रधानपदी श्रीमती इंदिरा गांधीजींची निवड करण्यात आली. श्रीमती इंदिरा गांधींना यशवंतरावांचा पाठिंबा होता. यावरून यशवंतरावांचे राजकीय महत्त्व लक्षात येते. श्रीमती इंदिरा गांधींनी यशवंतरावांना गृहमंत्रीपदाची जबाबदारी दिली. गृहखात्याचा व्याप प्रचंड होता. राष्ट्रजीवनाच्या सर्व बाजूंशी यशवंतरावांचा संबंध होता. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यापासून आंतरराज्य संबंधापर्यंत प्रत्येक क्षेत्रात असंख्य गुंतागुंतीचे प्रश्न उद्‌भवलेले होते. अशा कठीण काळात गृहखात्याची जबाबदारी यशवंतरावांवर होती. यशवंतरावांनी गृहखात्याची जबाबदारी अत्यंत समर्थपणे सांभाळली. गृहमंत्रीपदाच्या काळात यशवंतरावांनी संस्थानिकांचे तनखे रद्द करण्याबाबत पुढाकार घेतला.

**अर्थमंत्री :**

इंदिरा गांधींच्या पुरोगामी, क्रांतिकारी वगैरे धोरणांची धुरा सांभाळणाऱ्या खंद्या पुढाऱ्यांपैकी यशवंतराव चव्हाण एक होते. १९७० मध्ये श्रीमती इंदिरा गांधींनी गृहमंत्रालय स्वतःकडे घेतले व मोरारजी देसाईकडील अर्थमंत्रालय यशवंतरावांना देण्यात आले. कोणालाही आपल्या पदावर डोईजड होऊ न देण्याइतपत इंदिराजींचा स्वभाव होता. यशवंतराव चव्हाण जेव्हा अर्थमंत्री झाले तेव्हा भारतीय अर्थव्यवस्था विस्कळीत झाली होती. तटपुंजी अर्थसाधने, रोकड पिकांचे उत्पन्न असमानधानकारक जीवनावश्यक वस्तुंची टंचाई, भाववाढ, बेरोजगारी, ग्रामीण बेकारी, जमीन सुधारणा असे अनेक प्रश्न निर्माण झाले होते. अशा कठीण प्रसंगी यशवंतरावांनी आर्थिक विकासाचा सांधा सामाजिक न्यायाशी जोडण्याचा प्रयत्न केला.

**परराष्ट्रमंत्री :**

यशवंतरावांनी अर्थमंत्री पदानंतर काही काळ परराष्ट्रमंत्री म्हणून काम केले आहे. परराष्ट्रमंत्री म्हणून यशवंतराव रूमानियात गेले असताना पंतप्रधान इंदिरा गांधींनी निवडणुका घोषित करण्याचे ठरवले. तेव्हा "संदेश ऐकून मनावरचे ओझे एकदम हलके झाले." अशी बोलकी प्रतिक्रिया यशवंतरावांनी त्यावेळी दिली आहे. १९७७ च्या आणीबाणीनंतर इंदिरा गांधींच्या काँग्रेस पक्षाचा दारूण पराभव झाला.

**उपपंतप्रधान :**

भारताचे पाचवे पंतप्रधान चरणसिंग झाले. चरणसिंगाच्या मंत्रीमंडळात यशवंतराव उपप्रधानमंत्री झाले. इंदिरा गांधींच्या पाठिंब्यावर काँग्रेस (एस) व जनता (एस) या पक्षांचे संयुक्त सरकार केंद्रात उभे राहिले. ऐनवेळी श्रीमती इंदिरा गांधींनी आपला पाठिंबा काढून घेतला. १९८० च्या प्रारंभी श्रीमती इंदिरा गांधींचा काँग्रेस पक्ष प्रचंड बहुमताने विजयी झाला आणि यशवंतरावाच्या राजकीय जीवनाला पूर्णविराम मिळाला.

**वित्त आयोग :**

यशवंतरावांनी मानहानी पत्करून काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यशवंतरावांना ८ व्या वित्त आयोगाचे अध्यक्षपद देण्यात आले.

"यशवंतरावांच्या ठिकाणी पहिला बाजीराव व नाना फडणवीस यांच्यातले गुण एकवटले आहेत." या आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या विधानाचा हवाला देऊन माडखोलकर लिहितात "यशवंतरावांची चार वर्षांची व्यवहारनीती व राज्यकारभार यांच्या अंगी बाजीराव व नाना फडणवीस यांच्या सद्‌गुणांचा समन्वय असल्याचे सिद्ध करणारी आहे." असा निर्वाळा देऊन "शब्दाला जागणारा व चारित्र्याला जपणारा त्यांच्याइतका संग्राहक वृत्तीचा पण सावध राजधुरीण मी तरी पाहिला नाही."

राजकीय जीवनात सतत व्यस्त असतानाही यशवंतरावांना पुस्तके वाचण्याचा प्रचंड छंद होता. धाडस, आस्था, निष्ठा, विवेक, चातुर्य इत्यादी यशवंतरावांचे उपजत गुण त्यांना कमालीचे कामी येतात. यशवंतराव अत्यंत मुद्देसूद, मर्मग्राही बोलायचे. प्रसंगावधान व समयसूचकता बाळगणारा नेता म्हणजे यशवंतराव. यशवंतरावांनी मुख्यमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री इत्यादी पदावरून त्यांनी विधीमंडळामध्ये जी भाषणे केली त्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व व संसदीय वेगळेपण सिद्ध होते

थोडक्यात, देशाला व पर्यायाने महाराष्ट्राला यशवंतराव चव्हाणांचे समर्थ नेतृत्त्व लाभलेले होते. यशवंतरावांना कोणत्याही प्रकारचा राजकीय वारसा नसताना स्वतःचे अस्तित्व निर्माण केले. मुख्यमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री व वित्त

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya

आयोगाचे अध्यक्षपद अशी अनेक पदे त्यांना देण्यात आली. या सर्व पदांचा सन्मान कायम ठेवून त्यांनी ती पदे अत्यंत समर्थपणे पेलली. परंतु भारताचे पंतप्रधान होण्याचा बहुमान त्यांना मिळाला नाही याबद्दल सर्व मराठी जनांच्या मनाची उपेक्षाच झाली असे वाटते.

**संदर्भ**


१) यशवंतराव चव्हाण : एक वादग्रस्त पण कर्तबगार मुत्सद्दी - रा.तु.पाटील, परखड प्रकाशन, सांगली तिसरी आवृत्ती १९८७.
२) सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्र - संपादक डॉ.साहेब खंदारे, डॉ.सुनीता धर्मराव, लोकविद्या प्रकाशन, परभणी प्र.आ.१९१०
३) यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य - भा.ल.भोळे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद दुसरी आवृत्ती २००४
४) यशवंतराव ते विलासराव - मधुकर भावे, मनोविकास प्रकाशन, पुणे प्र.आ.२००८


PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 44, Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2021 | SJIF | Impact Factor : 7.139

# Index

| | | |
|---|---|---|
| 1. | **Women in Selected Dalit Narratives in India**<br>**Kadam Bhagwat Pandurangrao** | 5 |
| 2. | **The Importance of Literature in Modern Society**<br>**Vishvajeet Haridas Vidhate , Mahesh Eknath Vidhate** | 8 |
| 3. | **Influence Of Social Media On Literature**<br>**Vishvajeet Haridas Vidhate** | 10 |
| 4. | **Impact of Digital Media on New Generation Education**<br>**Dhonde Ajay Bhimrao** | 13 |
| 5. | **The Importance of Literature in Modern Society**<br>**Mahesh Eknath Vidhate** | 16 |
| 6. | **Role of Global Media on Literature and Society**<br>**Vrushali Manohar Londhe** | 18 |
| 7. | **Positive And Negative Impact Of Social Media On Education**<br>**Dr.Tekade Mangal Shantinath** | 20 |
| 8. | **A Study of Nayantara Sahgal's Mistaken Identity with Socio-political Perspective.**<br>**Mr. Syed Khaja Miyan Syed Baba Miyan** | 24 |
| 9. | सुबह अब होती है....अब होती है...कहानी में स्त्री विमर्श<br>डिन्सी जोर्ज , डॉ.जी. शांति | 28 |
| 10. | प्रतिमा इंगोले यांच्या 'बुढाई' कादंबरीचे विविधांगी दर्शन<br>प्रा.डॉ. सोपान माणिकराव सुरवसे | 31 |
| 11. | 'तहान' कादंबरीतील सामाजिकता<br>डॉ. नरेंद्र ईश्वर घरत | 34 |
| 12. | साहित्याच्या विकासात वर्तमानपत्राची भूमिका<br>प्रा रामचंद्र झाडे | 38 |
| 13. | मराठीतील ग्रामीण साहित्याची समीक्षा<br>डॉ. शरद आसाराम खांडेभराड | 39 |
| 14. | मराठी साहित्यातील साठोत्तरी साहित्य प्रवाह<br>प्रा. बालासाहेब विष्णू कटारे | 41 |
| 15. | उखाण्यातील समाजजीवन<br>प्रा.डॉ.कांत वसंतराव जाधव | 44 |



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist Nanded

| | | |
|---|---|---|
| 16. | हिंदी उपन्यास में आदिवासी विमर्श<br>डॉ. माळवकर उमाकांत सिताराम | 49 |
| 17. | शिक्षणावर मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाचा प्रभाव<br>प्रा. डॉ. अशोक डोळस . | 52 |
| 18. | समकालीन आदिवासी साहित्याचे स्वरूप<br>प्रा. डॉ. बालाजी पर्वतराव घराये | 55 |
| 19. | दलित आत्मकथनांमधील सामाजिक जाणीव<br>डॉ. नवनाथ ज्ञानोबा पवळे | 59 |
| 20. | वैश्विक विकास में सूचना प्रौद्योगिकी की भूमिका<br>डॉ. चैत्रा एस. | 62 |
| 21. | आदिवासी साहित्य प्रवाह<br>डॉ.मारोती बालासाहेब भोसले | 64 |
| 22. | *भारतीय मध्यवर्गीय समाज और बालशौरी रेड्डी का "जिन्दगी की राहें।*<br>डॉ. मीर जाहिदुल इस्लाम | 68 |
| 23. | अण्णाभाऊ साठे जीवन साहित्य आणि कार्य<br>डॉ.सुनिता गोवडे | 71 |
| 24. | अण्णाभाऊ साठे यांचे जागतिक महत्त्व<br>प्राचार्य डॉ. एस.जे. | 76 |
| 25. | "स्त्रीवादी कवितेचे स्वरूप"<br>प्रा. अरुण कुलकर्णी | 79 |
| 26. | अण्णाभाऊ साठे : जीवन साहित्य आणि कार्य<br>अनिल मारोतराव जाधव | 84 |

CURRENT GLOBAL REVIEWER

| Special Issue 44, Vol. 1 Oct. 2021 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
| --- | --- | --- |

# समकालीन आदिवासी साहित्याचे स्वरूप

प्रा. डॉ.बालाजी परशराम कराडे
मराठी विभागप्रमुख, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद ता.मुखेड, जि.नांदेड.

प्रस्तावना :-

साठोत्तरी वाङ्मयप्रवाहांमध्ये स्वतःची नवी ओळख निर्माण करणारा साहित्यप्रवाह म्हणजे आदिवासी साहित्यप्रवाह होय. हा साहित्यप्रवाह प्रस्थापित साहित्यापेक्षा वेगळा आहे. मुळात आदिवासी ही संकल्पनाच व्यापक आहे. मूलनिवासी व आद्यमानव म्हणून आदिवासींचा उल्लेख होतो. त्यांची संस्कृती हा फार प्राचीन आहे. परंतु आता त्यांचे साहित्य दालन ही विशेष समृद्ध होताना आपल्याला दिसत आहे. आजपर्यंत त्यांच्या विषयी अनुभव दुसरे कोणीतरी लिहित होते. आज मात्र त्यांचेच अनुभव ते स्वतः स्वतःच्या हातात लेखणी घेऊन, कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललित साहित्य इत्यादी विपुल वाङ्मयाला उजाळा देताना दिसतो आहे. ही सुरुवात आहे. येथून पुढे निश्चित आदिवासी साहित्याला चांगले दिवस आल्याशिवाय राहणार नाहीत. त्यामुळे आदिवासी साहित्य कळकळ पुढे येण्याशिवाय राहणार नाही. आदिवासी आजपर्यंत फक्त चित्रपटातून, बिगर आदिवासींनी लिहिलेल्या साहित्यामधून, काही पोस्टर्स व चित्रांमधून दिसत होता. प्रस्थापित समाजाचे मनोरंजन, करमणूक करणारा घटक म्हणून त्याकडे पाहिले जात होते. इतरांच्या टिंगलीचा, विनोदाचा विषय आदिवासी बनत असे, परंतु शिक्षणाने आलेल्या आत्मभानामुळे तो बदलू पाहतो आहे. आपले अनुभव तो स्वतः शब्दांत मांडू लागला आहे. मानवाच्या उत्क्रांतीपासूनचा इतिहास त्याला माहिती आहे. त्यामुळे साहित्य विश्वात एक सक्षम साहित्यकृती तो घडवू शकतो. आदिवासी साहित्य संमेलने, चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा, मेळावे यांच्यामधून आदिवासी साहित्याला बळकटी येत असते. जीवन जगताना त्यांना आलेले अनुभव, एकूण त्यांची संस्कृती, त्यांच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत भोगलेले दुःख, त्यांची भूक, त्यांच्यावर होणारा अन्याय, या गोष्टी त्यांनी साहित्यातून मांडल्या आहेत. त्यांचा व्यवसाय तसेच त्यांचे आरोग्य, अंधश्रद्धा या विषयी सर्व अनुभवांना सामोरे गेलेल्या काही आदिवासींनी ह्या अनुभवांना शब्दरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच बरोबर काही संवेदनशील साहित्यिकांना आदिवासींच्या जगण्याबद्दल सहानुभूती वाटते, ज्यांना आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव आहे. अशाही काही साहित्यिकांनी आदिवासींच्या जीवनावर साहित्यनिर्मिती केलेली दिसते. आदिवासी समाजातील आदिमता विषयी अनेक मत मतांतरे असले तरी आदिमता म्हणजे मानवी जीवनाची प्राचीन अवस्था होय. निसर्गाशी प्राचीन आदिमतेच्या सर्व जाणिवांसह प्रकटणारे साहित्य हे आदिवासी साहित्य म्हणून ओळखता येईल. प्रस्तुत शोध निबंधामध्ये आदिवासी साहित्याची संकल्पना, व्याप्ती आणि स्वरूप यांचा आढावा घेण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

1. आदिवासी साहित्याची संकल्पना जाणून घेणे.
2. आदिवासी साहित्याच्या व्याप्तीचा अभ्यास करणे.
3. आदिवासी साहित्याच्या स्वरूपाचा अभ्यास करणे.

**आदिवासी साहित्याची व्याख्या :-**

विविध साहित्यिकांनी आदिवासींच्या पुढील प्रमाणे व्याख्या केल्या आहेत.

१. डॉ. विनायक तुमराम

यांच्या मते,"आदिवासी साहित्य हे वनसंस्कृतीचे नातलग साहित्य होय. आदिवासी साहित्य हे रानावनातील वंचितांचे साहित्य आहे. ज्यांच्या प्रश्नांना भूतकाळाने कधी उत्तरेच दिली नाहीत, अशा दुर्लक्षितांचे साहित्य आहे. ज्यांच्या आक्रोशाला इथल्या मानव समाजव्यवस्थेने कधी न्यायच दिला नाही, अशा गिरीकुहरातील अन्यायग्रस्तांचे ते क्रांतीसाहित्य होय. येथल्या क्रूर कठोर न्यायव्यवस्थेने ज्यांच्या शेकडो पिढ्यांना आजीवन वनवास ठोठावला त्या आदिवासी समूहाचे ते मुक्तिसाहित्य होय. आदिवासींचे भावाळ अपूर्व त्या संस्कृतीच्या कुशाबाहेर राहिले, त्या संस्कृतीच्या प्राचीन इतिहासाला पुनरारंभ देणारे हे साहित्य आहे. आदिवासी साहित्य हे या भूमीने प्रसविलेल्या आदिम वेदनेचे आणि विद्रोहाचे शब्दरूप होय."

२. डॉ. गोविंद गारे

यांच्या मते, "अलिकडच्या काळात आपण अनेक साहित्य संमेलनाची व साहित्य प्रकाराची चर्चा ऐकतो. ग्रामीण साहित्य, बाल साहित्य, दलित साहित्य, लोकसाहित्य या साहित्याचा पुरस्कार करणाऱ्या अनेक परिषदाही होतात. तसेच हे एक आदिवासी साहित्य संमेलन



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad

Special Issue 44, Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2021 | SJIF | Impact Factor : 7.139


आहे. आदिवासी साहित्य संमेलन हा वेगळा आणि सवता सुभा चुका कशाला? असेही कोणी म्हणेल. तेही खरेच, पण हा सवता सुभा मात्र नाही. तो आदिवासी समाजातून उठणाऱ्या वेगळ्या साहित्यिकांचा व साहित्यप्रेमी मंडळींचा एक मनसुबा आहे."

३. वाहरू सोनवणे

यांच्या मते, "आदिवासी दु:खाचे संदर्भ वेगळे आहेत, त्यांचे प्रश्न वेगळे राहणार आहेत. त्यांची उत्तरे सुद्धा वेगळ्या पद्धतीने शोधावी लागतील. वेगळा आकार घेऊन वेगळे शब्द शोधावे लागतील. म्हणून आदिवासी साहित्याचा प्रवाह हा वेगळा ठरतो आणि हे साहित्य म्हणजे आपल्या वैशिष्ट्यांचा शोध ठेवित ठरतो. फक्त साहित्याचा नव्हे तर आदिवासी समूहाचा आणि जीवनाचा शोध होय."

**आदिवासी साहित्याची संकल्पना :-**

इ.स.१९७८ साली झालेल्या पहिल्या अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलनापासून खऱ्या अर्थाने साहित्य चळवळ सुरू झाली. आदिवासी साहित्य नावारूपाला येऊ लागले. आदिवासी साहित्याचा सवता सुभा कशासाठी? किंवा आदिवासी साहित्याने वेगळी चूल का मांडली अशी चर्चा होताना दिसू लागली. मुळात आदिवासी साहित्य कशाला म्हणावे? हाही प्रश्न महत्त्वाचा होताच. जन्माने आदिवासी असणाऱ्या साहित्यिकाने निर्माण केलेल्या साहित्याला आदिवासी साहित्य म्हणावे की, बिगर आदिवासी साहित्यिकांच्या साहित्याला आदिवासी साहित्य म्हणावे? असा प्रकारे वादविवाद चालू झाले. आदिवासी साहित्य संमेलने, चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा, मेळावे यांच्यामुळे अनेक आदिवासी लेखक, कवी एकत्र येऊ लागले व आदिवासी साहित्य या विषयावर ऊहापोह होऊ लागला. आदिवासींच्या जीवन जाणिवा वेगळ्या आहेत. त्यांची संस्कृती, त्यांची जीवन जगण्याची पद्धत वेगळी आहे. त्याचबरोबर त्यांची आविष्काराची पद्धतही वेगळी आहे. प्रस्थापितांच्या तंत्रामध्ये आदिवासी साहित्य कोठेही बसत नाही. ते स्वतंत्र शैलीने निर्माण झालेले आहे. त्यामुळे त्या साहित्याचा वेगळाच विचार करावा लागेल. असे म्हणणारा एक प्रवाह निर्माण झाला. त्या प्रवाहामध्ये विनायक तुमराम, भुजंग मेश्राम, गोविंद गारे, वाहरू सोनवणे आदी मंडळींनी पुढाकार घेतला त्यामुळे आदिवासी साहित्यप्रवाह स्वतंत्ररित्या आपले पाय रोवू लागला.

आदिवासी साहित्यिकांना व्यासपीठ मिळावे म्हणून आदिवासी साहित्य परिषद, महाराष्ट्र (नागपूर) ही संस्था निर्माण झाली. महाराष्ट्रातील अनेक साहित्यिक एकत्र आले त्यामध्ये कवी मसराम, बाबाराव मडावी या मंडळींनी इ.स.१९७९ मध्ये या संस्थेची स्थापना केली. त्यांच्या माध्यमातून साहित्य संमेलने होऊ लागली. त्यानंतर अनेक छोटी-मोठी मंडळे निर्माण झाली व साहित्य संमेलने, सांस्कृतिक मेळावे, आयोजित करू लागले. त्यामुळे आदिवासी साहित्याचा प्रचार व प्रसार होऊ लागला. सुरुवातीच्या काळात आदिवासी साहित्यालाही दलित साहित्यासारखा संघर्ष करावा लागला. प्रस्थापितांच्या तंत्राच्या परीक्षेला उतरावे लागले. परंतु आता स्वातंत्र्यामुळे, शिक्षणामुळे, आत्मभानामुळे त्यांच्या अनुभवकक्षा विस्तारल्या आणि नव्या दमाचे साहित्य निर्माण होऊ लागले. कविता, कथा, कादंबरी, चरित्र, नाटक, ललित गद्य हे साहित्यप्रकार हळूहळू हाताळले जाऊ लागले. आतापर्यंत एकूण दहा अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलने झाली आहेत. त्याच बरोबर राज्यस्तरीय आदिवासी साहित्य संमेलने, विचारवेध संमेलने, साहित्यिक मेळावे अशा प्रकारे आदिवासी साहित्य चळवळ जोमाने पुढे चालली आहे. वाहरू सोनवणे म्हणतात, "गुलाम भारताच्या इतिहासात स्वातंत्र्याच्या लढाईत खाज्या नाईक, तंट्या भिल्ल, रामदास महाराज, भागोजी नाईक, बिरसा मुंडा, राणी दुर्गावती इ. अशा अनेक आदिवासी क्रांतीवीरांनी ब्रिटिश राज्याविरुद्ध युद्ध दिली. अनेक आदिवासींनी स्वातंत्र्यासाठी रक्त सांडले पण प्रस्थापित इतिहासकारांनी इतिहासात आदिवासी वीरांची दखल घेतली नाही. कोणी आदिवासी स्वातंत्र्य सैनिक आहेत असेही ऐकिवात नाही. त्यामुळे आदिवासी साहित्यप्रवाहाच्या स्वतंत्र अस्तित्वाची गरज आहे. हा साहित्यप्रवाह आता स्वतंत्र भूमिका मांडू लागला आहे. परंतु अजूनही त्याची स्वत:ची स्वतंत्र मूल्यमापन पद्धती निर्माण झाली नाही. प्रस्थापित साहित्याच्या तंत्र पद्धतीतच त्याचं ही मोजमाप केले जाते. प्रस्थापितांची साहित्यमूल्ये नाकारून आदिवासींच्या सर्वस्पर्शी वास्तवाशी व जातवर्गदास्याच्या जाणिवेशी कोणत्याही प्रकारची प्रतारणा न करता जी कथा व कविता लिहिली जाईल आणि आदिवासी जीवनाला न्याय देणारे साहित्यच खऱ्या अर्थाने आदिवासी साहित्य म्हणता येईल.

**आदिवासी साहित्याचे स्वरूप :-**

आदिवासी साहित्याच्या स्वरूपाचा विचार करत असताना आदिवासी समाजाचा, आदिवासी संस्कृतीचा आणि एकूण आदिवासींच्या जीवनपद्धतीचा विचार करावा लागतो. कारण जीवनच साहित्यामध्ये उमटत असते. ते साहित्यातून मांडत असताना कशाप्रकारे उतरते हे त्याच्या स्वरूपावरून स्पष्ट होते. यामध्ये प्रामुख्याने बिगर आदिवासी लेखकांनी लिहिलेले आदिवासी साहित्य आणि जन्माने आदिवासी असणाऱ्या लेखकांनी लिहिलेले आदिवासी साहित्य, वरवर अशा या दोन स्तरांवरती विभागणी करता येते. बिगर आदिवासी स्तराने लिहिलेल्या साहित्यामध्ये मुद्दा वेगवेगळे प्रकार आढळतात. १. लेखकाच्या ओघात सहज आलेले आदिवासी समाजाचे चित्रण. २. आदिवासी समाज

# CURRENT GLOBAL REVIEWER

| Special Issue 44, Vol. 1 Oct. 2021 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.1 |
| --- | --- | --- |


भूक, भीक, गुलाम दारिद्र्यासाठी दुरवस्थेचे वर्णन करण्यासाठी रचलेले साहित्य. ३. मनोरंजनात्मक पद्धतीने आदिवासींवर केलेले लेखन. ४. आदिवासी समाजाच्या जीवन जाणिवा समजून घेऊन त्या समाजाला त्यांच्या संस्कृतीचा, त्यांच्या जीवनपद्धतीचा सखोल अभ्यास करून, जीवनमूल्यांसहित लिहिलेले साहित्य. अशा प्रकारातून बिगर आदिवासी लेखकांनी लेखन केलेले असले तरी त्यानंतर आदिवासी समाजाच्या लेखकांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे त्यांची साहित्य निर्मिती झालेली दिसते. १.त्यांनी ह्या जीवन जाणिवा स्वतः अनुभवल्या आहेत स्वतःही त्या वास्तवात होरपळून निघाला आहे, त्यांच्या प्रश्नांचे वास्तव मांडणारे साहित्य त्यांनी निर्माण केले. २. प्रस्थापित साहित्यिकांचे अनुकरण करत, त्यांच्याच धाटणीचे, त्यांनी निर्माण केलेल्या साच्यातील मनोरंजनात्मक, शृंगारात्मक मूल्यहीन साहित्य निर्माण झाले ३. लेखक म्हणून मिरविण्यासाठी, साहित्याच्या बांधिलकीचा विचार न करता केलेली उथळ शब्दनिर्मिती अशा प्रकारचे साहित्यनिर्मिती झालेले दिसते. ४. आदिवासींना न्याय मिळवून देण्यासाठी, प्रस्थापित समाजाला आदिवासी संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी, लिहिलेले आदिवासी जीवनमूल्यासहित, परिवर्तनवादी साहित्य. अशाप्रकारे आदिवासी साहित्याचे स्वरूप लक्षात येते. या संदर्भात डॉ. माहेश्वरी गावित म्हणतात," आदिवासी साहित्य तीन विभागात नोंदविता येणे शक्य आहे. १. आदिवासी जमातीत जन्माने आणि जीवनाने अनुभवविश्वात राहणाऱ्या आदिवासींनी लिहिलेले साहित्य, ते आदिवासी साहित्य, २. आदिवासीतेर लेखकांनी आदिमतेच्या वैशिष्ट्यांसह निर्माण केलेले काल्पनिक स्तरावरील किंवा भौतिक स्तरावरील आदिवासींचे अनुभूतीविश्व चितारणारे आदिवासी साहित्य. ३. परिवर्तनवादी चळवळीने प्रभावित झालेले, हेतुपूर्वक निर्माण झालेले आदिवासी साहित्य. या तीनही प्रकारच्या साहित्याचे वैचारिक आणि ललित साहित्य अशा दोन विभागात परिशीलन करता येणे शक्य आहे."

**आदिवासी साहित्याची व्याप्ती :-**

आदिवासी जमाती महाराष्ट्रासह सर्व भारतात व जगातील आशिया,आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, युरोप खंडातील अनेक देशांमध्ये आदिवासींचे वास्तव्य दिसून येते. दऱ्या-खोऱ्यामध्ये, राहणाऱ्या ह्या आदिवासी जमाती हळूहळू मुख्य प्रवाहाकडे वाटचाल करताना दिसतात. शिक्षणाची जाणीव होऊन त्याचे महत्त्व त्यांना पटू लागले आहे. आता त्यांना संधी उपलब्ध होत आहेत. थोड्याफार प्रमाणात का होईना पण आदिवासींमध्ये काही जमाती शिक्षण घेत आहेत. त्यांच्यापर्यंत शिक्षण पोहचले, त्यांची प्रगती झाल्याचे दिसते, स्व-भान प्राप्त झाले शिक्षणानंतर तो साहित्य लेखनाकडे वळलेला दिसतो. हळूहळू आदिवासी साहित्य निर्माण होऊ लागले त्यात कविता, कथा, कादंबरी, नाटक हे साहित्यप्रकार हाताळले जाऊ लागले. साहित्यिक निर्माण होऊ लागले आणि त्या साहित्याची जागतिक पातळीवर दखल घेतली जाऊ लागली. त्यांच्या जीवनावर चित्रपट निघू लागले, आदिवासी जरी आर्थिकदृष्ट्या दुबळा असला तरी त्याचा सांस्कृतिक ठेवा ही त्याची खूप मोठी श्रीमंती आहे. डॉ. विनायक तुमराम आदिवासी साहित्याच्या व्यापक स्वरूपाबद्दल म्हणतात, "आदिवासी साहित्य हे व्यापक स्वरूपाचे साहित्य आहे. मग ते कोरकू जमातीवरील साहित्य असो वा गोंड, भिल्ल, परधान, कोलाम, आंध, महादेव कोळी, वारली त्या जमातीवरील साहित्य असो किंवा आणखी इतर कोणत्याही जमातीवरील साहित्य असो, त्या सर्वांचा समावेश आदिवासी साहित्यातच होईल." डॉ. तुमरामांच्या मते आदिवासींच्या कोणत्याही जमातीचे साहित्य हे आदिवासी साहित्य म्हणूनच गणले जाईल. वाहरू सोनवणे यांनी स्त्रिया, कामगार त्यांच्यावर अन्याय होता; अत्याचार होतो. अशा सर्वांचा विचार आदिवासी साहित्यात केला आहे. नेताजी राजगडकर यांच्या मते, "आदिवासींचे जीवन रेखाटणे म्हणजे आदिवासी साहित्य नव्हे तर सध्याच्या सर्व चळवळीत माझा आदिवासी कुठे आहे? हे शोधणे अगत्याचे आहे. जे साहित्य समाज जागृतीचे कार्य करू शकणार नाही ते आदिवासी साहित्य होऊ शकणार नाही." डॉ. माहेश्वरी गावित म्हणतात, "आदिवासी साहित्यात मानवी मूल्यांची वैश्विक संवेदना पाहावयास मिळते. ही संवेदना म्हणजे निसर्ग व जीवसृष्टी यांच्याशी सारख्याच सहानुभूतीचं मानवाचे असलेले वर्तन या तीनही घटकांच्या परस्परावलंबी जीवनाची परंपरा आदिवासी जीवनात दिसते.

आधुनिक काळात औद्योगिक साधनांच्या गर्दीत न हरविता आदिमतेची संवेदना आदिवासी साहित्यातून प्रकट होते. आणि तेवढ्याच तीव्रतेने ती वैश्विक पातळीवर अनुभवता येते. ही आदिमतेची संवेदना जितकी मुक्त, तितकीच कठोर, जितकी सहानुभूती तितकीच व्यवहार्य दिसते. ही आदिमतेची संवेदनेला आकाश, निसर्ग, जीवसृष्टी आणि मानव यांचा स्पर्श झालेला दिसतो. ही आदिमतेची संवेदना जगातील आदिवासी जमातींच्या संवेदनाशी समान असलेली दिसते. या दृष्टीने मराठी आदिवासी साहित्याचा जागतिक मराठी साहित्याच्या परिप्रेक्ष्यात परिघ ओलांडून भावात्मकतेने विचार करणे आवश्यक ठरते. मराठी आदिवासी साहित्य असे म्हणत असताना सुद्धा आदिवासींचे अस्तित्व, आदिवासी संवेदना आणि आदिवासी संवेदनेसह आदिम विधांचे प्रकटीकरण हे एखाद्या राज्याच्या भाषेच्या मर्यादेमध्ये सीमित होऊ शकत नाही. त्यामुळे तात्त्विकदृष्ट्या अभ्यासाचा परिप्रेक्ष्य समग्र आदिम जीवनाला व्यापतो हाही विचार महत्त्वाचा ठरतो." वरील सर्व आदिवासी साहित्य संदर्भात विचारवंतांच्या मतांचा विचार करता असे दिसून येते की, आदिवासी साहित्य आणि आदिवासी साहित्य चळवळ यांची



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad

व्याप्ती ही वैश्विक पातळीवरची आहे. जेथे जेथे आदिवासी जमाती आहेत. तेथे-तेथे आदिवासी साहित्यनिर्माण होत आहे आणि साहित्य चळवळही जोर धरु पाहत आहे. भूजंग मेश्रामांच्या म्हणण्यानुसार आदिवासी साहित्याची निग्रोच्या साहित्याशी नाळ जोडली आहे. त्याचबरोबर समाजाच्या सर्व स्तरांवर चळवळीने काम केले पाहिजे. हे शिवाजीराव मोघे याचे म्हणणेही तितकेच रास्त आहे. त्याचबरोबर नेताजी राजगडकर हे आदिवासींच्या अस्तित्वाचा शोध घेण्यास जास्त महत्त्व देतात. यावरुन एकंदरीत आदिवासी साहित्य आणि आदिवासी चळवळीची व्याप्ती विशाल आहे हे लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

निष्कर्ष :-

१. आदिवासी साहित्य हे पुरगत किंवा प्रस्थापित साहित्यापेक्षा वेगळे असून यामध्ये त्यांची जीवन पद्धती, संस्कृती, सण-उत्सव, प्रथा परंपरा यांचा समावेश होतो.

२. आदिवासी साहित्य हे व्यापक स्वरुपाचे साहित्य असून यामध्ये कोरकू, गोंड, भिल्ल, परधान, कोलाम, आंध, महादेव कोळी, वारली त्या जमातीवरील साहित्य असो किंवा आणखी इतर कोणत्याही जमातीवरील साहित्य असो, तसेच स्त्रिया व कामगार या सर्वांचा समावेश आदिवासी साहित्यातच होतो.

३. आदिवासी समाज, त्यांची संस्कृती आणि एकूण त्यांच्या जीवनपद्धतीचा समावेश आदिवासींच्या स्वरूपामध्ये होतो.

४. समकालीन स्थितीचा विचार करता आदिवासी साहित्यानेच मानवी जीवन पद्धतीला आकार देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे.

संदर्भग्रंथ :-

१. डॉ. गारे गोविंद, 'आदिवासी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे', सुगावा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती, २००५

२. तुमराम विनायक, 'आदिवासी साहित्यः दिशा आणि दर्शन', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०१२

३. वान्हेकर ज्ञानेश्वर, 'आदिवासी साहित्य : एक अभ्यास' स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००९

४. मुटाटकर रामचंद्र (संपा.), 'हाकारा', त्रैमासिक, वर्ष, ३५. अंक.१ पुणे, जानेवारी- मार्च- २०१४

५. गावित माहेश्वरी, 'महाराष्ट्रातील आदिवासी मराठी साहित्य एक शोध', दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे. प्रथमावृत्ती, २००८

६. मुटाटकर रामचंद्र (संपा.), 'हाकारा', त्रैमासिक, वर्ष, २३.अंक,१ जानेवारी-मार्च २००२

७. तुमराम विनायक, आदिवासी साहित्यः स्वरूप आणि समीक्षा', विजय प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती १९९४

2021-2022

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 44, Vol. 1<br>Oct. 2021 | Peer Reviewed<br>SJIF | ISSN : 2319 - 8648<br>Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

One Day International E-Conference

On

# Literature, Society and Global Media

## Organized By

IQAC and Department of Languages,

Kalikadevi Arts, Commerce & Science College, Shirur Kasar, Dist. Beed (MS)

**Oct. 2021 Special Issue- 44 Vol. 1**

**Chief Editor**

Mr. Arun B. Godam

**Excuative Editor**

Dr. S.K.Tupe

Principal , Kalikadevi College, Shirur Kasar. Dist. Beed

Shaurya Publication , Latur



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

16. काशिबाई का निटकरयांचे साहित्यिक इतिहासातील योगदान - 19 वेशतक 95
17. स्वातंत्र्यसैनिक अवंतिका बाई गोखले आणि हिंद समाज 99
18. स्त्री सक्षमीकरण सदयस्थितीआणि वास्तव 104
19. सत्री सक्षमीकरणात महिला बचत गटाचे योगदान 111
20. महिला सक्षमीकरणात भारतीय समाजसुधारकांची शिक्षणाच्या संदर्भातील भूमिका 118
21. महिला सबलीकरण : एक चिंतन 124
22. फुले, गांधी, आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणातील योगदान 128
23. भारताच्या संदर्भात महिला सक्षमीकरण 133
24. ग्रामीण स्त्रियांच्या समस्या आणि उपाययोजना 141

20

# महिला सक्षमीकरणात भारतीय समाजसुधारकांची शिक्षणाच्या संदर्भातील भूमिका

प्रा. डॉ. बालाजी परबतराव खराबे*

**प्रस्तावना:** समाजव्यवस्थेत स्त्रियांचे स्थान पुरुशांबरोबर असावे या विचाराने जगातील अनेक देषात स्त्रियांनी चळवळी उभ्या केल्या आहेत- भारतीय स्वातंयानंतर स्त्रियांचा विषय मोठ्या प्रमाणात चर्चिला गेला- महिलांच्या चळवळी महिलांनीच चालविल्या असे नव्हे, तर देषातील अनेक समाजसुधारकांनी महिलांमध्ये आत्मवि"वास, आत्मभान निर्माण कर.याचा प्रयत्न केला-

महाराष्ट्र शासनाने इ.स.1994, 2001 व 2014 मध्ये महिला धोरण जाहीर केले- या धोरणात स्त्रियांवरील अत्याचार, प्रसारमाध्यमांची भूमिका, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग, स्त्रियांना केंद्रस्थानी मानून योजनांची निश्चिती, स्वयंसहाय्यता बचत गटाचा विकास, मुद्रा योजना यांचा विचार केला जातो- या धोरणामुळे महिलांना शासकीय, निमशासकीय यंत्रणांमध्ये 30 टक्के तर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 50 टक्के आरक्षण मिळते।[1]

केंद्र व राज्य सरकारने महिलांच्या सक्षमीकरणासाठी सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक, औद्योगिक व प्रकाशन संस्थांमध्ये अनेक धोरणे आखून त्याची अंमलबजावणी कर। याचा प्रयत्न केला आहे-स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतर देशातील अनेक समाजसुधारकांपैकी राजा राममोहन रॉय, महात्मा जोतीबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा

गांधी, ईश्वरचंद्र विद्यासागर, गोपाळ गणेश आगरकर, डॉ-बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे इत्यादी समाजसुधारकांनी महिलांना स्वावलंबी व आत्मनिर्भर

* मराठी विभागप्रमुख, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद ता-मुखेड जि-नांदेड (M.S.)



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded

कर। यासाठी स्त्री शिक्षण हाच उपाय असल्याचे सांगून स्त्री शिक्षणावर भर दिला आहे- प्रस्तुत शोधनिबंधात फक्त 'महिला सक्षमीकरणात भारतीय समाजसुधारकांची शिक्षणाच्या संदर्भातील भूमिकेश्चा आढावा घेणार आहोत-

## महिला सक्षमीकरण म्हणजे काय?

1. ''कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सर्वच क्षेत्रामध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्राप्त क:न देणे, विकासासाठी संधी उपलब्ध क:न देणे आणि स्त्री-पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण असे म्हणतात-''[2]

2. नीरा देसाई-''स्त्रियांची चळवळ म्हणजे समानता आणि स्वातंत्र्य हे समान ध्येय मिळवि.यासाठी केलेला संघटित प्रयत्न आणि स्त्रियांच्या जीवनावर परिणाम करणाफ्रया निर्णायक बाबींविषयी संवेदनशीलता यामध्ये गृहीत धरलेली असते-''[3]

स्त्रीमुक्तीचे आंदोलन हे पुरुष दास्यापासूनचे मुक्ती आंदोलन आहे- स्त्री-पुरुष एकमेकांना परस्परपुरक आहेत- स्त्री-पुरु'ांनी एकमेकांच्या मर्यादा ओळखून जगायचे आहे- महिला सक्षमीकरणाचा पुढील भाग स्त्रियांना आर्थिकदृष्टा सक्षम करणे हा आहे- इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी इत्यादी राष्ट्रात स्त्रीमुक्ती चळवळीचा आधुनिक विचार गतिमान झाला होता- त्याच विचारशक्तीवर भारतीय स्त्रीमुक्ती चळवळ उभी आहे- भारतातील ज्या-ज्या समाजसुधारकांनी स्त्रियांना सक्षम कर। यासाठी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला आहे त्यांची कार्ये व भूमिका पुढीलप्रमाणे सांगता येईल-

राजा राममोहन रॉय: राजा राममोहन रॉय यांना आधुनिक भारताचे जनक म्हणून ओळखले जाते- भारतीय राजकारणात उदयाला आलेल्या उदारमतवादी परंपरेचेही ते जनक होते- राजा राममोहन रॉय यांचे विचार विश्वव्यापक होते- मानवी समाजाच्या सर्वच पैलूंवर त्यांनी प्रकाश टाकला आहे- रॉय परिवर्तनशील होते- त्यांचे परिवर्तन जीवनाच्या सर्वच क्षेत्रांशी निगडित होते- रॉय इंग्रजी शिक्षणाचे पुरस्कर्ते होते- इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांमध्ये नव्या जाणिवा व नवी क्षमता निर्माण होईल असे त्यांचे मत होते- पहिली इंग्रजी शाळा (1816) काढताना हाच आदर्श त्यांच्यासमोर होता- भारतात वैज्ञानिक शिक्षणासाठी झालेल्या चळवळीचे आद्य प्रवर्तकत्व त्यांनाच द्यावे लागते- त्यांनी पाश्चात्य शिक्षण पद्धतीचा स्वीकार केला- त्यांच्या या प्रयत्नामुळे भारतात आधुनिक पाश्चात्य शिक्षणाचा प्रारंभ हो। यास मदत झाली- रॉय यांनी स्त्री शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केला- रॉय यांनी बंगाली भाषेत गद्य वा्मिय निर्माण क:न महत्त्वाचे शैक्षणिक कार्य केले- त्यांनी शिक्षणाच्या आणि सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीने धार्मिक आणि ऐतिहासिक वाङ्मय निर्माण केले-[4]

एकोणिसावे शतक हे भारतीय प्रबोधनाचे युग मान। यात येते- प्रबोधन चळवळीचे प्रमुख म्हणून रॉय यांचा उल्लेख केला जातो- पाश्चात्य वैज्ञानिक दृष्टी भारतीय समाजाने स्वीकारावी व वेद-उपनिषदातील तत्त्वज्ञान समाजाने समजून ?यावे असे त्यांना वाटत असे- भारतीय प्रबोधनाचे प्रतीक, व्यक्तिस्वातंत्र्याचा पुजारी या नात्याने त्यांचे विचार व कार्य मान्य करावे लागते-

राजा राममोहन रॉय हे उच्च कोटीचे मानवतावादी आणि आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन बाळगणारे होते- स्त्रिया ह्या बौद्धिकदृष्ट्रा आणि शहाणपण यात पुरुषांपेक्षा कोणत्याही प्रकारे कमी नाहीत म्हणून त्या दोघांनाही समान अधिकार असावेत असे त्यांचे मत होते-5 राजा राममोहन रॉय यांना मॅकमिलनने 'सत्यशोधक' तर मॅक्सम्युलरने 'सर्वश्रेष्ठ मानव' अशी उपमा दिली आहे-

रॉय यांना स्त्री दास्यविमोचन सु: कर.याचा मान द्यावा लागेल- स्त्रियांच्या हक्काचे ते पहिले पुरस्कर्ते होते- रॉय यांनी स्त्री शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले नसले तरी स्त्री शिक्षणाची गरज त्यांनी अधोरेक्षीत केली आहे, हेही अत्यंत महत्त्वाचे आहे-

महात्मा जोतीराव फुलेः म-फुले हे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील श्रेष्ठ समाजसुधारक आणि समाज व धर्मचिंतक होते. म.फुले यांचे विचार व कार्य बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, रानडे, आग़रक़र या समाजसुधारकांच्या तुलनेत वेगळे आहेत- भारतातील शिक्षणविषयक प्रश्नांचा अभ्यास कर.यासाठी सरकारने नेमलेल्या हंटर आयोगास जोतीरावांनी आपले निवेदन सादर केले- त्यात त्यांनी म्हटले आहे की, उच्चवर्णियांच्या शिक्षणावर क्षर्च कर। यामागे सरकारची जी अपेक्षा आहे की, हे लोक क्षालच्या स्तरातील लोकांपर्यंत शिक्षणाचा लाभ पोहोचवतील ती अनाठायी आहे- सरकारने स्वतःच दलित शोषितांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे-[6]

इ.स.1848 साली जोतीरावांनी दलितांच्या मुला-मुलींसाठी पु.यातील भिडेवाड्यात शाळा काढली- त्या काळात संपूर्ण देशात ती पहिलीच शाळा होती- त्या काळात अशा शाळांसाठी शिक्षक मिळणे कठीण होते- जोतीरावांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई यांना शिक्षण दिले व त्यांना या शाळेत शिक्षिका म्हणून पाठविले- तत्कालीन लोकांना त्यांचे हे कार्य पसंत पडले नाही- फुले दाम्पत्यांना घर सोडावे लागले- पण त्यांनी हाती घेतलेले कार्य सोडले नाही व पुढील काही वर्शात जोतीरावांनी आणक्षी काही शाळा काढल्या- जोतीरावांचे स्त्री शिक्षणाचे कार्य अजरामर आहे- म्हणूनच जोतीरावांना स्त्री शिक्षणाचे उद्गाते म्हणून संबोधले जाते- 1852 साली स्त्री-शिक्षणाच्या कार्याबद्दल म-फुले यांचा तत्कालीन सरकारकडून विपेश गौरव कर.यात आला-



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

महात्मा गांधी: म. गांधी हे एक आदर्शवादी, अध्यात्मवादी व मानवतावादी पुरुष होते- गांधीच्या कार्यावःनच भारतीय जनतेने त्यांना 'महात्मा' ही पदवी दिली होती- म. गांधीनी आपले विचार 'हरिजन' व 'यंग इंडिया' ह्या वर्तमानपत्रातून प्रसि) केले आहेत- कर्म व चिंतन ह्यांचा समन्वय गांधीनी साधला होता- म. गांधीवर 'गीता', 'रामायण', 'महाभारत' आणि बौद्ध धर्मातील ग्रंथ यांचा प्रभाव होता-

गांधीजीच्या आदर्श राज्यातील प्रत्येक व्यक्ती सारशीच, श्रेष्ठ राहील- मग ती पुरुष असो की स्त्री- समाजातील सर्वांना गांधीजी समान संधी देत असत- म्हणूनच म-गांधीनी स्त्रियांच्या शिक्षणावर जोर दिला आहे- शिक्षण म्हणजे मनुष्याचा सर्वांगीण विकास होय-7 सामाजिक उन्नतीचे ते एक साधन आहे- शिक्षणाचा संबंध जीवनाशी असावा अशी गांधीची विचारसरणी होती- प्राथमिक शिक्षण राज्यात निःशुल्क व अनिवार्य असावे असे गांधी सांगत असत- शिक्षणामुळे व्यक्ती स्वावलंबी बनते- व्यक्तीला स्वावलंबी बनविणारे शिक्षण असायला हवे असे गांधीचे मत होते- गांधीच्या विचारांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात स्त्रियांवर पडल्यामुळे स्त्रियांनी आपले लक्ष शिक्षणाकडे वळविले- 1920 नंतर गांधीच्या प्रेरणेने स्त्रिया स्वातंत्र्य चळवळीत व राजकारणात उतरल्या- गांधीची पहिली शिष्या अवंतिकाबाई गोखले या महाराष्ट्रीय कर्तबगार मराठी महिला होत्या-

डॉ-बाबासाहेब आंबेडकर: भारतामध्ये पुरोगामी चळवळीला म-फुले यांच्यानंतर राजर्शी शाहू महाराजांनी सुःवात केली- त्यांच्या या कार्याला पुर्णत्वाकडे ने.याचे कार्य डॉ-बाबासाहेब आंबेडकरांनी केले- भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासात डॉ-बाबासाहेबांना महत्त्वाचे स्थान आहे- एक समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, कायदेपंडित अशा विविध पैलुत डॉ-बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान आहे- डॉ-बाबासाहेबांनी विविध विषयांवर आपली मते मांडली आहेत- येथे फक्त स्त्री शिक्षण याचाच विचार केला आहे. डॉ-बाबासाहेब आंबेडकर 'हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती' हा लेख लिहिला आहे. बाबासाहेबांनी स्त्रियांच्या सामाजिक सुधारणेसाठी स्त्री शिक्षणाचा मार्ग सांगितला आहे. कुटुंब नियोजनाचा त्यांचा हेतू स्त्री विकासाचा होता- स्त्री-पुरुष समता असावी असे बाबासाहेबांचे मत होते- स्त्री-पुरुष समता प्रस्थापित हो.यासाठी स्त्री-शिक्षण हा मार्ग आहे असे बाबासाहेब म्हणत असत- स्त्री शिकली तर कुटुंब शिकते- घरामध्ये स्त्री जर अडाणी असेल तर कुटुंब उन्नती कः शकत नाही अशी त्यांची धारणा होती- मुलांच्या जीवनामध्ये आईचा प्रभाव जाणवत असतो- समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी स्त्री शिक्षणावर भर दिला आहे- गुणवत्तेवर, चारियावर भर देऊन मुला-मुलींवर चांगले संस्कार करावेत अ्सा बाबासाहेबांचा स्त्रियांना उपदेश होता-[8]

स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळावे यासाठी त्यांनी सभागृहात 'हिंदू कोड बिल' मांडले- स्त्री कोणत्याही जातीची असो, ती दलित आहे असे लक्षात घेऊन त्यांना नऊ प्रकारच्या अधिकाराची तरतूद केली-



PRINCIPAL
Swami Vivekanand ...

निष्कर्ष:

1. एकोणिसावे शतक हे भारतीय प्रबोधनाचे युग म्हणून मान्यता पावले-
2. राजा राममोहन रॉय हे स्त्रियांच्या हक्काचे पहिले पुरस्कर्ते होते-
3. देशात मुलींची पहिली शाळा उघड.याचा बहुमान फुले दाम्पत्यांना द्यावा लागतो-
4. शिक्षणामुळे स्त्रियांना आत्मभान आले-
5. म. गांधीजींच्या प्रेरणेने स्त्रिया स्वातंत्र्य चळवळीत व राजकारणात उतरल्या-
6. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व अधोरेक्षीत केले आहे-
7. स्त्री शिक्षणामुळे स्त्रियांनी सर्वच शेत्रात नेत्रदीपक प्रगती साधली आहे-
8. शासन, स्वयंसेवी संस्था, विविध संघटना, चळवळी यांनी महिला सक्षमीकरणासाठी विविध कार्यक्रम हाती घेतले असले तरी महिला सक्षमीकरणाला म्हणावे तसे यश अद्याप आलेले नाही-

**समारोप:** महाराष्ट्रातील पुरुषांचा स्त्रियांकडे पाह.याचा दृष्टिकोन बराच उदार राहिला आहे- संत तुकाराम, संत रामदास या संतांनी स्त्रियांना आपल्या शिष्या बनवून बहुमान दिला आहे- स्त्रियांचे कैवारी म्हणून प्रसिद्ध असलेले जोतीराव फुले, वि-रा- शिंदे, गोपाळ गणेश आगरकर, धोंडो केशव कर्वे इत्यादी समाजसुधारकांनी सामाजिक अवहेलना व आर्थिक छळ सोसून स्त्रियांच्या उद्धारासाठी स्वत:ला वाहून घेतले आहे- डॉ. बाबासाहेबांच्या विचार व ख्रतीमुळे समाजातील उपेक्षित स्त्रियांनी शिक्षणाला महत्त्व दिले- त्यामुळे स्त्रियांना आत्मभान आले- पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान मिळते। असे असले तरी स्त्रिया आज पुरुषांच्या खांद्याला क्षांदा लावून प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करीत आहेत- याचे मु[ य कारण म्हणजे स्त्री शिक्षण होय-देशातील विविध महानगरातून शिक्षण घेणाफ्रया मुलींचे प्रमाण वाढत आहे- परंतु ग्रामीण, आदिवासी व वाडी तांड्यावरील मुलींचे शिक्षणाचे प्रमाण म्हणावे तेवढे वाढताना दिसून येत नाही- त्याकरिता लोकचळवळीची नितांत गरज आहे-

## संदर्भ


1. स्त्री सक्षमीकरणाच्या योजना mr.m.vikipedia.org.
2. स्त्री सक्षमीकरण म्हणजे काय? mr.m.vikipedia.org.
3. घनश्याम शहा, भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्र.आ. 2008




PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed,Dist.Nanded

4. साबळे डॉ. आर.डी., भारतीय राजकीय विचारवंत, अभय प्रकाशन, नांदेड, 1999
5. देशपांडे श्रीकांत वि., भारतीय राजकीय विचारवंत, मंगेश प्रकाशन, नागपूर, 1998,
6. भोळे डॉ. भा.ल., भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, जुलै 2012
7. देशपांडे श्रीकांत वि., उपरोक्त
8. कळंबे डॉ. दिनकर एस., भारतीय राजकीय विचारवंत, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, 2006

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN 2230-9578, 1 June-2021, Volume-11, Issue-16,
Sustainable Development Goals Initiatives, Execution, & Challenges

# नैसर्गिक व मानवी संसाधने एक अभ्यास

प्रा.डॉ.भरत माधवराव मुस्कावाड
इतिहास विभागप्रमुख, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमबाद, ता.मुखेड जि.नांदेड
E-malo:bharat12muskawad@gmail.com

**प्रस्तावना :-**

प्रस्तुत विषयामध्ये नैसर्गिक व मानवी संसाधने यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. निसर्गातील उपयुक्त असलेल्या घटकांना किंवा पदार्थांना नैसर्गिक संसाधने म्हणतात. नैसर्गिक संसाधनांमध्ये जमीन, पाणी, हवा, सूर्यप्रकाश इत्यादींचा समावेश होतो. तसेच स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेली खनिजे, खनिज तेल, वनस्पती यांचाही समावेश नैसर्गिक संसाधनामध्ये होतो. जीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी या वरील नैसर्गिक संसाधनांची महत्त्वाची गरज असते. तर मानव संसाधन ही एक संस्था किंवा कर्मचारी वर्ग असून त्या कंपनीच्या एकूण कर्मचाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांचा एका भागातील एकल कर्मचारी वर्ग म्हणजे मानवी संसाधन असे म्हणता येईल.

**संशोधन समस्या :-**

मानवी संसाधनाने जमीन, आकाश आणि समूद्र या तीन्ही पटलावर वर्चस्व निर्माण केले आहे. या अतिरेकी विकासासाठी नैसर्गिक संसाधनाचा मोठ्या प्रमाणात गैरवापर झाला. परिणामी वारंवार पडणारे दुष्काळ, अतिवृष्टी, अवर्षणग्रस्त, भूकंप, त्सूनामी, चक्रीवादळे, ज्वालामूखी, तापमानात वाढ इत्यादी समस्या निर्माण होऊन निसर्गाचे संतुलन बिघडले आहे. त्यामुळेच **नैसर्गिक व मानवी संसाधने एक अभ्यास** हा विषय निवडण्यात आला.

**संशोधनाचे उद्दिष्टे :-** 1.नैसर्गिक व मानवी संसाधने यातील फरक समजून घेणे. 2. नैसर्गिक व मानवी संसाधनाचे महत्त्व व वास्तव परिस्थिती जाणून घेणे.

**तथ्य संकलन व संशोधन पद्धती :-**

तथ्य संकलन म्हणजे एक प्रकारचा दस्तऐवज असते. ज्यात प्रकाशित व अप्राशित लिखानाच्या सर्वेक्षणाबद्दल माहिती दिलेली असते. ग्रंथालयामध्ये माहितीच्या स्वरूपातील ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्र, शोध निबंध या दुय्यम स्त्रोताद्वारे माहिती संकलीत केली आहे. प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**नैसर्गिक व मानवी संसाधने म्हणजे काय? :-**

मानवाला निसर्गातील उपयुक्त असलेल्या घटकांना किंवा पदार्थांना नैसर्गिक **संसाधने** म्हणतात. नैसर्गिक संसाधनांमध्ये जमीन, पाणी, हवा, सूर्यप्रकाश इत्यादींचा समावेश होतो. तसेच स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेली खनिजे, खनिज तेल, वनस्पती यांचाही त्यामध्ये होतो. जीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी **या संसाधनांची** गरज असते. मानवी संसाधने ही कंपनीच्या एकूण कार्यशैलीतील एक व्यक्ती असते, प्रत्येक व्यक्तीने आपले कौशल्य हे संस्थेला यशस्वी होण्यासाठी कार्य केले जाते. संस्था सुधारण्याच्या प्रयत्नात कोणतीही कामगार, ज्ञान किंवा भरपाईसाठी लागणाऱ्या वेळेवर व्यापार करण्यास तयार असलेली कोणतीही व्यक्ती मानवी संसाधन आहे. ते अर्धवेळ, पूर्णवेळ, स्वतंत्ररित्या काम करणारे किंवा कंत्राटी कर्मचारी असू शकतात. एकंदरीत मानवी संसाधने हे असे क्षेत्र आहे जे लोकांचे व्यवस्थापन आणि प्रशिक्षण देण्याचे काम करते.

**नैसर्गिक संसाधने :-**

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

मानवाला निसर्गातील उपयुक्त असलेल्या घटकांना किंवा पदार्थांना नैसर्गिक संसाधने म्हणतात. नैसर्गिक संसाधनांमध्ये जमीन, पाणी, हवा, सूर्यप्रकाश इत्यादींचा समावेश होतो. तसेच स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेली खनिजे, खनिज तेल, वनस्पती यांचाही समावेश यामध्ये होतो. जीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी या संसाधनांची गरज असते. नैसर्गिक संसाधनांचे वर्गीकरणच्या वेगवेगळया पद्धती आहेत. यानुसार नैसर्गिक संसाधनाचे तीन भागात वर्गीकरण केले जाते यामध्ये (१) संसाधनांचे स्रोत, (२) संसाधनांच्या विकासाचे टप्पे व (३) नूतनीक्षम या तिन्ही संसाधनाचे विश्लेषण पुढील प्रमाणे केले आहे.

**अ. नैसर्गिक संसाधनांचे स्रोत :-**

यांच्या उगमावरून त्यांचे जैव आणि अजैव असे प्रकार आहेत. जैव संसाधने ही जीवावरणातील घटकांपासून (उदा., वने, प्राणी, पक्षी इत्यादींपासून) प्राप्त होतात. यात कोळसा व जीवाश्म इंधन या जैव इंधनांचादेखील समावेश होतो. कारण ती सेंद्रिय पदार्थांच्या कुजण्यापासून तयार होतात. अजैव प्रकारात जमीन, पाणी, हवा, जड धातू (उदा., सोने, चांदी, तांबे, लोह इत्यादी) आणि वेगवेगळया खनिजांचा समावेश होतो.

**ब. नैसर्गिक संसाधनांच्या विकासाचे टप्पे :-**

**(१) संभाव्य संसाधने**
विशिष्ट क्षेत्रात उपलब्ध असून भविष्यात त्यांचा उपयोग होऊ शकतो. उदा., भारतात अनेक ठिकाणी खनिज तेलाचे साठे आहेत. परंतु जोपर्यंत त्यातून खनिज तेल काढले जात नाही तोपर्यंत त्याना संभाव्य संसाधनअसे म्हणतात

**(२) प्रत्यक्ष संसाधने**
ज्या संसाधनांचे सर्वेक्षण होऊन त्यांची गुणवत्ता आणि प्रमाण निश्चित केलेले आहे आणि त्यांचा सद्यस्थितीत उपयोग केला जात आहे, अशा संसाधनांना प्रत्यक्ष संसाधने म्हणतात.

**(३) आरक्षित संसाधने**
प्रत्यक्ष संसाधनांचा आरक्षित केलेला भाग व त्यांचा भविष्यात लाभकारी उपयोग करता येईल, अशा संसाधनांना आरक्षित संसाधने म्हणतात.

**(४) संग्रहित संसाधने**
सर्वेक्षण झालेले आहे, परंतु तंत्रज्ञान उपलब्ध नसल्यामुळे वापर करता येत नाही अशा संसाधनांना संग्रहित संसाधने म्हणतात. उदा., हायड्रोजन वायू.

**क. नूतनीक्षम संसाधने :-**

काही संसाधने नूतनीक्षम किंवा अनूतनीक्षम असतात. यामध्ये पाणी, सूर्यप्रकाश, हवा इत्यादी हे संसाधने कधीही संपणारी नाहीत, म्हणून त्यांना नूतनीक्षम संसाधने म्हणतात. जी संसाधने संपुष्टात येणारी आहेत, ज्या संसाधनांची उपलब्धता मर्यादित आहे त्यांना अनूतनीक्षम संसाधने म्हणतात. उदा., खनिजे, जैवइंधने इत्यादी.

**(१) नूतनीक्षम संसाधने**

नैसर्गिकरीत्या ज्या संसाधनांची पुनर्निर्मिती होऊ शकते अशा संसाधनांना नूतनीक्षम संसाधने म्हणतात. यात सौर ऊर्जा, पवन ऊर्जा इत्यादींचा समावेश होतो. ही संसाधने मुबलक प्रमाणात आणि निरंतर उपलब्ध असतात. मानवी वापरामुळे त्यांच्या प्रमाणावर होणारी घट नगण्य असते.

**(२) अनूतनीक्षम संसाधने**

ज्या संसाधनांच्या निर्मितीचा वेग अतिशय मंद आहे तसेच नैसर्गिकरीत्या ज्या संसाधनांची निर्मिती होत नाही, अशा संसाधनांना अनूतनीक्षम संसाधने म्हणतात. मानवी दृष्टिकोनातून अनूतनीक्षम संसाधने म्हणजे ज्यांच्या खपाचा वेग अधिक आहे आणि त्यामानाने त्यांची पुनर्निर्मिती मंद गतीने होते, अशी संसाधनामध्ये (उदा., जीवाश्म इंधन). जीवाश्म इंधनांच्या निर्मितीला कोट्यावधी वर्षे लागतात. त्यामुळे ती अनूतनीक्षम संसाधने ठरतात. धातूंची खनिजे पूर्नरप्रक्रिया करून वापरता येतात. मात्र, कोळसा व पेट्रोलियमचे पुनर्चक्रीकरण करता येत नाही. अनूतनीक्षम नैसर्गिक संसाधनांची उपलब्धता मर्यादित असते आणि मोठ्या प्रमाणावर त्यांची पुनर्निर्मिती व पुनर्वापर करता येत नाही. अशी संसाधने संपुष्टात आली की त्यांची पुनर्निर्मिती करता येत नाही. या संसाधनांच्या मागणीचा वेग हा त्यांच्या उत्पादनाच्या वेगापेक्षा नेहमीच अधिक असतो. पृथ्वीवर उपलब्ध असलेली नैसर्गिक संसाधने मर्यादित आहेत. त्यांचा वापर ज्या वेगाने होत आहे तो पाहता पुढील काही दशकात अनेक संसाधने संपुष्टात येऊ शकतात. त्यांच्या अतिवापरामुळे निसर्गाची अपरिमित हानी होते. तसेच प्रदूषण, जैवविविधतेचा ह्रास, नूतनीक्षम संसाधनांच्या उपलब्धतेत घट इत्यादी परिणाम दिसून येतात. नैसर्गिक संसाधनांचा वापर उचित झाला तरच पर्यावरणाचा समतोल कायम राहील. अनेक पारिस्थितिकी तज्ज्ञांनी असे दाखवून दिले आहे की, मानवाच्या अनिर्बंध वापरामुळे नैसर्गिक संसाधनांचा ह्रास असाच चालू राहिला तर सजीवसृष्टीतील अनेक घटकांना अस्तित्वास धोका पोहोचेल, मानवाचे अस्तित्व त्यामुळे धोक्यात येईल.

**मानवी संसाधने :-**

एखाद्या कंपनीकडे सामान्यत: बऱ्याच प्रकारच्या मालमत्ता असतात यामध्ये भांडवल, उपकरणे, पुरवठा किंवा सुविधा, उदाहरणार्थ तिचे लोक त्याची सर्वात महत्वाची संपत्ती असतात. कर्मचाऱ्यांना कामावर घेणे, समाधानी करणे, प्रवृत्त करणे, विकसित करणे आणि टिकवून ठेवले पाहिजे. मनुष्यबळ विभाग हा एक विभाग आहे जो कंपनीच्या मानव संसाधनांचे व्यवस्थापन करतो. मानवांना इतर स्त्रोतांपेक्षा अधिक व्यवस्थापन आणि वेगळया दृष्टिकोनाची आवश्यकता असते, म्हणूनच संपूर्ण विभाग त्यांना समर्पित करणे उपयुक्त आहे. परस्पर विवादाचे मध्यस्थी करीत असेल किंवा सेवानिवृत्तीची योजना आखत असो, मानव संसाधन विभाग हे हाताळण्यासाठी प्रशिक्षित आहे.

**मानवी संसाधनाची कार्यपद्धती :-**

कंपनीचे लोक अधिक प्रभावीपणे वापरणे हे मानवी संसाधनांचे उद्दीष्ट आहे. मानवी संसाधने यासारख्या समस्यांना सामोरे जाऊ शकतात. यामध्ये नुकसान भरपाई आणि फायदे, कर्मचाऱ्यांची भरती व नेमणूक करणे, ऑनबोर्डिंग करणे, कामगिरी व्यवस्थापन करणे, संघटना विकास व संस्कृतीचे जतन आणि प्रशिक्षण देणे इत्यादी कार्य पार पाडले जातात.

वरील क्षेत्रे प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या समाधानास आणि कामगिरीला हातभार लावतात. या भिन्न समस्यांना उपस्थित राहून, मानवी संसाधने उच्च-कार्यक्षम आणि प्रभावी कार्यबल सुनिश्चित करू शकतात, ज्यामुळे कंपनीला त्यांचे लक्ष्य आणि उद्दीष्टे अधिक कार्यक्षमतेने पोहोचण्यास मदत होते. मानव संसाधन विभाग देखील हे सुनिश्चित करते की कंपनी कामगार नियमांचे पालन करीत आहे व वातावरण वर्गाला त्रास देण्यापासून आणि इतर अडथळयांपासून मुक्त ठेवण्याचे कार्य करते. मानव संसाधन कर्मचारी कामाची जागा धोरणे तयार करण्यास आणि अंमलात आणण्यास मदत करतात, जसे की सुट्टीतील धोरणे किंवा ड्रेस कोड या धोरणामुळे कर्मचाऱ्यांमधील नियमांची योग्य आणि सुसंगत अंमलवजावणी होते. उदाहरणार्थ, कल्पना करा की टाटा ही कंपनीची विक्री प्रतिनिधी आहे. टाटा कंपनीच्या मानव संसाधनांपैकी एक आहे. एक कर्मचारी. टाटाला तिच्या कर्मचाऱ्यांच्या फायद्यांबद्दल किंवा नावनोंदणी फॉर्मबद्दल काही प्रश्न असल्यास, ती मदत करण्यासाठी मानव संसाधन विभागाशी संपर्क साधेल. टाटा कंपनी मधील आणि दुसरा कर्मचारी



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

व्यवस्थापकामध्ये मतभेद असल्यास, मानव संसाधन विभाग तोडगा काढण्यात मदत करू शकेल. विभाग याची खात्री करतो की टाटा आणि तिच्या कार्यसंघाच्या इतर सदस्यांनी योग्य ते प्रशिक्षण घेत आहेत जेणेकरून ते आपली कर्तव्ये कुशलतेने पार पाडू शकतील.

**मानवी संसाधनांना पर्याय :-**

मानवी संसाधनाची वरीच कामे काही मानवी-संसाधनांद्वारे अंमलात आणली जाऊ शकतात. दुसऱ्या शब्दात कधीकधी रोबोट्स किंवा संगणक मानवी कर्मचार्यांची जागा घेतात, विशेषतः धोकादायक परिस्थितीत किंवा पुनरावृत्ती कार्यासाठी याला ऑटोमेशन असे म्हणतात. यामुळे कार्यक्षमतेत मोठ्या प्रमाणात सुधारणा होऊ शकते. उदाहरणार्थ, आपल्याला बऱ्याचदा उत्पादन रेषांवर रोबोट्स आढळतात, जसे की कारसाठी. उत्पादनाचे काही भाग स्वयंचलितपणे उत्पादन गती वाढवू शकते, परंतु मानवांना अद्याप काही कामांसाठी आवश्यकता असते. मानव संसाधन कार्ये देखील विशिष्ट विभाग किंवा कर्मचारी अंमलात आणू शकतात. सामान्य मानव संसाधन व्यवस्थापकाऐवजी, नुकसान भरपाई आणि लाभ व्यवस्थापक, प्रशिक्षण पर्यवेक्षक किंवा कर्मचारी भरती तज्ञ असू शकतात. अशा विशिष्टतेमुळे जास्त कार्यक्षमता आणि बऱ्याचदा सुधारित नफा मिळू शकतात.

**मानवी संसाधनाचे उद्दिष्टे :-**

**१) व्यक्तिगत उद्दिष्टे**

व्यवसाय संघटनेत विविध पातळीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या व्यक्तिगत विकासाला आणि व्यक्तिगत उद्दिष्टाला मदत करणे हे मानवी संसाधन व्यवस्थापनाचे उद्दिष्ट आहे.

२) कार्यात्मक उद्दिष्ट

व्यवसाय संघटनेच्या कामकाजात सुसूत्रता व समन्वय कायम ठेवणे तसेच कार्य मूल्यमापन, मूल्यांकन करून किमान खर्चात महत्तम परिणाम साध्य करणे हे मानवी संसाधन व्यवस्थापनाचे उद्दिष्ट असते.

**३) संघटनात्मक उद्दिष्ट**

व्यवस्थापनाचे मूलभूत उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सक्षम यंत्रणा निर्माण करण्याचे कार्य मानवी संसाधन व्यवस्थापनाला करावे लागते. त्यासाठी मनुष्यबळ नियोजन करून त्यांचे प्रशिक्षण व विकासाच्या माध्यमातून व्यवसाय संघटनेला पूरक कार्य करण्याचे उद्दिष्ट मानवी संसाधन व्यवस्थापनाचे असते.

**४) सामाजिक उद्दिष्ट**

व्यवसायाला सामाजिक जबाबदाऱ्या पाळाव्या लागतात. शासनाने व्यवसाय संस्थेला लागू केलेले कायदे नियम यांचे कटाक्षाने पालन करणे आणि समाजकार्यात योगदान देणे हे मानवी संसाधन व्यवस्थापनाचे

**निष्कर्ष :-**

1. नैसर्गिक संसाधने हे निर्जिव स्वरूपात असून त्यांचे साठे काही कालावधी नंतर संपणारे आहेत. तर मानवी संसाधने सजीव असून त्यांचे अस्तित्व अनादी काळापर्यंत राहणारे आहे.
2. मानवी संसाधनाच्या अतिरेकीपणामुळे नैसर्गिक संसाधने संपण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे वेळीच मानवाने पर्यायी साधनाचा वापर नाही केला तर त्यांचे परिणाम मानवाला भोगावे लागणार आहेत.
3. नैसर्गिक संसाधनाचे योग्य ते संरक्षण व पूर्नरवसन करण्यासाठी शासनाने कायद्याची निर्मिती करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे काळाची गरज बनली आहे.

**संदर्भग्रंथ :-**

1. नीना कांडनकर, मानवी विकास, विद्या प्रकाशन नागपूर
2. एम.एन.निमय, मानवी साधनसंपत्ती व्यवस्थापन, शेठ प्रकाशन मुंबई
3. विजय कुमार तिवारी, पर्यावरण अध्ययन, हिमालय पब्लिकेशन, मुंबई
4. नईक फतेअली, आपले पर्यावरण, अनुवाद रा.वि.सोवनी, नॅशनल बुक, नवी दिल्ली
5. श्रीपाद देशमुख, जलप्रदूषण, अक्षय प्रकाश पुणे.
6. साईराम भट, नॅचरल रिसोर्सेस कॉन्झरवेशन लॉ. प्रकाशक: मेज पब्लिकेशन्स, नवी दिल्ली
7. प्रा.के.एम.खतीब, साधनसंपत्ती भूगोल, मेहता बुकसेलर्स, कोल्हापूर
8. विठ्ठल घारपुरे, भारताचा भूगोल, पिंपळापुरे अँड कंपनी, नागपूर
9. विजय शिंदे, द सेना स्टेट महाराष्ट्र, निराली प्रकाशन



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded

Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, 20 July 2021, Volume 11, Issue 21
Impact of Environment on Agriculture, Health, Water Resources, Social Life & Industrial Development

# पर्यावरण संवर्धन काळाची गरज

प्रा.डॉ.भरत माधवराव मुस्कावाड
*इतिहास विभागप्रमुख, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद, ता.मुखेड जि.नांदेड*
*E-male:bharat12muskawad@gmail.com*

प्रस्तावना :-

मानवी कृतीमुळे पर्यावरणाची घसरलेली गुणवत्ता वाढविणे व पर्यावरणाची स्थिती सुधारणे या हेतूसाठी जाणीवपूर्वक केलेली कृती. पर्यावरणाच्या अवनतीमुळे सर्व सजीवांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पर्यावरणतज्ञ, अभ्यासक, शासक, प्रशासक, सामाजिक तसेच राजकीय कार्यकर्ते या समस्यांवर विचारविनिमय करीत आहेत. त्यातूनच पर्यावरण व्यवस्थापन ही संकल्पना पुढे आली आहे. पर्यावरण व्यवस्थापन ही विकास व नियोजनाच्या संदर्भातील संकल्पना आहे. यात समाजाचा सर्वांगीण विकास करणे तसेच नैसर्गिक संसाधनांचा समतोल वापर करून सामाजिक व आर्थिक विषमता दूर करणे, ही उद्दिष्टे अभिप्रेत आहेत. त्याचबरोबर मानवाच्या अविचारी कृतींवर नियंत्रण, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण व पर्यावरणीय समस्यांच्या निवारणासाठी निर्धारित केलेली धोरणे यांचा पर्यावरण व्यवस्थापनात समावेश होतो. मानवाच्या सामाजिक व आर्थिक विकासाबरोबर पर्यावरणाची गुणवत्ता राखण्याचा प्रयत्न यातून केला जातो. पर्यावरण व्यवस्थापन ही मानव आणि निसर्ग यांच्यात समन्वय साधणारी प्रक्रिया आहे. त्याद्वारे पर्यावरणाचे संतुलन बिघडू न देता व नैसर्गिक पर्यावरण राखून मानवाचे हित साधण्याचा प्रयत्न केला जातो. पर्यावरणाच्या आवर्तीवर नियंत्रण ठेवण्याची प्रक्रिया ही पर्यावरण व्यवस्थापनाचे एक अंग असून यात नियोजन, विश्लेषण व मूल्यांकन यांच्या आधारे संसाधनांचा विचारपूर्वक उपयोग करण्याचे तंत्र वापरले जाते.

पर्यावरणाचे व्यवस्थापन विशिष्ट प्रदेश किंवा राष्ट्र यांच्याशी मर्यादित नसून ती संपूर्ण जगाची गरज आहे. भविष्यात मानवी समाजाच्या समन्यायक्षम उपयोगासाठी परिसंस्थांचे रक्षण करणे व परिसंस्थांतील असंतुलन टाळणे हे पर्यावरण व्यवस्थापनाचे ध्येय आहे.

**संशोधन समस्या :-**

संशोधन समस्या ही संशोधनाची प्रथम पायरी आहे. त्यामुळे कोणतेही संशोधन कार्य हाती घेत असताना संशोधकाला संशोधनाची समस्या निश्चित करावी लागते. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात **पर्यावरण संवर्धन काळाची गरज** ही संशोधनाची समस्या निवडली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. पर्यावरणाची संकल्पना समजून घेणे.
2. पर्यावरण व्यवस्थापनाचा आढावा घेणे.
3. पर्यावरणाचे महत्त्व जाणून घेणे.

**संशोधन पद्धती :-**

तथ्य संकलणाच्या अनेक पद्धती आहेत. परंतु मानव्यविद्या शाखेशी संबंधित असणारी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतींचा प्रस्तुत संशोधनासाठी उपयोग करण्यात आला आहे.

पर्यावरण व्यवस्थापनाची उद्दिष्टे

1. पर्यावरणातील निरनिराळ्या घटकांचे संशोधन करणे.
2. पर्यावरणाच्या नियोजनाची रूपरेषा तयार करणे.
3. पर्यावरणाच्या विविध घटकांना प्रदूषणमुक्त ठेवणे.
4. मानवाला प्रदूषणाच्या परिणामापासून वाचविणे.

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

5. अस्तंगत होत असलेल्या सजीवांना संरक्षण देणे.
6. पर्यावरणाचा दर्जा राखता यावा म्हणून विविध निकषाबाबी या बाबी ठरविणे, प्रदूषण नियंत्रणाद्वारे पर्यावरणाच्या गुणवत्तेचे रक्षण करणे.
7. व्यवस्थापनासाठी उपायांचे समीक्षण करणे व त्यात सुधारणा करणे.
8. व्यवस्थापनासाठी नियोजित केलेल्या उपायांच्या परिणामांची तपासणी करणे.
9. पर्यावरण व्यवस्थापनासाठी साहित्यसंग्रह करणे.
10. पर्यावरण शिक्षण देण्याची व्यवस्था करणे आणि समाजात जाणीव व जागृती निर्माण करणे.
11. संसाधनांचा बहुउद्देशीय वापर करून पारिस्थितिकीय संतुलन राखण्याचा प्रयत्न करणे.
12. जैवविविधतेचे परिरक्षण करणे.
13. स्वच्छ तंत्रज्ञान उत्पादन संकल्पना स्वीकारणे.
14. पर्यावरण संधारणासाठी नियम व कायदे करून त्यांची अंमलबजावणी करणे.

**पर्यावरण व्यवस्थापनाचे धोरण**

1. पर्यावरणीय अवनती टाळण्यासाठी हवा प्रदूषण, जलप्रदूषण व भूमिप्रदूषण यांवर प्रभावीपणे नियंत्रण आणणे व कार्यक्षम उपाय योजणे.
2. ऊर्जा संसाधनांसह इतर सर्व संसाधनांचा अतिवापर टाळणे व टाकाऊ पदार्थांची कमीत कमी निर्मिती व्हावी यासाठी कमी खर्चिक परंतु कार्यक्षम तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे.
3. शाश्वत विकासासाठी उत्पादन निर्मितीकरिता स्वच्छ तंत्रज्ञानाचा वापर करणे.
4. शाश्वत विकासासाठी पर्यावरण प्रभाव मूल्यांकन तपासणी, पर्यावरण व्यवस्थापन पद्धती, पर्यावरण जोखीम मूल्यमापन इत्यादी साधनांचा स्वीकार करणे.
5. व्यापक स्तरावर पर्यावरणीय जनजागृती व्हावी यासाठी प्रोत्साहन देणे आणि शिक्षणाच्या माध्यमातून पर्यावरण समस्यांची समाजात जागृती निर्माण व्हावी म्हणून विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे.
6. शैक्षणिक स्तरावर पर्यावरण शिक्षण व प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे.
7. लोकसंख्या वाढीस प्रतिबंध व्हावा यासाठी योजना आखणे.
8. सामाजिक समन्याय व्यवस्था प्रस्थापित होण्यासाठी प्रयत्न करणे.

**पर्यावरणाच्या प्रमुख घटकांचे व्यवस्थापन**

पर्यावरण हे जैविक तसेच अजैविक घटकांपासून बनलेले असते. असे व्यवस्थापन अत्यंत गरजेचे आहे. पर्यावरणातील काही प्रमुख घटक पुढीलप्रमाणे आहेत :

1. वन व्यवस्थापन,
2. वन्यजीव व्यवस्थापन,
3. मृदा व्यवस्थापन,

**पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व**

पृथ्वीवरील जीवसृष्टी ज्या विशिष्ट अधिवासात व नैसर्गिक परिस्थितीत जगते, त्या सर्व पार्श्वभूमीला सर्वसाधारणपणे 'पर्यावरण' असे म्हटले जाते. या पर्यावरणातील एक घटक म्हणजे माणूस. या माणसाच्या बुद्धिमत्तेमुळे आज पृथ्वीवर त्याचे अधिपत्य आहे. त्यामुळे उन्मत्त होऊन पर्यावरणाची पर्वा न करता त्याने विकास साध्य करण्याचे ठरविले तर तो विकास मायावीच्या फुग्याप्रमाणे आकर्षक दिसेल पण क्षणभंगुर ठरेल. या विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे, म्हणून प्रदूषणाचे प्रमाण कमी करून पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी व त्यातून चिरंतन विकास साध्य करण्यासाठी प्रामुख्याने पुढील उपाययोजना करता येतील.

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

निष्कर्ष :-

1. [illegible]
2. [illegible]



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq. Mukhed Dist. Nanded

3. पर्यावरणाचे महत्त्व अबाधित राहण्यासाठी परिस्थितीकीय सर्व घटकांचे संवर्धन करण्याची जबाबदारी ही शासन आणि नागरिकांनी उचलली पाहिजे.
4. पर्यावरणाचे महत्त्व जाणून घेणे.

*संदर्भग्रंथ सूची :-*

*1. www.wikipedya.org*
*2. विजय कुमार तिवारी, पर्यावरण अध्ययन, हिमालय पब्लिकेशन, मुंबई*
*3. लईक फतेअली, आपले पर्यावरण, अनुवाद रा.वि.सोवनी, नॅशनल बुक, नव्वी दिल्ली*
*4. श्रीपाद देशमुख, जलप्रदूषण, अक्षय प्रकाश पुणे,*
*5. साईराम भट, नॅचरल रिसोर्सेस कॉन्झर्व्हेशन लॉ, प्रकाशक: सेज पब्लिकेशन्स, नवी दिल्ली*
*6. प्रा.के.एम.खतीब, साधनसंपत्ती भूगोल, मेहता बुकसेलर्स, कोल्हापूर*
*7. एम.एल.लिमण, मानवी साधनसंपत्ती व्यवस्थापण, शेठ प्रकाशन मुंबई*

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 20 July-2021, Volume-11, Issue-27
Impact of Environment on Agriculture, Health, Water Resources, Social Life & Industrial Development

# जागतिक कोरोना महामारी एक अभ्यास

पवार विलास भाऊराव
*स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रामबाद, ता.मुखेड जि.नांदेड*
*E-male:vilaspawar63@gmail.com*

**प्रस्तावना :-**

आज कोरोना या जागतिक महामारीला जवळपास 18 महिने पूर्ण झालेले असूनसुध्दा ही साथ नियंत्रणात आलेली दिसून येत नाही. या महामारीने संपूर्ण जगामध्ये धुमाकूळ घातला आहे हे आपण पाहतोच आहोत. लाखो लोक मृत्यूमुखी पडत आहेत. काही देशांची अर्थव्यवस्था खिळखिळ करून टाकणारी ही प्रचंड मोठी महामारी आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केलेला नुकसानीचा प्राथमिक स्वरूपातील अंदाज ९ लाख कोटी डॉलर्स म्हणजेच जपान आणि जर्मनीच्या एकत्रित राष्ट्रीय उत्पन्नांच्या किंवा भारताच्या राष्ट्रीय उत्पादनाच्या ३ पट इतका आहे. या आर्थिक नुकसानीबरोबरच रोजगारात होणारी घट व त्यामुळे दारिद्र्यात होणारी वाढ संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अहवालात नमूद केली असून यामध्ये केवळ भारतातच ४० कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली ढकलेले जातील असे नोंदविले आहे. कोरोना या महामारीचे जगावर दुरगामी परिणाम झाले आहेत. मार्च २०२० पासून पूर्ण जग बंद थांबले आहे. जवळपास या ११ महिन्याच्या काळामध्ये उद्योग, कंपन्या, कारखाने बंद पडल्यामुळे अब्ज लोकांना रोजगार गमवावा लागला आहे. यामुळे जगात भयानक बेरोजगारीचा भडका उडाला आहे. तसेच या महामारिच्या भितिने ११ महिने स्वतःला चार भिंतीच्या आत कोंडून घेतल्यामुळे मनो रूग्णाचे मोठ्या प्रमाणात प्रमाण वाढीस लागले आहे. याविषयी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर शक्तिकांत दास म्हणतात की, कोरोना व्हायरस हे गेल्या १०० वर्षातील सर्वात मोठ आर्थिक आणि आरोग्य संकट आहे. यामुळे उत्पादन, रोजगार, शिक्षण, बेरोजगारी आणि लोकांच्या आरोग्यावर अभूतपूर्व नकारात्मक परिणाम झालेला आहे. अनेक घरातील कर्त्याव्यक्तीचे निधन झाल्यामुळे अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. प्रस्तुत शोध पेपरमध्ये कोरोना महामारीमुळे जगातील सर्वात जास्त दहा प्रभावित देशातील पिडीत रूग्ण संख्या, मृत्यू पडलेली संख्या, उपचारादरम्यान सुधारणा झालेली संख्या, उपचार घेत असलेल्या संख्येची आकडेवारी आणि मृत्यू दर यांचा आढावा घेतला आहे. तसेच भारतातील राज्य निहाय पिडीत रूग्ण संख्या, मृत्यू पडलेली संख्या, उपचारादरम्यान सुधारणा झालेली संख्या आणि उपचार घेत असलेल्या रूग्ण संख्येच्या आकडेवारी यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधन समस्या :-**

संशोधन समस्या ही संशोधनाची प्रथम पायरी आहे. त्यामुळे कोणतेही संशोधन कार्य हाती घेत असताना संशोधकाला संशोधनाची समस्या निश्चित करावी लागते. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात जागतिक कोरोना-महामारी एक अभ्यास ही संशोधनाची समस्या निवडली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. कोरोना ही जागतिक महामारी समजून घेणे. 2. कोरोना महामारीने प्रभावित देशाचा अभ्यास करणे.
3. कोरोना महामारीवरील उपाय योजनेचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :-** तथ्य संकलणाच्या अनेक पद्धती आहेत. परंतु मानव्यविद्या शाखेशी संबंधित असणारी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा प्रस्तुत संशोधनासाठी उपयोग करण्यात आला आहे.

| जागतिक कोरोना महामारीची सद्य कालीन परिस्थिती | | | |
|---|---|---|---|
| एकूण रूग्ण | मृत्यू रूग्ण | सुधारणा झालेले रूग्ण | उपचार घेत असलेलेÖ रूग्ण |
| 103,978,051 | 2,249,479 | 74,026,488 | 27,702,084 |



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

## जागतिक कोरोना माहामारीची सद्यकालीन परिस्थिती दर्शविणारा पाई बार




वरील तक्ता आणि पाई बार वरून असे स्पष्ट होते की, जगातील ७.६ अब्ज लोकसंख्येपैकी १०३,९७८,०५१ नागरिकांना कोरोनाची लागन झाली. लागन झालेले प्रमाण जगातील एकूण लोकसंख्येच्या ०.०१३ एवढे आहे. २२,४९,४७९ नागरिक मृत्यूमुखी पडले असून यांचे शेकडा प्रमाण १ टक्का एवढे आहे. एकूण लागन झालेल्यापैकी ७४,०२६,४८८ रूग्णामध्ये सुधारणा झाली असून त्यांचे शेकडा प्रमाण ३६ टक्के आहे. तर सद्या जगातील विविध दवाखाण्यात उपचार घेत असलेल्या रूग्णांची संख्या २७,७०२,०८४ एवढी असून त्यांचे शेकडा प्रमाण १३ टक्के आहे.

| जागतिक पटलावर पहिल्या दहा देशातील कोरोनाची सद्यकालीन परिस्थिती | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | देश | एकूण रूग्ण | मृत्यू रूग्ण | सुधारणा झालेले रूग्ण | मृत्यू दर |
| 1. | अमेरिका | २६,९११,३७५ | ४५४,२१३ | १६,६२१,५३० | १.६८ |
| 2. | भारत | १०,७६७,२०४ | १५४,५२२ | १०,४४७,४५० | १.४३ |
| 3. | ब्राझिल | ९,२३०,०१६ | २२५,२३८ | ८,२०२,३५४ | २.४४ |
| 4. | रशिया | ३,८३५,०८७ | ७३,६१९ | ३,३१८,१७३ | १.९१ |
| 5. | इंग्लंड | ३,८३५,७८३ | -- | १०६,५६४ | २.७७ |
| 6. | फ्रांस | ३,२०१,४६१ | ७६,५१२ | २२५,३१९ | २.३८ |
| 7. | स्पेन | २,८५२,७२९ | ५०,०८१ | १५०,३७६ | १.७५ |
| 8. | इटली | २,५००,९५७ | ८८,८४५ | २,०२४,५२३ | ३.५५ |
| 9. | तुर्की | २,४८५,१८२ | २६,११७ | २,३७०,४३१ | १.०५ |
| 10. | जर्मनी | २,२३२,४२९ | ५८,४७० | १,९९५,७६४ | २.६१ |

वरील नक्त्या वरून असे स्पष्ट होते की, जगात सर्वात जास्त अमेरिकेमध्ये ४,५४,२१३ एवढे लोक कोरोनामुळे मृत्यू पावले आहेत. त्याखालोखाल अनुक्रमे भारतात १,५४,५२२, ब्राझिल २२५,२३८, रशिया ७३,६१९, इंग्लंड १०६,५६४, फ्रांस ७६,५१२ स्पेन ५०,०८१, इटली ८८,८४५, तुर्की २६,११७ आणि जर्मनीत ५८,४७० एवढे नागरिक मृत्यूमुखी पडले आहेत.

### जगाच्या तुलनेत पहिल्या दहा देशांमध्ये कोरोना मृत्यू संख्या दर्शविणारा पाई बार




वरील पाई बारमध्ये जगातील एकूण मृत्यू झालेल्या नागरिकांचे प्रमाण दर्शविले असून सर्वात जास्त ३४ टक्के मृत्यू हे अमेरिकेमध्ये झाले आहेत. त्याखालोखाल अनुक्रमे ब्राझिल १७, भारत १२ टक्के, इंग्लंड ८, इटली ७, फ्रांस आणि रशिया प्रत्येकी ६ टक्के मृत्यू झाले आहेत.

| भारतातील राज्यानुसार कोरोनाची स्थिती दर्शविणारा तक्ता | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | राज्य | एकूण रुग्ण | मृत्यू झालेले रुग्ण | बरे झालेले रुग्ण | उपचाराधिन रुग्ण | मृत्यू दर |
| | महाराष्ट्र | 2028347 | 51109 | 1932294 | 43701 | 2.51 |
| | कर्नाटक | 939775 | 12220 | 921592 | 5944 | 1.30 |
| | केरळ | 932638 | 3761 | 859421 | 69216 | 0.44 |
| | आंध्र प्रदेश | 887900 | 7154 | 879504 | 1242 | 0.80 |
| | तमिळ नाडू | 838842 | 12363 | 821947 | 4532 | 1.47 |
| | दिल्ली | 635217 | 10856 | 623096 | 1265 | 1.70 |
| | उत्तर प्रदेश | 600470 | 8662 | 586505 | 5303 | 1.44 |
| | पश्चिम बंगाल | 570177 | 10179 | 554578 | 5420 | 1.78 |
| | ओरिसा | 335151 | 1959 | 332239 | 953 | 0.58 |
| | राजस्थान | 317587 | 2766 | 312873 | 1948 | 0.87 |
| | छत्तिसगढ | 305689 | 3706 | 297859 | 4124 | 1.21 |
| | तेलंगणा | 294587 | 1601 | 290894 | 2092 | 0.54 |
| | हरियाना | 267989 | 3022 | 263886 | 1081 | 1.12. |
| | गुजरात | 261838 | 4388 | 254209 | 3241 | 1.67 |
| | बिहार | 260794 | 1503 | 258136 | 1154 | 0.57 |
| | मध्य प्रदेश | 255263 | 3812 | 248897 | 2554 | 1.49 |
| | आसाम | 217154 | 1083 | 214248 | 476 | 0.49 |
| | पंजाब | 173470 | 5616 | 165753 | 2101 | 3.23 |
| | जम्मू कश्मिर | 124550 | 1936 | 121905 | 709 | 1.55 |
| | झारखंड | 118734 | 1073 | 117148 | 513 | 0.90 |



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उत्तराखंड | 96180 | 1648 | 92105 | 1081 | 1.71 |
| | हिमाचल प्रदेश | 57561 | 967 | 56200 | 378 | 1.67 |
| | गोवा | 53469 | 768 | 51977 | 724 | 1.43 |
| | पांडेचेरी | 33348 | 388 | 32918 | 19 | 1.16 |
| | मनिपूर | 29072 | 371 | 28562 | 139 | 1.27 |
| | चंदिगढ | 20957 | 334 | 20447 | 176 | 1.59 |
| | अरूणाचल प्रदेश | 16828 | 56 | 16762 | 10 | 0.33 |
| | मेघालय | 13764 | 146 | 13556 | 62 | 1.06 |
| | नॉगलॅंड | 12099 | 88 | 11810 | 54 | 0.72 |
| | लद्दाख | 9724 | 130 | 9526 | 68 | 1.33 |
| | सिक्कीम | 6091 | 133 | 5779 | 84 | 2.18 |
| | अंदमान निकोबार | 4994 | 62 | 4932 | - | 1.24 |
| | मिझोराम | 4372 | 09 | 4333 | 30 | 0.20 |
| | दादरा नगर हवेली | 3380 | 02 | 3334 | 06. | 0.05 |
| | लक्षद्विप | 99 | 00 | 56 | 43 | 00 |
| | एकूण | | | | | 1.43 |

वरील नकाशांचा अभ्यास केल्यानंतर एक बाब स्पष्ट होते की, भारतात सर्वात जास्त मृत्यूदर पंजाब राज्याचा शेकडा ३.२३ टक्के एवढा आहे. त्याखालोखाल अनुक्रमे महाराष्ट्र २.५१, सिक्किम, २.१८, उत्तराखंड १.७० दिल्ली १.७० यांचा क्रमांक येतो. तर सर्वात कमी मृत्यु दर अरूणाचल प्रदेश ०.३३ टक्के असून त्याखालोखाल केरळ ०.४८, आसाम ०.४९, तेलंगाणा ०.५८, आंध्र प्रदेश ०.८० आणि राजस्थान ०.८१ यांचा क्रम लागतो.

**सारांश :-** एकंदरीत भारत आणि जगातील एकूण कोरोना महामारीच्या आकडेवारीचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. यावरून एक बाब स्पष्ट होते की, कोरोनावर कोणत्याही प्रकारची औषधी उपलब्ध नसतानासुद्धा जगातील या महामारीचा मृत्यू दर जेमतेम १.५ च्या दरम्यान आहे. त्यामुळे ही महामारी फार गंभीर स्वरूपाची आहे, असे दिसून येत नाही. जगात कोरोनापेक्षा एड्स, डेंगू, कावीळ, कॅंसर, रक्तदाब, मदुमेह, सुगर, बीपी या आजावर अनेक प्रकारची औषधी उपलब्ध असतानासुद्धा दररोज लाखो लोक मृत्यूमुखी पडतात. याकडे कोणत्याही देशाचे शासन गांभीर्याने लक्ष देत नाही. कोरोनात जे काही लोक मृत्यूमुखी पडले आहेत यांचे एकमेक कारण विविध आजाराने ग्रस्थ आणि भिती हेच एकमेव कारण असू शकते. कोरोना या महामारीची जागतिक पातळीवर पदतशीरपणे जाहिरात करून काही देशांनी यांचा योग्य तो फायदा करून घेतला आहे. दुसरी बाब म्हणजे या आजारांचे जास्तीत जास्त प्रमाण उच्चभ्रू लोकांमध्ये असल्यामुळेच त्यांनी लाकडाऊन ही संकल्पना शोधून काढली. कारण झोपडपट्टीमध्ये अनेक साथीचे रोग असून सुद्धा कोणत्याही देशाने या रोगाचे निदान करण्यासाठी लाकडाऊन केल्याचे उदा.इतिहासात सापडत नाहीत.

**संदर्भ ग्रंथ :-**

*www.worldometers.info*

*www.who.int*

*www.wikipedia.org*

*www.who.org*

Dr Panchal

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*9th September 2021 Volume-12 Issue-9*

*On*

## *Resource Management and Agricultural Development*

**Chief Editor**
**Dr. R. V. Bhole**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot
No-23, Mundada Nagar, Jalgaon

**Executive Editors**
**Dr. N. G. Mali**
**Principal**
Sambhaji College (Arts, Commerce & Science), Murud, Latur

**Executive Editors**
**Dr. S. J. Phule**
**President**
Marathwada Association of Geographers, Latur

Co- Editors
Dr. H. S. Waghmare, Dr. S. N. Ubale, Dr. G. L. Jadhav
Prof. M. B. Gaikwad, Dr. B. N. Nagalgave,
Dr. V. R. Rathod, Dr. S. S. Pawar

**Published by-** Dr. N. G. Mali, Principal Sambhaji College (Arts, Commerce & Science), Murud, Latur

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

| | | |
|---|---|---|
| 48 | शेतकरी आत्महत्या : विशेष संदर्भ विदर्भातील/ अमरावती जिल्हा:-<br>Dr. Dode Archana Balasaheb | 181-184 |
| 49 | कृषी विकासात ग्रामीण प्रशासनाची भूमिका<br>प्रा. डॉ. वसंत पांडुरंग सरवदे | 185-186 |
| 50 | प्रणिलोट व्यवस्थापन क्षेत्राचा अभ्यास<br>म. प्रा. पांचाळ नारायण हनमंतराव | 187-190 |
| 51 | उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतीतील पिकप्रारूपातील क्षेत्र व उत्पादन एक अभ्यास (इ.स.१९९१ ते २०११)<br>[illegible] | 191-194 |
| 52 | केंद्र सरकारचा कृषी कायदा 2020 आणि शेतकरी आंदोलनाना अन्वयार्थ<br>डॉ.दत्ता कुंचेलवाड | 195-198 |
| 53 | भारतातील जल व्यवस्थापनाचा आकृतीबंध<br>डॉ. मानेराव जे. के. | 199-201 |
| 54 | अहमदपूर तालुक्यातील लोकसंख्येच्या घनतेचे भौगोलिक विश्लेषण<br>प्रा. डॉ. एन. के. वाघमारे श्री बी.ए. मोतेराव | 202-204 |
| 55 | हिंगोली जिल्ह्यातील प्रमुख पिकांचा भौगोलिक अभ्यास<br>प्रा. डॉ. भगवान प्रभाकरराव शेंडगे | 205-209 |
| 56 | शेती आणि नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन<br>डॉ. मुक्ता सोमवंशी मंगने | 210-213 |
| 57 | कोव्हिड -१९ पर्यावरण एक चिकित्सा<br>डॉ . पिसाळ हरिदास गुणवंतराव | 214-217 |
| 58 | भारतीय शेतीक्षेत्रातील रासायनिक खतांच्या अतिवापराचे दुष्परिणाम<br>प्रा. डॉ. अनिल धोंडीराम सत्रे | 218-223 |
| 59 | नांदेड जिल्ह्यातील सोयाबीन पिकांचे सुधारित तंत्रज्ञान : एक चिकित्सक अभ्यास<br>प्रा.डॉ पुरी एन.एन, प्रा.डॉ कोरे जी. एम | 224-227 |
| 60 | स्त्री आत्मचरित्र एक वाटचाल<br>प्रा. डॉ. श्रीहरी दासू चव्हाण | 228-229 |
| 61 | लातूर व औसा तालुक्यातील ग्रामीण वसाहतीचे प्रकार एक भौगोलिक विश्लेषण<br>Dr. A.R.Badade Mr. Lahane Baliram Shivaji | 230-236 |
| 62 | स्त्री आत्मचरित्र 'मी वनवासी'- एक चिंतन<br>डॉ.सोळंके चत्रभुज नारायणराव | 237-239 |
| 63 | कोरोना काळ _ पर्यावरणासाठी विधायक<br>डॉ. दैवशाला शिवाजी नागदे , डॉ. देविदास निळकंठ भोयर | 240-241 |

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 9 September-2021, Volume-12, Issue-9
Resource Management and Agricultural Development

# पाणलोट व्यवस्थापन क्षेत्राचा अभ्यास

प्रा. पांचाळ नारायण हनमंतराव
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद ता. मुखेड जि. नांदेड
E-malo:panchalnh@gmail.com

**प्रस्तावना :-**

राज्याच्या सिंचन क्षमतेचा विचार करता राज्यातील बहुतांश शेती पर्जन्याधारित आहे. या शेतीसाठी संरक्षित जल सिंचनाची साधने निर्माण करणे, जमिनीची प्रचंड प्रमाणात होणारी धूप थांबविणे तसेच पडीक जमिनीचा विकास करुन ग्रामीण भागातील उत्पन्नाची व उत्पादनाची साधने वाढविणे यासाठी जलसंधारणाचा कार्यक्रम राज्यात अनेक योजनांद्वारे राबविण्यात येत आहे. सन 1983 पर्यंत या कार्यक्रमाकडे केवळ मृद संधारणाचा कार्यक्रम म्हणून पाहिले जात होते. तसेच या कामासाठी खर्च होणाऱ्या निधीची वसुली देखील शेतकऱ्यांकडून करण्यात येत होती. त्यामुळे या कार्यक्रमाची व्याप्ती अत्यंत सिमीत राहिली. परंतु या कार्यक्रमाचे महत्व लक्षात घेवून हा संपूर्ण कार्यक्रम पूर्णत: शासकीय खर्चाने राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्यानंतर या कार्यक्रमास चालना मिळाली. सन 1983 नंतर मृद व जलसंधारणाच्या बाबी पाणलोट आधारीत करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यामुळे या कार्यक्रमास तांत्रिक स्वरूप प्राप्त झाले. पाणलोट कार्यक्रमात वेळोवेळी विविध विभागांचा आणि गरजेनुरुप नवनविन उपचारांचा समावेश करुन या कार्यक्रमाची परिणामकारकता वाढविण्याचे प्रयत्न वेळोवेळी करण्यात आले. राज्य शासनाप्रमाणेच केंद्र शासनाने सुरु केलेले अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम, एकात्मिक पडीक जमीन विकास, राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम, नदी खोरे प्रकल्प, पश्चिम घाट विकास कार्यक्रम, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम इ. योजना देखील शासनाने पुढाकार घेवून राबविण्याचा प्रयत्न केला. पाणलोट कार्यक्रम राबविण्यासाठी शासनाच्या विविध विभागाप्रमाणेच स्वयंसेवी संस्थांनाही या कार्यक्रमात सहभागी करुन हा कार्यक्रम लोकाभिमुख करण्याचे प्रयत्न वेळोवेळी करण्यात आले. सन 1992 मध्ये या कार्यक्रमाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने स्वतंत्र जलसंधारण विभागाची निर्मिती केली. तसेच कृषि, सामाजिक वनीकरण, लघुपाटबंधारे आणि जलसर्वेक्षण व विकास यंत्रणा या चार विभागांचा समावेश जलसंधारण विभागात करुन तो अधिक सक्षम केला. पाणलोट कार्यक्रमात शाश्वतता आणण्यासाठी लोकसहभाग अनिवार्य करुन या कार्यक्रमाबाबत लोकजागृती व लोकशिक्षण करण्याचे अनेक कार्यक्रम देखील राज्य शासनाने हाती घेतले.

पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या यशावर उत्पादनातील वाढ टिकाऊपणा, याबरोबर रोजगारनिर्मिती, अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्णता आणि एकूणच सामाजिक विकास अवलंबून आहे. म्हणून या संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांचा कृषी पध्दतीच्या बदलांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.रोजगार निर्मितीत पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमामूळे होणारा बदल अभ्यासणेशेतकऱ्यांच्या उत्पन्नात होणारा बदल शोधून काढणे.पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाचा समाजावर होणारा परिणाम अभ्यासणे.पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमातील उणिवा शोधून काढणे.

**संशोधनपध्दती :-** सामाजिक संशोधनामध्ये संशोधनाच्या अनेक पद्धती आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षणात्मक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धती बरोबर माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक व प्राथमिक व द्वितीय साधणाचा उपयोग करण्यात आला आहे.

**पाणलोट क्षेत्र विकास योजनेचे ध्येय :-** पाणलोट क्षेत्र विकास योजनेचे उद्दिष्ट जमीन, पाणी, वनस्पती या नैसर्गिक संपत्तीचा योग्य उपयोग करुन जमिनीची उत्पादनक्षमता वाढवून लोकांचे जीवनमान उंचावणे हे आहे. जीवन सुखी व समृध्द होवून राहणीमान उंचावण्यासाठी करावयाच्या कामाची उद्दीष्टे पुढीलप्रमाणे नमूद करता येतील.वृक्ष लागवड करणे.ii) मातीचा पोत सुधारणे.iii) पाण्याचे योग्य नियोजन करणे.iv) पशुपालन व त्यावर अवलंबून व्यवसायांचा विकास करणे.v) शेतीवर आधारित कृषी उद्योगात वाढ करणे.vi) सूर्यशक्ती व वनस्पतीजन्य उर्जेचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे.vii)लोकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावणे.viii) पाणी, आरोग्य, स्वच्छता, शिक्षण या गरजांना प्राधान्य देणे. वरील ध्येयावरुन असे दिसून येईल की, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हा फक्त "पाणी अडवा पाणी



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad To.Mukhed.Dist.Nanded

जिरवा" एवढया पुरताच मर्यादित नसून त्याहीपलीकडे जावून तो लोकांच्या सर्वांगीण विकासाचा महत्त्वपूर्ण कार्यक्रम आहे.

**पाणलोट क्षेत्र विकासाचे गुणधर्म :-**

अत्यंत सिमीत सिंचन क्षमता असलेल्या महाराष्ट्राकरिता मृद व जलसंधारणाचे महत्त्व असन्य साधारण आहे. पूर्ण सिंचनक्षमता विकसीत केल्यावरही राज्यातील जवळपास 70 टक्के क्षेत्र कोरडवाहूच राहणार असल्यामुळे ग्रामिण भागातील अर्थव्यवस्था बळकट करुन जनतेचे जीवनमान उंचावण्याकरिता कोरडवाहू शेतीचा अग्रक्रमाने विकास करणे अपरिहार्य आहे. याच कारणास्तव पाणलोट विकास कार्यक्रमास प्राधान्य देणे गरजेचे आहे. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमात गाव हा विकासाचा तर पाणलोट हा नियोजनाचा घटक मानण्यात येतो. पाणलोट तत्वावर काम करत असताना मृदा व जलसंधारण योजनेबरोबरच वनीकरण, सामाजिक वनीकरण, लघुपाटबंधारे, भू-जल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांच्या योजनेचा समावेश करण्यात येतो. या सर्व उपाययोजनांना हेतू पावसाने पडलेले पाणी जास्तीतजास्त प्रमाणात अडवून जमिनीत मुरवून भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे, जमिनीची धूप थांबविणे, शेती उत्पादनात वाढ करणे ही आहे. हा कार्यक्रम राबवताना ह्यामध्ये लोकसहभाग असणे नितांत आवश्यक आहे.

पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन :-

पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन म्हणजे त्या क्षेत्रातील उपलब्ध जमीन, पाणी, वनस्पती व इतर नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्यरितीने वापर करणे होय. पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन करताना यामध्ये जमिनीची धूप थांबविणे, जमिनीत पुनर्भरणासाठी पाणी अडवून जिरविणे, कृषी उत्पादन वाढविणे, जैविक समतोल राखणे इंधन व चारा उपलब्ध करणे या उद्दिष्टांचा समावेश आहे.

पाणलोट क्षेत्र विकासात लोकसहभाग व शासन :-

लोकसहभागाशिवाय पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम यशस्वी होऊ शकत नाही. लोकसहभागामुळे लोकांना कार्यक्रमाबद्दल आत्मीयता वाटते त्यामुळे कार्यक्रमाची अंमलबजावणी योग्य त-हेने परिणामकारकरित्या होण्यास मदत होते. कार्यक्रमास कमी खर्च येत असल्याने यातून कार्यक्रमांतर्गत निर्माण झालेल्या सोयीसुविधाचे जतन देखभाल आणि दुरुस्ती करणे सुलभ होते.

**पाणलोट क्षेत्राशी संबंधित केंद्र राज्याच्या योजना :-** राष्ट्रीय कृषि आणि ग्रामीण विकास बँकेने १९९०-९१ मध्ये सर्वंकष पाणलोट क्षेत्र विकास निधी स्थापन केला. महाराष्ट्र सरकारने १९८३ पासून सर्वंकष पाणलोट विकास कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली. पाणलोट क्षेत्र आधारित मृद व जलसंधारणाची कामे राबविण्याचा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. मृद जलसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन विभागामार्फत सध्या राज्यात पुढील केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येतात.केंद्रपुरस्कृत योजनाi) राष्ट्रीय पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमii) नदी खोरे प्रकल्पiii) पश्चिम घाट विकास कार्यक्रमiv) अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रमराज्यपुरस्कृत योजनाi) एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमii) भूविकास कार्यक्रमiii) आदर्श गाव योजनाiv) महात्मा फुले जल-भूमी संधारण अभियान २००२-२००४ अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम १००% केंद्र पुरस्कृत आहे. आदर्श गाव योजना 'लोकसहभागातून ग्रामविकास' या संकल्पनेवर आधारित आहे. १९९६-९७ पासून ही योजना राज्यस्तरीय योजना म्हणून राबविण्यात येते. कोरडवाहू शेतीसाठी जलसिंचन उपलब्धता वाढविण्यासाठी फेब्रुवारी २००२ पासून राज्यात महात्मा ज्योतिबा फुले जल-भूमी संधारण अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. हे अभियान २००२ ते २००४ या कालावधीत राबवायचे होते. पाणलोट विकास कामांना गती देण्यासाठी शासनाचे सातत्याने प्रयत्न सुरु आहेत. पूर्वीच्या कार्यक्रमात अंमलबजावणीच्या वेळी दिसून आलेल्या उणिवा नंतरच्या योजनांमध्ये राहू नये यासाठी सुधारित निर्देश दिले जातात तशा प्रकारच्या अलीकडचा प्रकल्प म्हणजे हरियाली हा प्रकल्प ग्रामपंचायतीद्वारे राबविला जात आहे. तांत्रिक नियोजन भांडवली गुंतवणूक आणि कार्यक्रम राबविणारी प्रचंड शासकीय यंत्रणा पाणलोट क्षेत्र विकासात सहभागी असूनही स्वयंसेवी संस्थांनी कार्यान्वित केलेल्या कार्यक्रमासारखे दृश्य परिणाम दाखवू शकत नाही. याबाबत दोन भिन्न विचारप्रवाह आहेत. एक शासनाच्या मते स्वयंसेवी संस्थाच्या कार्यक्रमात लोकसहभाग मिळविण्याची प्रक्रिया संस्थेच्या व्यक्तिगत प्रवर्तकाच्या नेतृत्वामुळे होऊ शकली आहे. दोन स्वयंसेवी संस्थांची अशी भूमिका आहे की, सरकारी कामात आखलेले नियोजन अर्थाविरच थांबते त्यामुळे झालेल्या गुंतवणुकीचा फायदा त्याठिकाणी असलेल्या प्रस्थापित लोकांनाच मिळतो व मोठा समूह नियोजित फायद्यापासून वंचित राहतो यात बदल होवून ध्येय साध्य करण्यासाठी योग्य पर्याय शोधण्यासाठी शासकीय व बिगरशासकीय सेवाभावी संस्थेचा पाणलोट विकास प्रकल्पांचा तुलनात्मक अभ्यास उपयोगी पडू शकेल. पाणलोटाच्या कामामध्ये



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded

संदर्भग्रंथ :-

1. http://panlotkshetravikas.weebly.com
2. www.wikipedya.org
3. मोरवंचीकर, (२००६) अमृतधारा', औरंगाबाद, सांकेत प्रकाशन, सुधारित आवृत्ती, पृष्ठ ५
4. यशदा, (२००६) 'सहभागी ग्रामीण समीक्षकण 'पुणे, यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन
5. प्रबोधनी, प्रकाश प्रथम आवृत्ती, पृष्ठ ३०
6. खोडके गणेशकुमार, २६ जुन २०१२, 'सकाळ' औरंगाबाद, पृष्ठ४
7. निकम, (२०१०) बहुजनांचे नायक चाळीसगाव
8. कृषि विभाग, केंद्र शासन भूसंसाधन विभाग पुरस्कृत एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन
9. विकास कार्यक्रम, औरंगाबाद जिल्हा कृषि अधिकारी कार्यालय पृष्ठ ६.
10. कृषि विभाग, केंद्र शासन भूसंसाधन विभाग पुरस्कृत' एकात्मिक पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन
11. विकास कार्यक्रम, औरंगाबाद जिल्हा कृषि अधिकारी कार्यालय पृष्ठ ६.
12. परांजपे सुहास, (२०००) जॉय के.जे. पाणलेट क्षेत्र विकासाच्या नव्या दिशा पुणे, महाराष्ट्र कृपी
13. महाराष्ट्र सिंचन विकास, सिंचन संशोधन व विकाससंबंधी माहिती देणारे त्रैमासिक, (पूर्ण, खंड
14. चितळे, भारतीय जलक्रांतीची पदचिन्हे, (मुंबई हिन्दुस्थान प्रकाशन संस्था, प्रथम आवृत्ती २००५)
15. हजारे, (२०११) माझे गाव माझे तीर्थ, अहमदनगर, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी,

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

SIMRJ ISSN: 2455-1511 Vol. VII Issue-II Oct-Nov-Dec 2021

SANSKRUTI INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
*Journal homepage: http://www.simrj.org.in Journal UOI: 1.01/simrj*

# दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहकार्य संघटनेच्या संपन्न झालेल्या शिखर परिषदांचा आढावा

प्रा.रविंद्र बाबुराव बाविस्कर[1] प्रा.डॉ.गुलाब हरी निकुंब[2]

१.संशोधक, सैनिकशास्त्र विभागप्रमुख, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद ता. मुखेड जि. नांदेड
२.मार्गदर्शक, संरक्षण व सामरिकशास्त्र विभागप्रमुख, प्रताप महाविद्यालय, अमळनेर
ई मेल- ravindrabaviskar3@gmail.com

**प्रस्तावना :**

आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्या विविध जागतिक, क्षेत्रीय संघटना उदयास आलेल्या आहेत. त्यांचे निश्चित असे ध्येय-धोरणे व तत्त्वे असतात. त्यानुसार त्या मार्गक्रमण करत असतात. मात्र त्यांच्या कार्यात सुसूत्रता व गती येण्यासाठी निर्णय घेण्याची जबाबदारी ही तिच्या प्रमुखावर सोपविलेली असते. त्यासाठी त्यांना निश्चित कालावधी एकत्रीत येवून परस्पर समन्वय, विश्वास, सहकार्य व मैत्रीपूर्ण भावनांसह सुसंवादाच्या माध्यमातून चर्चा करून निर्णय घ्यावे लागतात. त्यास सार्क राष्ट्रही अपवाद नाहीत. सार्कने आपल्या ध्येयधोरणाच्या दिशेने मार्गक्रमण करण्यासाठी सर्वोच्च निर्णय घेण्याची जबाबदारी शिखर परिषदेवर निश्चित केली असून त्यात सार्क सदस्य राष्ट्रांचे शासन प्रमुख सहभागी होतात. शिखर परिषद वर्षातून किंवा आपत्कालीन काळात आयोजित केली जाते. परंतु २००४ मध्ये झालेल्या १८ व्या शिखर परिषदेत ती दर दोन वर्षांनी आयोजित करण्यास सार्क राष्ट्रांनी मान्यता दिलेली आहे. अशा या सार्कच्या ७-८ डिसेंबर १९८५ पासून २६-२७ नोव्हेंबर २०१४ पर्यंत एकूण १८ शिखर परिषदा संपन्न झालेल्या आहेत.

**उद्देश :**

१) सार्कच्या एकूण शिखर परिषदा व त्यांच्या संपन्न झालेल्या ठिकाणाचा शोध घेणे.
२) सार्कच्या शिखर परिषदेतील महत्त्वपूर्ण ठरावांची माहिती संकलित करणे.

**गृहितके :**

१) सार्कच्या एकूण अठरा शिखर परिषदा संपन्न झालेल्या आहेत.
२) सार्कने सदस्य राष्ट्रांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वानुमते महत्त्वपूर्ण ठरावांना मान्यता दिली आहे.
३) सार्कने विविध एकात्मक कृती विशेष दिन साजरे केले आहेत.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी संशोधकाने प्राथमिक व द्वितीयक साधनांचा व विश्लेषणात्मक पद्धतीचा आधार घेतलेला आहे.

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

**विश्लेषण :**

दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहकार्य संघटनेच्या सनदेतील कलम ३ अंतर्गत सदस्य देशाच्या शासन प्रमुखांना शिखर परिषदेच्या माध्यमातून सर्वानुमते निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. शिखर परिषद ही सदस्य राष्ट्रांच्या ठिकाणी त्यांच्या आद्य अक्षरानुसार आळीपाळीने आयोजित केली जाते. ज्या देशात ती आयोजित केली जाते त्या देशाचे शासन प्रमुख तिचे अध्यक्षपद भूषवितात. या शिखर परिषदेत सर्वानुमते निर्णय घेतले जातात. द्विपक्षीय वादविवाद किंवा संघर्षाचे प्रश्न व्यासपीठावर उपस्थित करण्यास मनाई आहे. एखाद्या राष्ट्राने उपस्थित केल्यास ते विचारार्थ नसतात. या सार्कच्या शिखर परिषदा पुढीलप्रमाणे विविध ठिकाणी संपन्न झालेल्या आहेत.

**सार्कची पहिली शिखर परिषद (१९८५)**

सार्कची पहिली शिखर परिषद, ढाका येथे ७ व ८ डिसेंबर १९८५ रोजी संपन्न झाली. या परिषदेत सात राष्ट्रांचे शासन प्रमुख उपस्थित होते. त्यांनी सार्कची अधिकृतरित्या ८ डिसेंबर १९८५ रोजी स्थापन केल्याचे त्याठिकाणी जाहीर केले. या शिखर परिषदेत उभय राष्ट्रांनी पुढील ठरावांना सर्वानुमते मान्यता दिली.

१) सार्क राष्ट्रांना भेडसाविण्याऱ्या समान समस्या परस्परांच्या सहकार्याने सोडविणे.

२) आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाच्या प्रक्रियेला सहकार्य देवून मानवी शक्ती व नैसर्गिक साधनसंपत्तीचा यथायोग्य वापर करून सर्वसामान्य जनतेचे जीवनमान सुधारण्यावर भर देणे.

३) सार्क राष्ट्र सार्क राष्ट्रातील विकासाची गती प्रबळ करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर संघटितरित्या जबाबदारीने कार्य करतील.

४) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेला प्रोत्साहन देण्यासाठी निःशस्त्रीकरण व शस्त्र नियंत्रण करण्यास पाठिंबा देतील.

५) विकसित राष्ट्रांनी अविकसित, सार्क राष्ट्रांना आर्थिक मदत करावी.

**सार्कची दुसरी शिखर परिषद (१९८६)**

भारतातील कर्नाटक राज्याची राजधानी बंगळुरू येथे १६ व १७ नोव्हेंबर १९८६ रोजी झाली. या परिषदेत सात राष्ट्रांचे शासन प्रमुख उपस्थित होते. त्यांनी पुढील ठरावांना मान्यता दिली.

१) सार्क सचिवालय नेपाळची राजधानी काठमांडू येथे १६ जानेवारी १९८७ रोजी स्थापन करण्यास मान्यता दिली.

२) आकाशवाणी, दूरदर्शनचे प्रसारण सुरू करणे व पर्यटन क्षेत्राचा विकास करण्यावर भर दिला जाईल.

३) सार्क दस्ताऐवज केंद्र तसेच सार्क देशातील विद्यार्थी, तज्ज्ञ, संशोधक यांना शिष्यवृत्ती, फेलोशिप देण्याचे मान्य केले.

**सार्कची तिसरी परिषद (१९८७)**

सार्कची तिसरी परिषद नेपाळची राजधानी काठमांडू येथे २ ते ४ नोव्हेंबर १९८७ रोजी आयोजित करण्यात आली. त्या परिषदेत खालील ठरावांना मान्यता देण्यात आली.

१) दक्षिण आशियाई क्षेत्राला दहशतवाद मुक्त क्षेत्र बनविणे.

२) क्षेत्रीय आर्थिक विकासाचे धोरण, नैसर्गिक आपत्तीशी संघटित लढा देण्यासाठी आवश्यक नियोजनासह राष्ट्रीय संरक्षण खर्च कमी करणे.

३) आंतरदेशीय व्यापार, कृषी, ऊर्जा, राष्ट्रीय औद्योगिक धोरण प्रभावीपणे राबविण्यासाठी परस्पर सहकार्य करणे.

४) अमेरिका व रशिया यांनी आर्थिक, राजकीय, शस्त्र नियंत्रण व नि:शस्त्रीकरणाचे प्रयत्न सुरू केल्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

५) सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी सहकारी, व्यावसायिक संस्था, शिक्षणसंस्था संस्था यांची मदत घेणे, त्यांना मदत करणे.

सार्क देशाची अर्थव्यवस्था विकसित करण्यासाठी क्षेत्रीय आर्थिक संस्था विकसित करण्यास संमती देण्यात आली. तसेच नवीन सदस्यत्व व निरीक्षक राष्ट्रांना मान्यता देण्यासाठी स्थायी समिती नियुक्त केली.

**सार्क चौथी शिखर परिषद (१९८८)**

पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे २९ ते ३१ डिसेंबर १९८८ ला संपन्न झाली. या परिषदेत पुढील ठराव पारित करण्यात आले.

१) मालदीवमध्ये झालेल्या बंडाविरुद्ध (१९८८) त्यास सर्वतोपरी मदत केली जाईल.

२) मादक द्रव्य तस्करीवर नियंत्रण ठेवून त्याविषयी तरुणांमध्ये जनजागृती करणे.

३) सार्क राष्ट्रांच्या आर्थिक विकासासाठी सार्क-२००० योजना कार्यान्वित करून जनतेच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण केल्या जातील.

४) सार्क कृषीविषयक केंद्र ढाका येथे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

५) १९९० हे वर्ष बालिका वर्ष म्हणून साजरे करावे. तसेच आपत्ती व्यवस्थापन केंद्राची स्थापना करण्यास सहमती देण्यात आली.

**सार्कची पाचवी शिखर परिषद (१९९०)**

ही परिषद २१ ते २३ नोव्हेंबर १९९० ला माले येथे संपन्न झाली. या परिषदेत पुढील ठराव पारीत करण्यात आले.

१) सार्क प्रवास दस्तऐवज बाजारात उपलब्ध करून विशेष व्यक्तींना व्हिसाबाबत सूट देण्यात आली.

२) सार्क क्षेत्रात कुटीर उद्योगधंदे व हस्तकलेच्या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी संयुक्त उपक्रम राबविण्यास सहमती देण्यात आली.

३) अफगाण व पुर्नवसन पुनर्वसन या प्रश्नाबाबत सार्कने केलेल्या कराराचे स्वागत करण्यात आले.

४) व्यापार व उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन देण्यात आले.

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta Mukhed Dist Nanded

५) सार्क राष्ट्रांना भेडसावणाऱ्या निवाऱ्याच्या समस्या दूर करण्यासाठी १९९१ हे सार्क निवारा वर्ष म्हणून साजरा करण्यास मान्यता

६) १९९२ वर्ष पर्यावरण वर्ष म्हणून साजरे करणे, १९९ हे वर्ष अपंग वर्ष म्हणून साजरे करण्यास सहमती देण्यात आली.

७) क्षयरोग नियंत्रण केंद्र नेपाळमध्ये स्थापन करण्यास सहमती देण्यात आली.

**सार्कची सहावी शिखर परिषद (१९९१)**

२१ डिसेंबर १९९१ रोजी कोलंबो येथे संपन्न झाली. या परिषदेत पुढील ठरावांना मान्यता देण्यात आली.

१) सार्क देशांनी आपल्या उत्पादित मालाच्या व्यापारावर प्रतिबंध न लादता परस्पर व्यापार करण्यास संधी द्यावी.

२) मानव अधिकाराकडे आर्थिक व सामाजिक दृष्टिकोनातून बघावे.

३) ६ ते १४ वर्षे बालकांच्या प्राथमिक शिक्षणाची २००० पर्यंत सुविधा उपलब्ध करावी.

४) पोषक आहार व गरिबी निर्मूलनासाठी दाळ-भात योजना सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

५) दहशतवादी संघटनांचा बिमोड करण्यासाठी दहशतवादविरोधी कायद्याला सहमती देण्यात आली.

६) सार्क राष्ट्रात व्यापार व उद्योगधंद्यात परस्पर सहकार्य करण्यासाठी साफ्टा करारास मान्यता देण्यात आली. तसेच अपूर्ण प्रकल्प व नवीन प्रकल्पासाठी निधी उभारण्याचे मान्य केले.

**सार्कची सातवी परिषद (१९९३)**

१० व ११ एप्रिल १९९३ रोजी ढाका येथे संपन्न झाली. या परिषदेत पुढील ठराव मान्य करण्यात आले.

१) दारिद्र्याचे निर्मूलन करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचे मान्य केले. तसेच क्षेत्रीय व्यापार वृद्धी, एकात्मिक कृती योजना व २००२ पर्यंत गरीबी निर्मूलन करण्यास मान्यता दिली.

२) सार्क देशात व्यापार, उत्पादकता आणि सेवा क्षेत्रात उदारीकरणाचे धोरण राबविण्यासाठी साफ्टा करारास मान्यता देण्यात आली.

३) प्रत्येकासाठी घर या उद्देशाने गृहनिर्माण प्रकल्प सुरू करून सार्क देशातील जनतेला २००० पर्यंत हक्काचे घर उपलब्ध करून देण्याचे निश्चित केले.

४) १९९४ हे वर्ष सार्क युवक वर्ष म्हणून साजरे करणे तसेच १९९३ हे वर्ष अपंगत्व व्यक्ती वर्ष म्हणून साजरे करण्याचा संकल्प घोषित केला. तसेच १९९१ ते २००० हे सार्क बालिका दशक म्हणून राबविण्याचे मान्य केले.

५) विज्ञान-तंत्रविज्ञान, जैव-तंत्रज्ञान, जैव विविधता, ऊर्जा, औषधशास्त्रीय क्षेत्रात कनेक्टिव्हिटी, नेटवर्किंग द्वारे संशोधन करून माहितीची देवाण-घेवाण करणे, सार्क निधी स्थापन करण्यास सहमती देण्यात आली.

SIMRJ ISSN: 2455-1511 Vol. VII Issue-II Oct-Nov-Dec 2021

६) चोरटी आयात निर्यात, अंमली पदार्थाचे सेवन, गुन्हेगारी, दहशतवादी घटना रोखण्यासाठी परस्परांना सहकार्य करावे.

**सार्कची आठवी शिखर परिषद (१९९५)**

२ ते ४ मे १९९५ रोजी नवी दिल्ली येथे संपन्न झाली. या परिषदेत पुढील ठरावांना मान्यता देण्यात आली.

१) सार्क देशातील गरिबीचे २००० पर्यंत निर्मूलन करणे, १९९५ हे वर्ष गरिबी निर्मूलन म्हणून साजरे करणे, साफ्टा कराराची डिसेंबर १९९५ पासून अंमलबजावणसी करण्यास सहमती देण्यात आली.

२) सार्क मेट्रोलॉजिकल रिसर्च सेंटरची स्थापना ढाका येथे करण्यास सहमती तसेच १९९६ हे साक्षरता वर्ष म्हणून साजरे करण्याचे घोषित केले.

**सार्कची नववी शिखर परिषद (१९९७)**

१२ ते १४ मे १९९७ रोजी माले येथे संपन्न झाली. या परिषदेत पुढील ठरावांना मान्यता देण्यात आली.

१) सार्क सचिवांचा कार्यकाळ २ वर्षाचा बदल करून तो ३ वर्षापर्यंत वाढविण्यास सहमती देण्यात आली.

२) ७ व १० कलमांतर्गत तीन किंवा त्यापेक्षा अधिक सार्क देशांना विविध प्रकल्प व वैयक्तिक गरजा पूर्ण करण्यासाठी विशेष सहाय्यता देण्याचे मान्य करण्यात आले.

३) १९९७ हे सार्क शासन वर्ष साजरे करण्याचे तसेच ७ डिसेंबर १९९७ व १८ जानेवारी १९९८ रोजी पोलिओ लसीकरण राबविण्यास सहमती दिली. तसेच २०१० पर्यंत बालमजुरी बंद करण्याचे आश्वासन देवून २००१ ते २०१० हे बालअधिकार दशक तसेच १९९६ हे वर्ष सार्क साक्षरता वर्ष म्हणून साजरे करण्याचे घोषित केले. तसेच श्रीलंकेत ५० व्या वर्धापन दिनानिमित्त सार्क चित्रपट महोत्सव साजरा करण्यास मान्यता दिली.

**सार्कची दहावी शिखर परिषद (१९९८)**

२९ ते ३१ जुलै १९९८ रोजी कोलंबो येथे संपन्न झाली. त्यात पुढील ठरावांना मान्यता देण्यात आली.

१) सार्क राष्ट्रांत उपलब्ध असलेल्या अन्नधान्य, वनस्पती औषधी, नैसर्गिक साधनसंपत्ती यांचे कॉपीराइटस, पेटेंटस आणि मार्केटिंग फ्रँचायझीशी संबंधीत उद्भवणाऱ्या गंभीर समस्या सोडविण्यासाठी परस्पर सहकार्य करावे.

२) राष्ट्रीय बचक, संसदीय मंत्री, संशोधन संस्था, अर्थशास्त्रज्ञ, नियोजनमंत्री यांची तांत्रिक समिती गठीत करणे. पाकिस्तानमध्ये व्यापारी मेळावा आयोजित करण्यास व सार्क व्यापार उद्योग मंडळाचे अभिनंदन करणारे ठराव पारीत करण्यात आले.

८) सुरक्षा परिषदेतील ठराव क्र. २४२ (१९६७) व ३३८ (१९७३) याचे समर्थन केले

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

**सार्कची अकरावी परिषद (२००२)**

४ ते ६ जानेवारी २००२ रोजी काठमांडू येथे संपन्न झाली. त्यात पुढील ठरावांना मान्यता देण्यात आली.

१) सार्क राष्ट्रातील पर्यटन क्षेत्राचा विकास करण्यासाठी विविध सोयी-सुविधा सहपरस्पर सहकार्य, सुसूत्रता व सुलभता प्रस्थापित करण्यासाठी त्यांना हवाई मार्गाने जोडणे.

२) कमी व्याजदराने कर्ज सुविधा उपलब्ध करण्यासाठी मायक्रो क्रेडिट सुविधेला मान्यता देणे कृषी, विकास, गरिबी निर्मूलन, लघु व मध्यम हस्तकला, उद्योगांना प्रोत्साहन देणे, दत्तक योजना राबविणे.

३) काठमांडू येथे क्षयरोग केंद्र स्थापन करणे, २००५ पर्यंत पोलिओ मोहिम राबविणे, पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी विशेष यंत्रणा कार्यान्वित करणे, सार्क पुरस्कार देणे इत्यादी ठरावांना सहमती देण्यात आली.

**सार्कची बारावी शिखर परिषद (२००४)**

इस्लामाबाद येथे ४ ते ६ जानेवारी २००४ मध्ये संपन्न झाली. या परिषदेत पुढील ठराव पारित करण्यात आले.

१) सार्क राष्ट्रांमध्ये आर्थिक प्रगती जलद करण्यासाठी वाहतूक व दळणवळण व्यवस्था प्रबळ करणे.

२) २००५ हे वर्ष दक्षिण आशियाई पर्यटन वर्ष म्हणून साजरे करणे, क्षेत्रीय खाद्य बँकेची स्थापना करणे तसेच उच्च शिक्षण, प्रशिक्षण कौशल्य केंद्र स्थापन करण्यास सहमती देण्यात आली.

३) विविध संसर्गजन्य रोगांपासून बचाव व जनजागृती करण्यासाठी २००४ हे सार्क जनजागृती वर्ष म्हणून साजरे करण्यास सहमती, कोलंबो येथे सांस्कृतिक केंद्र तसेच तटक्षेत्र प्रबंधन केंद्र व सार्क माहिती केंद्र काठमांडू येथे उभारण्यास सहमती देण्यात आली.

**सार्कची तेरावी शिखर परिषद (२००५)**

१२ व १३ नोव्हेंबर २००५ रोजी ढाका येथे संपन्न झाली. त्यात पुढील ठरावांना मान्यता देण्यात आली.

१) सार्क राष्ट्रांना दारिद्र्य मुक्त क्षेत्र बनविण्यासाठी २००६ ते २०१५ हे दशक दारिद्र्य निर्मूलन दशक म्हणून साजरे करण्यास सहमती देण्यात आली.

२) सार्क गरिबी निर्मूलन निधी स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच १ जानेवारी २००६ पासून साफ्टा कराराची अंमलबजावणी करण्याचे घोषित करण्यात आले.

३) सार्क राष्ट्रात व्यापार सुरळीत करण्यासाठी हवाई सेवा-सुविधांसह सीमाशुल्क, प्रशासकीय साह्य, सार्क लवाद समिती, दुहेरी कर आकारणी इत्यादी बाबींना मान्यता देण्यात आली.

४) सार्क राष्ट्रातील निरक्षरतेचे निर्मूलन करण्यासाठी सार्वजनिक प्राथमिक शिक्षण प्रणालीद्वारा उपाययोजना राबविणे तसेच साथीचे रोगांना प्रतिबंधासह नियंत्रण करण्यासाठी परस्पर सहकार्य करणे.

५) भूतान पर्यावरण संवर्धन व रक्षणासाठी सार्क वनीकरण केंद्राची स्थापना करणे तसेच २००७ हे ग्रीन दक्षिण आशियाई वर्ष व २००६ हे वर्ष पर्यटन वर्ष साजरे करण्यास मान्यता देण्यात आली.

**सार्कची चौदावी शिखर परिषद (२००७)**

भारताची राजधानी नवी दिल्ली येथे ३ व ४ एप्रिल २००७ मध्ये संपन्न झाली. या परिषदेत पुढील ठरावांना मान्यता देण्यात आली.

१) अफगाणिस्तानला सार्कमध्ये आठवे पूर्ण सदस्य म्हणून मान्यता देण्यात आली.

२) सार्क देशाचे प्रत्येकी एक ग्रामीण क्षेत्र दत्तक घेवून त्याचा विकास करणे.

३) सार्क राष्ट्रात बहुविध वाहतूक प्रणालीस मान्यता तसेच भारतात २००७ मध्ये सार्क ऊर्जासंवाद परिषदेत मान्यता देण्यात आली.

४) सार्क विद्यापीठ स्थापन करण्यास मान्यता, आंतरराष्ट्रीय सुक्ष्माणू समितीची स्थापना, सकस अन्नधान्याचे व्यवस्थापन करण्यासाठी सार्क खाद्य बँक स्थापन करारास मंजूरी देण्यात आली.

५) भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी माहितीची देवाण घेवाण करणे.

**सार्कची पंधरावी शिखर परिषद (२००८)**

कोलंबो येथे २ व ३ ऑगस्ट २००८ मध्ये संपन्न झाली. त्यात पुढील ठरावांना मान्यता देण्यात आली.

१) वीज निर्मितीला प्रोत्साहन करण्यासाठी जलविद्युत, जैविक इंधन, सौरऊर्जा, वायू ऊर्जा इत्यादी क्षेत्रात परस्पर सहकार्य करणे, ग्रीड कनेक्टिव्हिटी आणि गॅस पाईप लाईनला मंजूरी देणे.

२) आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना प्रबळ करून परस्पर समन्वय प्रस्थापित करणे.

३) सार्क निधी, महिला सशक्तीकरण, मातृत्व, बाल आरोग्य, शिक्षक प्रशिक्षण इत्यादी क्षेत्रात गतीने कार्य करणे. सार्क निधीचे मुख्यालय थिम्पू येथे स्थापन करण्यास सहमती देण्यात आली.

**सार्कची सोळावी शिखर परिषद (२०१०)**

भूतानची राजधानी थिम्पू येथे २८ व २९ एप्रिल २०१० रोजी आयोजित करण्यात आली. त्यात पुढील ठरावांना मान्यता देण्यात आली.

१) दक्षिण आशियाई विचार मंच स्थापन करण्यास सहमती देण्यात आली.

२) सार्कने घोषित केले त्या सर्व योजनांची रौप्य महोत्सवानिमित्त पुर्तता करावी.

३) हवामान बदल थिम्पू परिषदेचा अहवाल विचारात घेवून त्याची अंमलबजावणी करावी.

४) कमी कार्बन डायऑक्साईडचे क्षेत्र बनविण्यासाठी सामूहिक प्रयत्न करावे.

५) सार्क युवा कृती कार्यक्रम कार्यान्वित करावे. तसेच सार्क विकास निधीचे स्वतंत्र सचिवालय व मुख्य कार्यकारी अधिकारी नियुक्त करावे.

६) सार्क राष्ट्रातील विद्यापीठांनी संशोधनाच्या संदर्भात आदान-प्रदान करावे. दूरस्थ शिक्षणाची सुविधा उपलब्ध करावी. व्यावसायिक पदव्यांना मान्यता द्यावी.



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq Mukhed Dist Nanded

७) २०१०-२० हे वर्ष सार्क आंतरक्षेत्रीय संपर्क दशक म्हणून साजरे करावे.

८) सार्क राष्ट्रांनी फौजदारी गुन्ह्यात परस्परांना सहकार्य करावे.

**सार्कची सतरावी शिखर परिषद (२०११)**

१० वी ११ नोव्हेंबर २०११ रोजी मालदीव व अड्ड याठिकाणी संपन्न झाली. या परिषदेत पुढील ठराव पारित करण्यात आले.

१) परस्परांत व्यापार व गुंतवणूक करण्यास प्राधान्य देण्यात यावे.

२) महिला व बालकांचे सशक्तीकरण व त्यांच्या हक्कांचे रक्षण करणे.

३) पर्यावरण ऱ्हास व हवामान बदलासंदर्भात जनजागृती करणे.

४) नैसर्गिक आपत्तीत परस्परांना मदत करणे, सार्क बि-बियाणे बँकेची स्थापना करणे.

५) पर्यटन व दळणवळण यंत्रणेत सुधारणा व गुंतवणूक करण्यास परस्परांना सहमती देणे.

६) महिला व बालकांची तस्करी रोखण्यासाठी सार्क क्षेत्रीय कार्यालय स्थापन करणे.

७) सार्क राष्ट्रात अस्वच्छता दूर करून शुद्ध पाण्याची सुविधा उपलब्ध करणे.

**सार्कची अठरावी शिखर परिषद (२०१४)**

नेपाळची राजधानी काठमांडू येथे २६-२७ नोव्हेंबर २०१४ रोजी संपन्न झाली. त्यात पुढील ठरावांना मान्यता देण्यात आली.

१) दक्षिण आशियाई आर्थिक संघ स्थापन करणे.

२) साफ्टा त्वरीत कार्यान्वित करणे तसेच सार्क निधीच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक क्षेत्राचा विकास करणे.

३) ऊर्जाक्षेत्रात परस्पर सहकार्य करणे.

४) खाद्य बँक, सार्क बीज मंडळ, क्षेत्रीय लस बँक, क्षेत्रीय पशुधन जीन बँक स्थापन करणे.

५) सार्क देशातून २०३० पर्यंत एड्स रोगांचे निर्मूलन व क्षयरोग व सार्क एड्स सेंटरचे आधुनिकीकरण करणे.

६) १६ जुलै जागतिक युवा कौशल दिवस म्हणून साजरा करणे.

७) अंतराळ तंत्रज्ञान विकसित करणे, भारत उपग्रह विकसित करण्यास सहमती तसेच २०१६ सार्क सांस्कृतिक वारसा वर्ष म्हणून साजरे करण्यास सहमती देण्यात आली.

८) सायबर निरीक्षक डेस्क स्थापन करण्यास तसेच सार्क शिखर परिषद दर दोन वर्षांनी आयोजन करण्यास मान्यता देण्यात आली.

पुढील शिखर परिषद पाकिस्तानमध्ये २०१६ मध्ये आयोजित करण्यास मान्यता दिली. परंतु ती भारत, अफगाणिस्तान, भूतान व श्रीलंकेने पाकिस्तानवर बहिष्कार टाकल्यामुळे अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आलेली आहे.

**सारांश :**

सार्क शिखर परिषदेत दहशतवाद, मादक द्रव्य, शस्त्र तस्करी तसेच द्विपक्षीय वादविवाद यास प्रतिबंध करण्यात आलेला असून वेगवेगळ्या विषयांवर महत्त्वपूर्ण ठराव घेण्यात आलेले आहेत. शिवाय वेगवेगळ्या वर्ष साजरे करण्याबाबतही सहमताने निर्णय झालेले दिसून येतात.

संदर्भ :

1) Statement and Declaration of SAARC Summits of the Heads of State or Government (1985-2010), Institute of Foreign Affairs, IFA, Tripureshwar, Kathamandu, May 2010
2) Ministry of External Affairs, Government of India, Media Center, SAARC Declaration, January 4-6 2002, Kathmandu, Nepal
3) Dhaliwal Shveta, Development of Regionalism in South Asia-Some Reflection on SAARC, M.D. Publication Pvt. Ltd. Darya Ganj, New Delhi, 2009
4) Sharma D.K., SAARC Organizational Set Up and Economic Aspects, Pearl Book, Darya Ganj, New Delhi, 2012
5) www.saar.sec.org
6) SAARC Secretariat, Press Realise 2020/3/15, Kathmandu, Nepal
7) Rashmi Sharma, SAARC, Concept, Growth, Development, Regal Publication, New Delhi, 2007

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

अंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

April To June 2022
Issue 42, Vol-03

Date of Publication
01 April 2022

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहुभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र बीड

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At Post Limbaganesh Tq Dist Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell 07588057695 09850203295
harshwardhanpubli@gmail.com vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded

14) LAWS RELATING TO DIGITALIZATION: IN INDIAN PERSPECTIVE
**Dr. Anju Gahlot & Kapil Dev, Jaipur** ||68

15) Two reported species of Emericella from Amravati district
**P.S. Kaste, Distt. Amravati (M.S.)** ||75

16) A Study of Awareness Towards Cyber Crime of College Students In ...
**Dr. Navinta Rani, Modinagar** ||76

17) Doctoral thesis submitted to the School of Social Sciences, University of ...
**Dr. Yakub Ali, Dr. P.Srinivasulu, P. Latha Sri & Nazneen Tabassum, Hyderabad** ||81

18) Library Its Growth Development Role Modern Society Computer
**Dr. Sarla P. Nimbhorkar, Umarkhed** ||85

19) AN ANALYTICAL STUDY ON THE ECONOMY OF ANCIENT INDIA
**Dr. Pramila Soren, Bhagalpur, Bihar** ||89

20) PLIGHT OF UNTOUCHABLES IN MEENA KANDASAMY'S "THE GYPSY GODDESS"
**Dr. Raheel K. Quraishi, Dist: Nagpur (MS)** ||94

21) SOCIO-ECONOMIC CONDITIONS OF WOMEN ENTREPRENEURS WITH SPECIAL ...
**C.Vinod Kumar, Hyderabad** ||98

22) ग्रामीण साहित्याची बदलती भाषा
**प्रा.डॉ. एच. डी. आकोटकार, जि. बुलडाणा** ||103

23) दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहकार्य संघटनेत भारताची आर्थिक भूमिका : विशेष संदर्भ - सार्क राष्ट्रातील ...
**प्रा.बाविस्कर रविंद्र बापूराव, जि.नांदेड** ||106

24) ललित गद्य : एक साहित्यप्रकार
**सौ.तनुजा उल्हास ढेरे, ठाणे वेस्ट** ||108

25) केंद्रियशास्त्र मूल्यमापनासाठी कौशल्यपूर्ण साधने
**डॉ. हिसले महादेव सदाशिव, बार्शी** ||113

26) ग्रामीण साहित्य आणि शेतकरी
**प्रा.डॉ.सुरेश व्यंकटराव कदम, परभणी** ||116

Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded



आहे

संदर्भसूची–

१. कोरतापल्ले / भगत / लिंबाळे– ग्रामव्यांचा वाङ्मयीन प्रवाह, प्रकाशक, यशवंतभूमि, औरंगाबाद – ३३, प्रथमावृत्ती मार्च २००९, पृ. क्र. ६३

२. तत्रैव

३. तत्रैव, पृ. क्र. ८८

४. तत्रैव

५. तत्रैव पृ. क्र. ८५

६. पाटील मोहन –ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, स्वरूप प्रकाशन, 'अक्षर' ८५८, सह्याद्री नगर, एन – ५ दक्षिण, सिडको, औरंगाबाद – ०३, तिसरी आवृत्ती, ५ सप्टें. २०१३, पृ. क्र. १४८

ЖЖЖ

**23**

# दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहकार्य संघटनेत भारताची आर्थिक भूमिका : विशेष संदर्भ - सार्क राष्ट्रातील व्यापारातील चढ उताराची कारणे

**प्रा.चाविस्कर रविंद्र बाबुराव**
सहयोगी, अर्थशास्त्र विभागप्रमुख,
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद, ता.मुखेड, जि.नांदेड

*************

**प्रस्तावना**

दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहकार्य संघटना अर्थात सार्क ही दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक, वैज्ञानिक व तांत्रिक विकासासाठी ८ डिसेंबर १९८५ मध्ये स्थापन करण्यात आली आहे. या संघटनेत दक्षिण आशियातील अफगाणिस्तान, बांग्लादेश, भारत, भूतान, नेपाळ, मालदीव, पाकिस्तान, श्रीलंका हे आठ देश सदस्य आहेत. तर ऑस्ट्रेलिया, चीन, जपान, मॉरिशस, म्यानमार, दक्षिण कोरिया, संयुक्त राज्य अमेरिका इत्यादी देश व युरोपीय क्षेत्र हे निरीक्षक आहेत.

दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहकार्य संघटना ही दक्षिण आशियातील भिन्न शासन पद्धती व विचारधारा असलेल्या आठ राष्ट्रांची एक आर्थिक व राजकीय स्वरूपाची संघटना असून देशातील तिच्या व्यासपीठावर एकत्रित येऊन सर्वानुमते निर्णय घेतले जातात.

सार्क राष्ट्रांनी दक्षिण आशियाई क्षेत्राचा आर्थिक व व्यापारी दृष्ट्या विकास करण्यासाठी उदारीकरणाच्या धोरणाचा स्वीकार करून व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचे असलेल्या बाबी व बाबींना वगळता मान्यता देऊन दक्षिण आशियाई राष्ट्रामध्ये आर्थिक व व्यापारीदृष्ट्या वृद्धी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी त्यांनी विविध क्षेत्रात विशेष सोयी-सुविधा परस्परांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु तरी देखील सार्क राष्ट्रातील व्यापारात सातत्याने वृद्धी न होता त्यात चढ-उतार होत असल्याचे आढळून आलेले आहे. त्यास अनेक कारणे जबाबदार ठरली आहेत

**उद्देश**

१) सार्क राष्ट्रातील द्विपक्षीय व्यापाराची माहिती संकलित करणे.



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded

३) सार्क राष्ट्रांच्या व्यापारावर परिणाम करणाऱ्या कारणांचा शोध घेणे.

## गृहितकृत्ये

१) सार्क राष्ट्रांत परस्परात अनेक मुद्यांवर मतभेद आहेत.

२) सार्कच्या व्यापारविषयक घेण्यात आलेल्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही.

३) सार्क राष्ट्रात परस्परात व्यापारी संबंध दृढ न करता सार्क बाह्य राष्ट्रांना प्राधान्य देतात.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी संशोधकाने द्वितीयक स्रोत साधनांचा व विश्लेषणात्मक पद्धतीचा आधार घेतलेला आहे.

## विश्लेषण

दक्षिण आशियाई क्षेत्रातील राष्ट्रांना परस्परांच्या सहकार्याने आर्थिक व व्यापारदृष्ट्या विकास करण्याच्या उद्दात हेतूने दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहकार्य संघटना (SAARC) अर्थात सार्क उदयास आलेली आहे. मात्र या हेतूला सार्क राष्ट्रांना विसर पडत आहे. सार्क राष्ट्रातील व्यापारात वृद्धी न होता त्यात सातत्याने चढ-उतार होत असलेले असून त्यास पुढील कारणे जबाबदार आहेत.

### १) सार्क राष्ट्रातील शासन प्रमुखांचे उदासीनतेचे धोरण :

सार्क राष्ट्र विविध शासन पद्धती व विचारधारेचे देश आहेत. त्यांच्या अशा भिन्नतेतून त्यांच्यात राजकीय, सैद्धांतिक मतभेद आहेत. अनेक कारणांनी परस्परामध्ये वादविवाद आहेत. असे वादविवाद किंवा संघर्षाचे मुद्दे सार्क व्यासपीठावर उपस्थित करण्यास मनाई असताना मात्र सार्क राष्ट्रांचे शासन प्रमुख असे मुद्दे वारंवार उपस्थित करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांच्यात परस्पराबद्दल संशयाची, अविश्वासाची भावना निर्माण होते. त्यामुळे सार्क व्यासपीठावर घेण्यात आलेल्या आर्थिक व व्यापारदृष्ट्या महत्त्वपूर्ण निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी न जाणूनबुजून दुर्लक्ष करतात. त्याचा परिणाम हा त्यांच्यातील द्विपक्षीय व्यापारी संबंधावर होत असून व्यापारात त्यातून चढ-उतार होताना आढळून येते.

### २) व्यापारी सवलतींचा अभाव :

सार्क राष्ट्रांनी आपला आर्थिक व व्यापारी दृष्ट्या विकासाचा वेग वाढविण्यासाठी व्यापारी क्षेत्रात गुंतवणूक करणे, परस्परांना सहकार्य, प्रोत्साहन व विविध सोयी-सवलती देणे अत्यावश्यक असताना मात्र सार्क राष्ट्र अशा घटनाकडे दुर्लक्ष करतात. उलट परस्परांच्या व्यापारावर वरील निर्बंध लादण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांच्या आर्थिक व व्यापारदृष्ट्या विकास न होता त्यांच्यावर आंतरराष्ट्रीय कर्ज सातत्याने वाढत आहे. परकीय चलनात सातत्याने घट होत आहे. बहुपक्षीय तसेच द्विपक्षीय व्यापारावर अधिकाधिक कडक निर्बंध लादत असल्यामुळे त्यांच्या व्यापारात घसरण आढळून आहे.

### ३) सार्क राष्ट्रातील राजकीय स्थिरता:

सार्क राष्ट्रामध्ये विविध शासन पद्धती, पक्ष पद्धती अस्तित्वात आहेत. त्यामुळे सत्ता प्राप्तीसाठी वारंवार त्यांच्या देशात निवडणुका होत असल्यामुळे सार्क व्यासपीठावर तत्कालीन परिस्थितीनुरूप घेतलेल्या निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना मात्र राजकीय स्थित्यंतर घडून आल्यामुळे त्यावर अडथळे निर्माण होत असल्यामुळे सार्क राष्ट्रातील व्यापारात चढ-उतार होत आहेत. सार्क राष्ट्रातील व्यापाराचा दर हा जागतिक तुलनेत १.७ टक्के ते ३.८ टक्के इतका नोंदविला आहे.

### ४) सार्क राष्ट्रातील नकारात्मक बाबी :

सार्क राष्ट्रात सातत्याने वाढत जाणारी लोकसंख्या, बेरोजगारी, दारिद्र्य व आरोग्याच्या समस्या मोठ्या प्रमाणात आहेत. तसेच शरणार्थी, शहरीकरण, दंगल, पाणी टंचाई, निरक्षरता इत्यादी नकारात्मक बाबींचे प्रमाण हे अधिक आहे. त्याचा सरळ-सरळ प्रभाव हा त्यांच्या अर्थव्यवस्थेवर पर्यायाने विकासाच्या गतीवर होत असल्यामुळे अशा गुंतागुंतीच्या समस्या सोडविण्यातच त्यांचा बराचसा वेळ व पैसा खर्च होत असल्याने भांडवल गुंतवणुकीच्या अभावाने त्यांच्या देशातील व्यापारात चढ-उतार दिसून येतात.

### ५) सार्क राष्ट्रातील सहकार्याचा अभाव :

सार्क राष्ट्र हे परस्परांना पूरक उत्पादन करणारे राष्ट्र आहेत. त्यामुळे त्यांच्या देशात बहुतेक उत्पादन हे एक समान होत असल्यामुळे त्यांचे निर्यातीचे प्रमाण कमी व आयातीचे प्रमाण जास्त असल्यामुळे ते सार्क बाह्य राष्ट्राकडून औद्योगिक, धार्मिक व तांत्रिक तसेच जीवनावश्यक वस्तूंची मोठ्या प्रमाणात आयात करीत असल्यामुळे त्यांच्यातील व्यापारावर त्याचा मोठा प्रभाव पडत चालला आहे.

### ६) चोरटी आयात-निर्यात :

सार्क राष्ट्रांनी आर्थिक व व्यापारी संबंध दृढ करण्यासाठी साफ्टा कराराला मान्यता देऊन उदारीकरणाचे धोरण स्वीकारून आपल्या राष्ट्रीय सीमा खुल्या करून विविध नियम, अटी शिथिल केल्या आहेत. तसेच परस्परांना विविध क्षेत्रात सेवासुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यांच्या या बाबींचा लाभ घेऊन राष्ट्रातील सीमावर्ती भागात अवैध मार्गाने आयात-निर्यातीच्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे अधिकृत व्यापाराची आकडेवारी उपलब्ध होत नसल्यामुळे सार्क राष्ट्रातील व्यापारात घसरण आढळते.

### ७) कुशल मनुष्यबळाचा अभाव

सार्क राष्ट्रामध्ये निरक्षरतेचे प्र

उत्पादन, वितरण व पुरवठा यांत आर्थिक व त्यामागे राष्ट्रांना महत्त्वाच्या असलेल्या या क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळाची नितांत गरज असताना सार्क राष्ट्रांमध्ये याचा मात्र अभाव आहे. त्याचा परिणाम हा सार्क राष्ट्रातील उत्पादन मालासह आयात निर्यातीत होत असल्यामुळे सार्क राष्ट्रांतील व्यापार हा कार-नकारात्मक ठरलेला आहे.

८) नैसर्गिक आपत्ती :

सार्क राष्ट्रामध्ये वारंवार वेगवेगळ्या प्रकारच्या आपत्ती उद्भवत असतात. त्यात अगणित आर्थिक व मानवी हानी होत असल्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या अर्थव्यवस्था व पर्यायाने व्यापारावर होत असल्यामुळे सार्क राष्ट्रात दीर्घकाळ व्यापारात चढ-उतार होताना आढळतो.

**निष्कर्ष**

सार्क राष्ट्र हे विविध विचारधारा व शासन व्यवस्था असलेले राष्ट्र आहेत. त्यातच त्यांचे परस्परांशी अनेक मुद्यांवर मतभेद आहेत. त्यामुळे सार्कच्या व्यासपीठावर घेण्यात आलेल्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होताना आढळून येत नाही. तसेच सार्क ज्या हेतूने उदयास आलेलो आहे त्यांचे सार्क राष्ट्रांकडून पालन केले जात नाही. तसेच सार्क राष्ट्र परस्परांशी व्यापार करण्यापेक्षा सार्क बाह्य राष्ट्रांशी व्यापार करण्यास प्राधान्य देतात. सार्क राष्ट्रांना भांडवल गुंतवणुकीच्याही समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे भांडवल, गुंतवणूक करण्यास सार्क बाह्य राष्ट्रांना प्राधान्य देत असल्यामुळे सार्क राष्ट्रातील जागतिक व्यापाराच्या तुलनेने व्यापार कमी असून त्यात निर्यातीपेक्षा आयातीचे प्रमाण अधिक आहे.

**संदर्भ सूची**

१) Malhotra Gunjan, Indias Economics Cooperation with SAARC Countries, A.K. Publication, Shahadara, New Delhi, २०१३

२) Government of India, Miistry of Commerce and Industry, Dept. of Commerce, Yearly Report

३) सिंह लक्ष्मणजी, राष्ट्रीय रक्षा और सुरक्षा, प्रकाश बुक डिपो, बरेली, २००६

४) सार्क आपत्ती व्यवस्थापन केंद्र, नई दिल्ली अहवाल २०११

५) देवळाणकर शैलेंद्र, भारतीय परराष्ट्र धोरणे : सातत्य आणि स्थित्यंतर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००७

६) देसाई हेमंत, दै.प्रभात नवसंदेश, भारताचा शेजारील देशांसोबत व्यापार, ८ ऑगस्ट २०००

७) चौगुले प्रवीण, दै.लोकसत्ता, सार्कची ३० वर्षे, दि.८ डिसेंबर २०१६

24

# ललित गद्य : एक साहित्यप्रकार

सौ.तनुजा उल्हास ढेरे
[illegible]
[illegible]

*************

मराठी साहित्य परंपरेत ललित गद्य हा आधुनिक साहित्य प्रकार मानला जातो. अगदी पंचाहत्तर वर्ष जुना हा साहित्यप्रकार, सद्य परिस्थितीत या लेखन प्रकाराचा मागोवा घेतला तर इतर साहित्य प्रकाराच्या बरोबरीने हा साहित्यप्रकार स्वतःचे एक स्थान मराठी साहित्य वाङ्मयात निर्माण करत आहे. मराठीत ना. सी.फडके यांच्यापासून सुरू झालेली लघुनिबंधाची परंपरा पुढे वि.स.खांडेकर, अनंत काणेकर, दुर्गाबाई भागवत, शांता शेळके, अरुणा ढेरे अशा नामवंत साहित्यिकांनी या लेखनप्रकारात लेखन केले आहे. आनंद यादव यांनी संशोधनपर लेखन केले. त्या

108 / 188

यांनी यावर अभ्यासपूर्ण लेख
कवी, लेखकांनी हा लेखनप्र
असे असले तरी 'ललित गद्य' या साहित्यप्रकाराकडे तसे पाहिले तर फार गांभीर्याने पाहिले जात नाही. मराठीत विपुल म्हणावी अशी ललित गद्य साहित्याची निर्मितीही होत नाही असेही म्हटले जाते. पण का ? हा प्रश्न अभ्यास करताना नेहमीच पडतो. एक विद्यार्थी म्हणून ललित गद्याचा वाचक, व उपयोजक असताना अभ्यास करत असताना या साहित्यप्रकारावर समीक्षात्मक लेखन इतर साहित्य प्रकाराच्या तुलनेत कमी आढळून आले. मी ललितलेखनाकडे वळले ते आपसूकच पण लेखन करताना माझ्या मनात अनेक वेळा प्रश्न पडत असे ? या लेखनाला ललित गद्य का म्हणतात ? ललित गद्य म्हणजे काय ? लघुनिबंध म्हणजे काय ? ललित साहित्य म्हणजे काय ? आणि मग या प्रश्नातून सुरू झाला हा



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred Journal*

**June 2021 Volume-11 Issue-16**


## *Sustainable Development Goals: Initiatives, Execution and Challenges*


**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.)

**Guest Editor**
Dr. Prof. H. B. Rathod
Principal
Gramin (ACS) Mahavidyalaya, Vasantnagar (Kotgyal), Tal. Mukhed

**Executive Editors**
Dr. V. T. Naik
Mr. B. C. Rathod

**Co- Editors**
Dr. D. K. Kendre
Mr. S. A. Jewale
Dr. U. D. Padamwar











**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

| | | |
|---|---|---|
| 23 | शाश्वत कृषी विकास : एक भौगोलीक अभ्यास<br>प्रा.डॉ. विनकर विजय नागोजी | 89-90 |
| 24 | NPS एक संस्था – एक चिकित्सक अभ्यास<br>प्रा. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा | 91-93 |
| 25 | कोकणातील लाल सोनं - जांभा दगड (Laterite stone)<br>Tendolakar Dipa Dattaram | 94-96 |
| 26 | हदगाव भोकर तालुक्यातील साक्षरता प्रमाण<br>बोधने कविता केरबा | 97-100 |
| 27 | लिंगभाव व लिंगभेद असमानता सामाजिक समस्या: एक अभ्यास<br>प्रा.कदम करुणा लक्ष्मणराव | 101-102 |
| 28 | शाश्वत उपाय जलपुनर्भरण एक भौगोलिक अभ्यास<br>प्रो. डॉ. नाईक व्ही.टी., प्रा. देठे एस. के. | 103-105 |
| 29 | लिंगभाव समानता आणि साहित्य : स्त्री संतांचे समाज विकासातील योगदान<br>प्रा.डॉ.कविता चंद्रकांत सोहाळे | 106-109 |
| 30 | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार व सद्यस्थिती<br>प्रा.डॉ.सखाराम यशवंतराव गोरे | 110-112 |
| 31 | शाश्वत विकास आणि भारतातील ग्लोबल हंगर इंडेक्स<br>प्रा.रोहिणी निवृत्ती अंकुश | 113-116 |
| 32 | लिंग समभाव : काळाची गरज<br>प्रा. कांबळे शिवाजी ईरबा | 117-121 |
| 33 | अनुसूचित जातींच्या संकल्पनेचा विश्लेषणात्मक अभ्यास<br>प्रा.डॉ.वसंत तुकाराम नाईक नारायण हणमंतराव पांचाळ | 122-125 |
| 34 | चिरंतन विकास - एक भौगोलिक आढावा<br>प्रा.डॉ.अनिल निवृत्ती शिंदे | 126-130 |
| 35 | लातूर जिल्ह्यातील ग्राम्यांच्या बाजारकेंद्राचे व्यापारक्षेत्र एक भौगोलिक विश्लेषण<br>प्रा. डॉ. गोंड अमदेव संपतराव | 131-133 |
| 36 | समाजाच्या जडणघडणीत साहित्याची भूमिका एक अभ्यास<br>प्रा.डॉ.बालाजी परबतराव कराडे | 134-138 |
| 37 | लिंगभाव विरहित समाज रचना एक अभ्यास<br>पांचाळ नारायण हनमंतराव | 139-144 |
| 38 | दर्जेदार शिक्षण आणि वास्तव परिस्थिती<br>स.प्रा. भारतभूषण वामनराव बाळबुधे | 145-149 |
| 39 | नैसर्गिक व मानवी संसाधने एक अभ्यास<br>प्रा.डॉ.भरत माधवराव मुस्कावाड | 150-154 |
| 40 | शाश्वत विकासात जलसंवर्धनामध्ये 'आभासी पाणी' संकल्पनेचे महत्त्व<br>डॉ. नागनाथ माधवराव फड | 155-158 |
| 41 | प्राथमिक व माध्यमिक विद्यार्थ्यांचा भाषाविकास<br>कदम गणेश पुंडलिकराव, प्रा.डॉ.वैजयंता ना.पाटील | 159-163 |
| 42 | दुर्बल घटकांचे सबलीकरण ग्रामीण विकासाचा मार्ग (ग्रामीण विकास विभाग)<br>डॉ. संजय भास्कर ठावडे | 164-166 |
| 43 | भारत : शाश्वत वाढ आणि विकास<br>डॉ. हरी साधू वाघमारे | 167-171 |
| 44 | पर्यावरण संवर्धन काळाची गरज - एक चिकित्सक भौगोलिक अभ्यास<br>प्रा.डॉ. भाऊसाहेब सोनाजी रेडकर | 172-176 |


PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq Mukhed Dist Nanded

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN 2230-9578, 1June-2021, Volume-11, Issue-16.
Sustainable Development Goals Initiatives, Execution, & Challenges

# दर्जेदार शिक्षण आणि वास्तव परिस्थिती

स.प्रा. भारतभूषण वामनराव बाळबुधे
सैनिक विज्ञान विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमबाद, ता.मुखेड जि.नांदेड
E-male:bharatbal20@gmail.com

**प्रस्तावना :-**

भारतामध्ये गेल्या काही वर्षापासून सर्वच क्षेत्रामध्ये खाजगीकरण झपाट्याने चालू आहे. यामध्ये शिक्षण क्षेत्रसुद्धा अपवाद नाही. एकीकडे 6 ते 14 वर्षाखालील मुलाला दर्जेदार शिक्षण देण्याची घोषणा करावयाची तर दुसरीकडे शिक्षणाचे झपाट्याने खाजगीकरण केले जात आहे. तसेच विद्यार्थांची शाळेतील अल्प पट नोंदणी हे उदाहरण देऊन महाराष्ट्र शासनाने हजारो जि.प.शाळा बंद केल्या आहेत. तर खाजगी शिक्षण संस्थेचे पीक आले असून त्यामध्ये विद्यार्थ्यांना लाखो रूपये फी भरून शिक्षण घ्यावे लागत आहे. शासन एकीकडे 6 ते 14 वर्षापर्यंत मोफत व सक्तीच्या शिक्षणाची हमी देते तर दुसरीकडे जि.प.शाळा बंद केल्या जातात. अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाल्यामुळे शिक्षण व्यवस्थेसमोर अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

जागतिक स्तरावर प्राथमिक आणि पूर्व प्राथमिक स्तरावर शिक्षणाची सुरुवात कोणत्या वयापासून होते, याची दखल भारताने खरे तर शिक्षण हक्क अधिकार कायद्यात घेणे आवश्यक होते; परंतु कायदा तयार करताना यात वयाबरोबरच अनेक त्रुटी ठेवण्यात आल्या आहेत. सहा ते चौदा म्हणजेच पहिली ते आठवीपर्यंत शिक्षण दिले की, सरकारची जबाबदारी संपते, असा त्याचा थेट अर्थ होतो. यामुळेच गोंधळ निर्माण झाला आहे. अर्थाचा अनर्थ करून शिक्षणासाठीच्या निधीत केंद्र आणि त्यांच्या पावलावर पाऊल टाकणा-या राज्य सरकारनेही कोटय़वधी रुपयांच्या निधीत कपात केली आहे. यामुळे यंदाच्या आर्थिक वर्षात शिक्षण विभागाला साधारणपणे एकूण उत्पन्नाच्या केवळ दोन अडीच टक्क्यांच्या दरम्यानच निधी मिळण्याची शक्यता असल्याने शैक्षणिक विकास आणि योजनांचे वाटोळे होणार आहे.

जागतिक स्तरावर प्राथमिक शिक्षणाला खूप महत्त्व दिले जाते, याचा गंधही आपल्याला नाही. फिनलँड, चीन, इस्त्रल, जर्मनी, सिंगापूर इत्यादी देशातील शिक्षण व्यवस्था एका वेगळय़ा उंचीवर आहे. पूर्व प्राथमिक आणि प्राथमिकच्या शिक्षणासाठी निकष, त्यांच्याकडून पुरवण्यात येणा-या भौतिक, शैक्षणिक सुविधा आणि त्यांची संपन्नता जरी तपासून पाहिली तरी आपण कोसो मैल दूर असल्याचे दिसून येईल. युरोपीय देशात प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे आहे. या पार्श्वभूमीवर, सरकारकडून शिक्षण हक्क कायद्यात बदल करण्यासाठी जे प्रयत्न होणार आहेत, त्यासाठी युरोपीय देशातील बदलांकडे लक्ष देण्याची गरज आहे.

**संशोधन समस्या :-**

संशोधन समस्या ही संशोधनाची प्रथम पायरी आहे. त्यामुळे कोणतेही संशोधन कार्य हाती घेत असताना संशोधकाला संशोधनाची समस्या निश्चित करावी लागते. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात समाजाच्या जडणघडणीत दर्जेदार शिक्षण ही संशोधनाची समस्या निवडली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. भारतीय शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप जाणून घेणे.
2. दर्जेदार शिक्षणाची दिशा व दशा जाणून घेणे.
3. शिक्षण व्यवस्थेवर होणाऱ्या खर्चाचे स्वरूप जाणून घेणे.



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist.Nanded

**संशोधन पद्धती :-**

तथ्य संकलणाच्या अनेक पद्धती आहेत. परंतु मानव्यविद्या शाखेशी संबंधित असणारी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा प्रस्तुत संशोधनासाठी उपयोग करण्यात आला आहे.

**पाश्चिमात्य व भारतीय शिक्षणातील तफावत :-**

प्राथमिक शिक्षणासाठी युरोपीय देशांनी 70 व्या दशकात एक नवी रचना स्वीकारली. या रचनेनुसार, युरोपीय देशांत शिक्षणाची सुरुवात वयाच्या तिस-या वर्षापासून होते. तिस-या वर्षी फक्त भाषिक कौशल्यावर भर दिला जातो. तीन ते पाच वर्षाचा वयोगट हा पूर्व प्राथमिक स्तर म्हणून ओळखला जातो आणि प्राथमिक शिक्षण हे सहा ते अकरा या वर्षापासून सुरू होते तर पूर्व प्राथमिकचे शिक्षण हे १२ ते १६ या वर्षापर्यंत सुरू राहते आणि माध्यमिक शिक्षण हे १७ ते १९ या तीन वर्षापर्यंत सुरू राहते. पुढे २० ते २१ ही दोन वर्षे उच्च माध्यमिक आणि २२ ते २३ विद्यापीठीय व २४ ते २५ वर्षात संशोधन, प्रयोग, चिकित्सा करण्यासाठी विद्यार्थ्यांना शोध, संशोधनाचे शिक्षण दिले जाते. यात विशेष म्हणजे, विद्यापीठीय शिक्षण पूर्ण होईपर्यंत २० विद्यार्थ्यामागे प्रत्येकी एक शिक्षक हे धोरण असते आणि या धोरणाचे काटेकोरपणे पालनही केले जाते. अशा परिस्थितीत आपल्याकडील सुरू असलेल्या शाळांच्या नावाखाली एका-एका वर्गात ६० ते १०० मुले कोंबून या शाळांनी कोंडवाडे बनवले आहेत. यामुळे अशा या कोंडवाड्यातून कोणती गुणवत्ता आणि विकास करत आहोत, याचा विचार करण्याची गरज आहे.

'कॅग'नेही गुणवत्तेवर अनेक प्रश्न उपस्थित करून ३० हजार शिक्षकांच्या जागा रिक्त असल्याचे स्पष्ट केलेले आहे आणि राज्यातील हजारोंच्या संख्येने असलेल्या खासगी शाळांमध्ये एकही मान्यताप्राप्त आणि गुणवत्ताधारक शिक्षक नसताना त्याची थोडीही दखल शिक्षण विभाग घेत नाही. ज्या इंग्रजी शाळा पालकांकडून हजारो रुपयांचे शुल्क आकारतात, त्यातील शिक्षक हे कोणत्या दर्जाचे आहेत, यासाठी धोरण तर दूरच; पण साधी माहितीही घेतली जात नाही. अशा अवस्थेत केवळ शिक्षण हक्क अधिकार कायद्यात बदल करताना जर पूर्व प्राथमिक शिक्षणातील मुलांचीही सामाजिक जबाबदारी सरकारला घ्यावी लागेल. केवळ दर्जात सुधारणा करण्यासाठी इस्त्रायलसारख्या देशाशी करार करण्याऐवजी फिनलँड, सिंगापूर, जर्मनीमध्ये सुरू असलेल्या शिक्षण हक्काचा आणि मोफत शिक्षणाच्या रचनेचा विचार झाला तरच समाजातील प्रत्येक घटकाला दर्जेदार शिक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. अन्यथा गुणवत्तेच्या नावाखाली केवळ सरकारी आणि अनुदानित शिक्षण बंद करण्याचा उद्योग तेजीत येईल आणि यातून भांडवदारी व्यवस्थेचेच चांगभले होईल.

**शिक्षणावरील खर्च :-**

| 2017 ते 2020 दरम्यान शिक्षणावरील खर्चाची तरतूद | | |
|---|---|---|
| अ. क्र. | वर्ष | शिक्षणावरील खर्चाची तरतूद |
| | 2017-18 | 3.92 |
| | 2018-19 | 3.76 |
| | 2019-20 | 3.02 |



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed Dist.Nanded

**2017 ते 2020 दरम्यान शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण दर्शविणारा स्तंभालेख**




वरील स्तंभालेखाचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, 2017 नंतर प्रत्येक वर्षी केंद्र शासनाने शैक्षणिक खर्चात कपात केलेली दिसून येते. या संदर्भात शिक्षणतज्ज्ञ हेरंब कुलकर्णी म्हणाले की, "सरकारने सकल उत्पन्नाच्या किमान 6 टक्के जीडीपीच्या शिक्षणावर खर्च करण्याची घोषणा केली. मात्र, प्रत्यक्षात सरकारने बजेटमध्ये शिक्षणावरील खर्चात 6 टक्के कपात केली. नवीन शैक्षणिक धोरणात ज्या घोषणा केल्या त्यासाठी काहीच तरतूद केली नाही. यावरून शिक्षण धोरणाविषयी सरकार गंभीर नाही असं दिसतंय. 15000 आदर्श शाळा सुरू करण्याचे धोरण चुकीचे आहे. शिक्षणाची अशी केवळ बेटं उभारून शिक्षण सुधारत नाही, उलट संपूर्ण व्यवस्था सुधारण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. शिक्षणतज्ज्ञ भाऊसाहेब चासकर यांच्या मते, "शिक्षणासारख्या अत्यंत महत्त्वाच्या विभागासाठीची तरतूद वर्षागणिक कमी कमी केली जात आहे. यातून सरकारी शिक्षण व्यवस्थेसमोर अनेक अडथळे उभे राहिले आहेत. सरकारी शाळा अनुदानित शाळा महाविद्यालये आर्थिक अडचणीत असताना त्यांना आर्थिक बळ देण्यासाठी प्रयत्न होत नाहीत. भरीव आर्थिक तरतूद केल्याशिवाय गरीब घरातली मुलं कशी शिकणार? शिक्षणाकडे दुर्लक्ष करून 'बेटी बचाव बेटी पढाव' ही घोषणा कृतीत कशी येईल? सरकारी शाळा तसेच अनुदानित शाळा महाविद्यालये यांच्यासाठी ही धोक्याची घंटा आहे. म्हणूनच ही गंभीर आणि त्याहून जास्त काळजीची गरज आहे." मानव विकास अहवाल दरवर्षी प्रसिद्ध होतो. मार्च २०१७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालात भारताचा क्रमांक १८८ देशांत १३१ वा होता. त्याच्या आधीच्या वर्षी तो १३० वा होता. श्रीलंका, मालदीव यांसारखे देशही भारताच्या पुढे आहेत. मानव विकासाचा निर्देशांक आणि विषमता यांचा एकत्रित विचार केल्यास भारताची घसरण होत असल्याचे दिसते.

महाराष्ट्र हे देशात प्रगत मानले जाते. महात्मा फुले, गोपाळकृष्ण गोखले याना सक्तीच्या मोफत शिक्षणाचा उद्गार महाराष्ट्रातून केला असला आणि शाहू महाराजांनी फुले यांचे विचार अमलात आणले असले, तरी आज शिक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्र मागे पडतो आहे. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हा आर्थिक व सामाजिक विकासाचा पाया आहे, हे सर्वमान्य तत्त्व आहे व या क्षेत्रात महाराष्ट्र कोठे आहे हे पाहणे उपयुक्त ठरेल! सन २०१३-१४ मध्ये केंद्र सरकारने सर्व राज्यांचा शिक्षण विकास निदर्शक जाहीर केला होता. त्यात महाराष्ट्राचा क्रमांक 13 वा होता. गुजरात, पंजाब, केरळ, कर्नाटक ही राज्ये आणि काही केंद्रशासित प्रदेश महाराष्ट्राच्या पुढे होती. या पार्श्वभूमीवर राज्याला शिक्षणाच्या बाबतीत पुढे नेण्यासाठी, भरीव गुंतवणूक करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद होण्याची आवश्यकता होती. मात्र, तसे होताना दिसत नाही. २०१५-१६ मध्ये खेळ, शिक्षण यांसाठी ४०,०६३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. यंदा म्हणजे २०१८-१९ मध्ये राज्य सरकारने ही तरतूद ५१,५६५ कोटी रुपये इतकी केली आहे. २०१५-१६ पेक्षा ती २८ टक्क्यांनी,



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

तर आधीच्या म्हणजे २०१७-१८ पेक्षा ती केवळ ५.५ टक्क्यांनी अधिक आहे. महागाईचा वाढता दर लक्षात घेतल्यास वाढ झालेलीच नाही, असे म्हणावे लागेल. राज्याच्या एकूण उत्पन्नापैकी शिक्षणावरील खर्च २०१५-१६ मध्ये १.५२ टक्के होता, तर २०१८-१९ मध्ये तो १.८४ टक्के झाला. याचाच अर्थ सरकार शिक्षणावरील खर्च कमी करीत आहे. अपुऱ्या शैक्षणिक सुविधा, अनुदान न देणे, शाळा बंद करणे, खासगी शिक्षक-शिक्षकेतरांची भरती न करणे, क्रीडा-शिक्षक शिक्षकांची पदे न भरणे या सर्व समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळेच अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राची शैक्षणिक कामगिरी खालावत चालली आहे.

राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रमाणात होणारा खर्च, दरडोई खर्च आणि शिक्षणाच्या विविध पातळीवर होणारा खर्च प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, महाविद्यालयीन तसेच व्यावसायिक उच्च शिक्षण. स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे झाली तरीही अन्न, वस्त्र, निवारा, बिजली, सडक आणि पाणी हेच प्रश्न जर चघळले जात असतील तर शिक्षण आणि आरोग्य या मुद्द्यांना प्राधान्य कसे मिळेल? शिक्षणावर केलेला खर्च जरी वाढत असेल तरी राष्ट्रीय उत्पन्नाच्या प्रमाणात बघितले तर विकसित देशांपेक्षा हा खरच कमीच दिसेल. तसेच दरडोई खर्च बघितला तर तोसुद्धा कमी दिसेल. तरतूद जरी कमी असली तरी भारतात डोकीच इतकी आहेत आणि ती ज्या वेगाने वाढत आहेत त्याचा विचार करता दरडोई खर्च हा फारच कमी दिसतो. वस्तुस्थिती अशी आहे की प्राथमिक शिक्षणावर होणारा दरडोई खर्च आणि उच्च शिक्षणावर होणारा दरडोई खर्च ह्यात खूप तफावत आहे. प्राथमिक शिक्षणावर गरजेपेक्षा कमी खर्च केला जातो. याशिवाय जो निधी शिक्षणासाठी म्हणून खर्च केला म्हणून सांगितला जातो तो प्रत्यक्ष शिकणे आणि शिकवणे या कार्यांवर खर्च केला जात नाही. केंद्रसरकार मधून तांदूळ देणार आणि राज्यसरकार मीठ, हळद आणि मसाले यांचा खर्च करून मुलांना शाळेत जी खिचडी दिली जाते तो खर्च शिक्षणावर केला जातो असे म्हणणे योग्य वाटत नाही.

सारांश :-

एकंदरीत भारतामध्ये शिक्षणाचे झालेल्या बाजारीकरणामुळे शिक्षण क्षेत्र हे केवळ नफा बनविण्याचे साधन बनले आहे. कारण दर्जेदार शिक्षणाच्या नावाखाली वेगडी इंग्रजी माध्यमांच्या इमारती आणि खाजगी शिकवणी यांचे जोरदार पीक आले आहे. त्यामुळे शासन वर्ष निहाय शिक्षणावरील खर्चाची तरतूद कमी कमी करत आहे. दर्जेदार शिक्षणासाठी अर्थसंकल्पात निश्चित तरतूद व ध्येय-धोरण निश्चित केली नाहीत. त्यामुळे मोफत, सक्तीचे आणि दर्जेदार शिक्षण हे केवळ सामान्य नागरिकांच्या डोळ्यात धूळ फेकण्याचे प्रकार चालले आहेत.

निष्कर्ष :-

1. भारतीय शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप पारंपरिक ते जागतिकीकरणाच्या दृष्टिकोनातून मागासलेले दिसून येते.
2. समकालीन स्थितीचा विचार करता दर्जेदार शिक्षणाच्या ध्येय-धोरणाची दिशाच चुकीची आहे.
3. इतर देशाचा शिक्षणावर होणाऱ्या खर्चाच्या प्रमाणात भारताचा शिक्षणावरील खर्च तुलनेने फार कमी आहे. तसेच शेजारील देशांपेक्षाही भारताचे स्थान खालचे आहे.

संदर्भग्रंथ:-

1. प्रभाकर बीरकर, प्रतिमा बीरकर (2007). उदयोन्मुख भारतीय समाजाचे शिक्षण व शिक्षक पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे
2. दत्तात्रेय तापकीर, निर्मला तापकीर (2002). शिक्षणाचे तात्त्विक व समाजशास्त्रीय अधिष्ठान, नित्य नूतन प्रकाशन, पुणे
3. विश्वंबर कुलकर्णी, विनायक रामचंद्र मिताडे (2007). भारतीय आधुनिक शिक्षण समस्या आणि उपाय, श्री विद्या प्रकाशन, पुणे



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq. Mukhed Dist. Nanded

Swami Vivekanand Mahavidyalaya, Mukramabad

4. सुरेश करंदीकर, मीना मंगरूळकर, (2002). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन, कोल्हापूर
5. अरविंद दुनाखे (2007). उदयोन्मुख भारतातील समाज, शिक्षण व शिक्षक, नित्य नूतन प्रकाशन, पुणे
6. शांता मालेगावकर (2007). आजचे शिक्षण: एक वास्तव, विद्यार्थी साहाय्यक समिती, पुणे
7. बी. बी. पंडित, नलिनी पाटील, लता मोरे (2005), शिक्षक शिक्षण पिंपाळापुरे अँन्ड के पब्लिशर्स, नागपूर

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq. Mukhed Dist.Nanded

Peer reviewed Journal Impact Factor: 7.265 30-9578

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred Journal*

**July 2021 Volume-11 Issue-27**



## *Impact of Environment on Agriculture, Health, Water Resources, Social Life & Industrial Development*



**Chief Editor**
**Dr. R. V. Bhole**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon

| Executive Editors | Executive Editors | Executive Editors |
|---|---|---|
| Dr. M. N. Kolpuke<br>Principal,<br>Maharashtra Mahavidyalaya, Nilanga | Dr. S. S. Patil<br>Principal,<br>Maharashtra College of Pharmacy, Nilanga | Dr. E. U. Masumdar<br>Principal,<br>Azad Mahavidyalaya, Ausa |

Co- Editors

Dr. B. N. Paul, Dr. C.J. Kadam, Prof. T. A. Jahagirdar, Dr. Naresh Pinamkar
Dr. C. V. Panchal, Dr. Nisar Syed, Mr. Santosh P Mane







**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102



| | | |
|---|---|---|
| 25 | हवामान बदल आणि कृषीचा शाश्वत विकास<br>Mr. Shankar Sudamrao Pawar | 87-91 |
| 26 | जल पुनर्भरण : काळाची गरज<br>डॉ. बंडे मोहन शंकरराव | 92-97 |
| 27 | दुष्काळ आणी शेतकरी आत्महत्या<br>डॉ प्रवीण भास्करराव हुडे | 98-101 |
| 28 | जलव्यवस्थापनाचा इतिहास<br>Priyanka Gore, Girish More, Mahesh Pawar, Ganesh Choudhari | 102-105 |
| 29 | यवतमाळ जिल्ह्यातील मुलभूत वस्तुवरील किंमतीवर कोविड-19 चा परिणाम<br>प्रा.कविता आर. किर्दक | 106-107 |
| 30 | पर्यावरण आणि नीतिशास्त्र<br>प्रा.बदनाळे शिवरुद्र शरणप्पा | 108-109 |
| 31 | पर्यावरणाचा मानवी जीवनावर प्रभाव<br>डॉ. किरण शिवाजीराव पाईकराव | 110-112 |
| 32 | हवामान बदलाचे होणारे परिणाम एक अभ्यास<br>भारतभूषण वामनराव बाळबुधे | 113-117 |
| 33 | दुष्काळजन्य परिस्थितीचे साहित्यातील चित्रण<br>डॉ.एकनाथ वैजनाथ भिंगोले | 118-122 |
| 34 | हवामान बदल आणि त्यांचे दुष्परिणाम एक अभ्यास<br>डॉ.नामदेव कोंडबाराव दळवी | 123-127 |
| 35 | जागतिक कोरोना महामारी एक अभ्यास<br>पवार विलास भाऊराव | 128-131 |
| 36 | पर्यावरण संवर्धन काळाची गरज<br>डॉ.भरत माधवराव मुस्कावाड | 132-135 |
| 37 | महाराष्ट्रातील कोरोना विषाणू आणि वास्तव परिस्थितीचा आढावा<br>पांचाळ नारायण हनमंतराव | 136-141 |
| 38 | भारतीय जलविकासाचे अभियंता: डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>डॉ. बी.आर. गायकवाड | 142-143 |
| 39 | महाराष्ट्रातील जल व्यवस्थापनाचे स्वरूप आणि उपाययोजना : एक चिकित्सक अभ्यास<br>प्रा. मोटे भैरवनाथ बबुवान | 144-146 |
| 40 | शिवकालीन गडकिल्ल्यांचे जलव्यवस्थापन<br>डॉ. सुभाष बेंजलवार | 147-149 |
| 41 | पर्यावरण नियोजन तथा प्रबंधन<br>डॉ.श्वेता एन.दवे | 150-157 |
| 42 | जलव्यवस्थापन व त्याचे महत्व – एक ऐतिहासिक दृष्टीकोन<br>Dr.Prakash Pawar | 158-161 |
| 43 | पर्यावरण परिवर्तन एवं प्रभाव<br>डॉ.शिल्पा एम बाला | 162-167 |
| 44 | कोविड - १९ चा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम<br>प्रा. डॉ. सुनील सुखदेव लोखंडे | 168-170 |
| 45 | "सागाचे पर्यावरणीय महत्व : एक अवलोकन"<br>डॉ. जयदीप रामकृष्ण सोळंके | 171-175 |
| 46 | रेणापूर नगरातील जलव्यवस्थापन : एक शोध<br>डॉ.नारायण सुर्यवंशी | 176-179 |
| 47 | भारतातील बेरोजगारी: समस्या व उपाय<br>डॉ. सुरेश बिबकराव सामाले | 180-183 |
| 48 | दुष्काळजन्य परिस्थितीचे साहित्यातील चित्रण : विशेष संदर्भ मराठी कादंबरी<br>प्रा. डॉ.गजानन अनंता देवकर | 184-187 |
| 49 | भारतातील लिंग संबधित विकास निर्देशांक एक अध्ययन<br>अशोकराव नरसिंगराव चिते | 188-192 |
| 50 | आधुनिक कृषी विकासामुळे निर्माण होणाऱ्या समस्या<br>डॉ. कळसकर सूर्यकांत नागनाथ | 193-196 |
| 51 | दुष्काळ या कथेतील शेतकरी कुटुंबाचे जीवन :एक चिंतन<br>प्रा. डॉ. धिरजकुमार सत्यकाम कोतमे | 197-199 |




PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed Dist.Nanded

Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 20 July-2021, Volume-11, Issue-27
Impact of Environment on Agriculture, Health, Water Resources, Social Life & Industrial Development

# हवामान बदलाचे होणारे परिणाम एक अभ्यास

भारतभूषण वामनराव बाळबुधे
सैनिक विज्ञान विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रामबाद, ता.मुखेड जि.नांदेड
E-male:bharatbal20@gmail.com

**प्रस्तावना :-**

वातावरणातील बदलांचे दृश्य परिणाम आता जगभर जाणवू लागले असून त्यांची गांभीर्याने दखल घेऊन योग्य उपाययोजना करण्याचे महत्त्व दिवसेंदिवस अधिकाधिक स्पष्ट होत चालले आहे. जंगलांना लागणाऱ्या वणव्यांमध्ये होत असलेली वाढ, उष्णतेच्या लाटा, महापूर, भूकंपांचे धक्के, ज्वालामुखींचे उद्रेक, विविध चक्रीवादळांचे तडाखे, समुद्रात उसळणाऱ्या अवाढव्य उंचीच्या लाटा आणि प्राणी-पक्षी यांच्या संख्येत होत चाललेली घट या सगळ्याला प्रदूषण कारणीभूत आहे, ही बाब आता सर्वमान्य झाली आहे. याला आणखी एका आंतरराष्ट्रीय संस्थेच्या अभ्यासकांनी केलेल्या संशोधनातून दुजोरा मिळाला आहे. हिंदू कुश हिमालय परिसरातल्या चार देशांतील तेरा गावांमध्ये वाढत्या प्रमाणात पाणी असुरक्षिततेला तोंड द्यावे लागत आहे. 'वॉटर' या जर्नलमध्ये हा अभ्यास अलीकडेच प्रसिद्ध झाला आहे. या गावांमध्ये भारतातल्या पाच गावांचा समावेश आहे. मसुरी, देवप्रयाग, कॅलिम्पॉंग, दार्जिलिंग आणि सिंगटम ही ती पाच गावे होत. प्रचंड पाणी उपलब्ध असलेल्या ऐन हिमालयीन प्रदेशातल्या गावांमध्ये पाणीटंचाई जाणवणे ही भीषण घटना मानली जात असून यामागे हिमालयाचा शहरी भाग कोरडा पडत जाणे, हे कारण असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. 'मॅपिंग चॅलेंजेस फॉर अॅडप्टिव्ह वॉटर मॅनेजमेंट इन हिमालयन टाऊन्स' असे या अभ्यासाच्या अहवालाचे शीर्षक असून अंजल प्रकाश हे या अहवालाचे एक संपादक आहेत. शिवाय आयपीसीसीच्या ओशन अँड क्रायोस्फिअर या अभ्यासाचे ते प्रमुख लेखकही आहेत. त्यांच्या मते, सिमल्यासह हिमालयातल्या आणि इतर डोंगराळ भागातल्या सर्वच गावांना हे निकष सारख्याच प्रमाणात लागू होतात. काठमांडूतल्या इंटरनॅशनल सेंटर फॉर इंटिग्रेटेड माऊंटन डेव्हलपमेंट (आयसीआयएमओडी) तर्फे हा अभ्यास हाती घेण्यात आला. आयसीआयएमओडी हे आंतरसरकारी मंडळ असून या मंडळाचे सदस्य असलेल्या आणि हिमालयाचा प्रदेश असलेल्या आठ देशांसाठी काम करते. भारत, अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, चीन, म्यानमार, नेपाळ आणि पाकिस्तान हे ते आठ देश होत. पाण्याची उपलब्धता, पाणीपुरवठा यंत्रणा आणि झपाट्याने होणारे शहरीकरण तसेच पाण्याच्या दैनंदिन तसेच मोसमी मागणीत सातत्याने होणारी वाढ यांच्यातला अन्योन्य संबंध या अभ्यासातून समोर आला आहे. पाण्याच्या मागणीतल्या वाढीला लोकसंख्यावाढीबरोबरच या भागात येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत होत असलेली वाढही कारणीभूत आहे. हिमालयाच्या परिसरातल्या सुमारे तीन चतुर्थांश शहरी भागातली लोकसंख्या 50 ते 100 टक्के पाणीपुरवठ्यासाठी झऱ्यांवर अवलंबून आहे. या अभ्यासानुसार 2050 पर्यंत पाण्याची मागणी आणि पुरवठा यातील तफावत दुपटीने वाढेल. या अभ्यासात पाण्याची मागणी आणि पुरवठ्यातली तफावत, उपलब्ध जलस्रोत आणि वातावरणातल्या बदलांची आव्हाने या घटकांचे प्रामुख्याने विश्लेषण करण्यात आले. त्यानुसार या अभ्यासात असा निष्कर्ष काढण्यात आला आहे की, या संपूर्ण परिसरातील झरे, तळी, सरोवरे, कालवे आणि नद्या यांसारख्या जलस्रोतांची अवनती होत असून पाणी वाहून नेणारे दगडी मार्ग, विहिरी आणि पाण्याच्या स्थानिक टाक्या यांसारख्या पारंपरिक पाणी यंत्रणांमधले पाणी झपाट्याने कमी होत आहे. या ठिकाणी एक बाब लक्षात घेण्यासारखी आहे की, हिमालयामध्ये जगात सर्वात जास्त पाऊस पडत असून त्या ठिकाणी पाणीटंचाई निर्माण होत असेल तर हवामान बदलाचे येणाऱ्या काळात गंभीर परिणाम दिसून येतील.



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

**संशोधन समस्या :-**

संशोधन समस्या ही संशोधनाची प्रथम पायरी आहे. त्यामुळे कोणतेही संशोधन कार्य हाती घेत असताना संशोधकाला संशोधनाची समस्या निश्चित करावी लागते. त्यामुळे प्रस्तुत संशोधनात हवामान बदलाचे होणारे परिणाम एक अभ्यास ही संशोधनाची समस्या निवडली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. हवामान बदलाच्या कारणांचा शोध घेणे.
2. हवामान बदलाचा इतर घटकांवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.
3. हवामान बदलाच्या उपाय योजनाचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :-**

तथ्य संकलनाच्या अनेक पद्धती आहेत. परंतु मानव्यविद्या शाखेशी संबंधित असणारी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा प्रस्तुत संशोधनासाठी उपयोग करण्यात आला आहे.

**तापमान बदलामुळे मानवावर काय परिणाम होतील?**

तापमान वाढीमुळे पिण्याच्या पाण्याचा तुटवडा निर्माण होईल, अन्नधान्य निर्मितीच्या प्रक्रियेत बदल होईल, नैसर्गिक आपत्ती, वादळं, दुष्काळ, उष्ण वाऱ्याच्या लहरीत होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण वाढेल. तापमान बदलामुळे निसर्ग बेभरवशाचा होईल इतकंच आता सांगता येईल पण एखादी घटना हवामान बदलाशी जोडणं हे क्लिष्ट आहे. येणाऱ्या काळात पर्जन्यमान वाढू शकतं पण त्याचबरोबर उन्हाळ्यात दुष्काळ पडण्याची भीती देखील व्यक्त केली आहे. समुद्राची पातळी वाढणं आणि वादळांमुळे पुराची स्थिती नेहमी तयार होऊ शकते. असं असलं तरी ज्या त्या भागानुसार हे बदल आपल्याला दिसतील. प्राणी आणि वनस्पतींची भवतालातील बदलाशी जुळवून घेण्याची जी क्षमता आहे त्याहून तीव्र गतीने बदल होताना दिसतील. त्यामुळे वन्य पशू आणि वनस्पतींच्या अनेक प्रजाती नष्ट होतील. मलेरिया, दूषित पाण्यामुळे निर्माण होणारे आजार आणि कुपोषणामुळे लाखोंच्या संख्येनं बळी जाऊ शकतात असा इशारा जागतिक आरोग्य संघटनेनं दिला आहे. कार्बन डायऑक्साईडच्या उत्सर्जनात वाढ झाली तसे समुद्रातल्या कार्बन डायऑक्साईडचं प्रमाण वाढले आहे. त्यामुळे समुद्राचं आम्लाचे प्रमाण वाढले आहे. हे आम्ल वाढल्यामुळे समुद्रातील जीवसृष्टीला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे कोरल रीफ (प्रवाळ) संकटात आहेत. कोरल रीफच्या अस्तित्वासाठी कॅल्शियमयुक्त सांगाडा तयार होणं आवश्यक असतं पण समुद्रातील रासायनिक बदलांमुळे ते काम कठीण झालं आहे. पृथ्वीच्या वातावरणाचा अभ्यास करण्यासाठी तसेच तापमानाबद्दल भाकितं करण्यासाठी कम्प्युटर मॉडल्सचं सहकार्य घेतले जाते. पण वातावरणातील संवेदनशीलतेनुसार हे मॉडेल्स बदलतात. कारण वातावरणाचे उष्ण होणे किंवा थंड होणे हे कार्बन डायऑक्साइडच्या स्तरावर अवलंबून आहे. आणि वातावरणातले कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण हे कमी जास्त होत असतं. जागतिक तापमानवाढीमुळे काही बदल घडतील. त्यामुळे पृथ्वीचं तापमान आणखी वाढेल. जसे की आर्टिकमध्ये गोठलेल्या किंवा घन स्वरूपात असलेला मिथेन हा ग्रीनहाऊस गॅस वितळेल. याला पॉझिटिव्ह फीडबॅक म्हणतात. पण निगेटिव्ह फीडबॅकमुळे तापमानवाढीचे संतुलन बिघडू शकते. कार्बन सायकलचा एक भाग म्हणून पृथ्वीवरील काही स्रोत कार्बन डायऑक्साईड शोषून घेतात. भूमी आणि समुद्रात कार्बनची देवाण घेवाण चालते. या प्रक्रियेला निगेटिव्ह फीडबॅक म्हणतात.

**हवामान बदलाचे पीकनिहाय परिणाम :-**

**द्राक्ष**

9 फेब्रुवारी रोजी शून्यानजीक पोचलेल्या नीचांकी तापमानामुळे व आठवडाभर अतिथंडीने द्राक्ष पिकाचे मोठे नुकसान झाले. राज्यातील नाशिक, सांगली, सोलापूर, नगर, पुणे या द्राक्ष उत्पादक जिल्ह्यांतील 30 टक्के



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq Mukhed Dist.Nanded

द्राक्षाची काढणी अद्याप बाकी आहे. गतवर्षीच्या तुलनेत दर 30 ते 40 टक्क्यांनी कमी आहेत. या वर्षी डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यापासून थंडी वाढण्यास सुरुवात झाली. जानेवारी महिन्यात किमान तापमान सहा ते सात सेल्सिअसच्या दरम्यान राहिल्याने सफेद वाणांच्या फुगवणीवर व साखर निर्मितीवर विपरीत परिणाम झाला. त्यामुळे द्राक्ष हंगामही लांबला. ज्या भागात [illegible] झाला, त्या भागातील बागा अतिथंडीला प्रामुख्याने बळी पडल्याचे दिसून आले. गोडीवरही थंडीचा परिणाम झाला. कमी गोडीमुळे बिहार, दिल्ली, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, जम्मू-काश्मीर येथील बाजारपेठेतील मागणी घटली. परदेशात ढाका (बांगलादेश), काठमांडू (नेपाळ), मलेशिया, हाँगकाँग, दुबई, रशिया या देशांत काळ्या रंगाच्या द्राक्षांना चांगला प्रतिसाद मिळाला; मात्र युरोपमध्ये इंग्लंड, जर्मनी येथे दर वर्षीच्या तुलनेत 30 टक्के मालाचा उठाव झाला. द्राक्षमालाच्या निर्यातीवर या वर्षी मोठा परिणाम झाला. हा सर्व हवामान बदलाचाच परिणाम असल्याने शेती क्षेत्रावर आणि द्राक्ष बागायतदारांच्या अर्थकारणावर होणाऱ्या परिणामाचा विचार शासन पातळीवर होणे गरजेचे आहे.

**ऊस**

*मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तापमानात घट झाल्याने कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिम भागातील हिरवेगार उसाचे पीक वाळू लागले. आजरा तालुक्यातील वाटंगी, सिरसंगी, एमेकोंड, चितळे, शेळप या परिसरातील सुमारे 100 एकर क्षेत्रावरील ऊस पिकास मोठा फटका बसला. थंडीमुळे या परिसरातील खोडवा पिकाची वाढ खुंटल्याचे आढळून आले. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात किमान तापमानात मोठे चढ-उतार पाहावयास मिळाले. ज्या कोरडी आणि थंड वारे यामुळे उसाची सुरळी वाळणे, पानावर डाग पडणे अशा स्वरूपाचे परिणाम दिसून उसाचे पीक वाळू लागले. साधारणपणे 1 मार्च ते 4 मार्च या कालावधीत किमान तापमान 8.4 ते 9.5 सेल्सिअस म्हणजेच 10 सेल्सिअसपेक्षा कमी होते. यावरून 48 ते 72 तास हवेचे दिवसाचे व रात्रीचे तापमान कमी राहिल्यास असे परिणाम होत असून, ऊस पीक किमान तापमानास संवेदनक्षम असल्याचे अनुमान निघते.*

**घोसाळी - दोडका**

किमान तापमानास संवेदनक्षम असणारी ही दोन्ही पिके आहेत. या दोन्ही पिकांवर थंडीचा मोठा परिणाम झाल्याने बाजारात पिकांचे उत्पादन दिसत नाही. यावरून थंड हवामानाचा वेलवर्गीय पिकांवर मोठा परिणाम होतो हेच अनुमान निघते.

**काकडी**

गेले दोन महिने काकडीचे थंड हवामानामुळे नुकसान झाले. बाजारात काकडीचा मागणीनुसार पुरवठा होत नाही. थंडीमुळे लागवड केलेले बियाणे अथवा रोपे वाढू शकली नाहीत.

**आंबा**

या वर्षी कोकणातील हापूस आंब्यावर फुलकिडीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला असून, मोहराचे नुकसान झाले आहे. किडीची पैदास वाढण्यास हवामान अनुकूल ठरले असून, देशावर आणि मराठवाड्यात या किडीचा प्रादुर्भाव वाढणे शक्य आहे, त्यासाठी उपाययोजना करावी.

**प्राण्यावर होणारे परिणाम**

हवामान बदलाच्या दुष्परिणामांपासून पशुपक्षीसुद्धा सुटले नाहीत. काही भागात 45 अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमान वाढल्याने गाभण जनावरांचा गर्भपात झाल्याचे दिसून आले आहे. तसेच जनावरांच्या हृदयाचे ठोके वाढणे, श्वासोच्छ्वासाचा वेग वाढणे, भूक मंदावणे, जनावरांची हालचाल मंदावणे, उन्हाळ्यात हगवणीचे प्रमाण वाढणे, प्रजोत्पादनात 20-25 टक्के घट होणे असे परिणाम दिसण्यास सुरुवात झाली आहे. तसेच शेळ्या-मेंढ्यामध्ये लोकर गळणे आणि कोकरांचा मृत्युदर वाढणे अशा परिणामांनाही सुरुवात झाली आहे. या बदलामुळे रोग आणि कीड निर्मितीस पोषक ठरेल अशी परिस्थिती निर्माण होते. वनस्पतींच्या पृष्ठभागावरील प्रकाशाची तीव्रता, तापमान,



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya

आर्द्रता असे घटक वनस्पतींच्या योग्य वाढीसाठी एकत्रित परिणाम दाखवत नाहीत. उदा. फळपिकांतील पिकांची वाढ पूर्ण वाढत नाही आणि वेळा तसेच थोडे कमी लागते. काही ठिकाणी रब्बी ज्वारीतील पावसामुळे महिने होऊन पाने मान-पिवळी पडतात आणि वाळतात. त्यामुळे ज्वारीचा उतारा कमी आला. फळपिकांमध्ये फुलोरा आणि फळगळीचे प्रमाण असाधारणरित्या वाढले. आतापर्यंत बऱ्यापैकी नियंत्रण मिळवले गेलेले किरकोळ नुकसान करणाऱ्या वर्गात मोडणारे कीड आणि रोग आता भरपूर प्रमाणात नुकसान करत आहेत. तसेच नियंत्रण करणाऱ्या औषधांनामुद्धा ते दाद देत नाहीत.

**जागतिक तापमान वाढीचे कारणे :-**

1. जगाच्या वाढत्या लोकसंख्येमुळे कार्बन डाय-ऑक्साइडच्या उत्सर्जनाचे प्रमाण वाढत आहे.
2. सूर्यकिरणांची दाहकता वाढल्यास जागतिक तापमान वाढ होण्याची शक्यता असते. परंतु सध्याच्या परिस्थितीत सूर्य किरणांचे उत्सर्जन हे नेहमीप्रमाणे आहे. किरणांची दाहकता कमी जास्त झाल्यास त्यावेळचे जागतिक तापमान कमी जास्त होते. दीर्घकालीन दाहकता कमी अथवा जास्त झालेली नसल्याने सध्याच्या तापमान वाढीस हरितगृह परिणामच जबाबदार आहे.
3. ज्वालामुखीच्या उत्सर्जनाने देखील जागतिक तापमान बदलू शकते. त्यांचा परिणाम तापमान कमी होण्यात देखील होऊ शकतो. कारण वातावरणातील धूलिकणांचे प्रमाण वाढते जे अतिनील किरणे (Ultraviolet Rays) शोषून घेण्यात कार्यक्षम असतात.
4. पेरू व चिली देशांच्या किनारपट्टीवर हा परिणाम दिसतो. विषुववृत्तालगत पाण्याखालून वाहणारा प्रवाह कधी कधी पाण्यावर येतो. असे झाल्यास पृथ्वीवरील हवामानात मोठे बदल होतात व त्याचा परिणाम जागतिक तापमान वाढीवरही होतो. एल्-निनो परिणामामुळे मोसमी वाऱ्यांना अवरोध निर्माण होऊन भारतात दुष्काळ पडतो. एल्-निनो परिणामामुळे पृथ्वीवर १ ते ५ वर्षापर्यंत सरासरीपेक्षा जास्त तापमान नोंदवले जाऊ शकते. मागील एल्-निनो परिणाम १९९७ – ९८ साली नोंदवला गेला होता.
5. औद्योगिक क्रांती घडल्यावर फार प्राचीन काळी गाडल्या गेलेल्या जंगलांचा मानवाने इंधन म्हणून मोठ्या प्रमाणावर वापर सुरू केला. कोणताही कार्बनी पदार्थ जाळला की त्यातून कार्बन डाय-ऑक्साइडची निर्मिती होते. त्याप्रमाणे लाकूड आणि दगडी कोळसा जाळल्यानंतर वातावरणात कार्बन डाय-ऑक्साइडचे प्रमाण वाढू लागले. दगडी कोळसा जाळला जात असताना कार्बन डाय-ऑक्साइड वायूबरोबर काही कोळशामध्ये असलेल्या गंधक आणि त्याची संयुगे यांच्या ज्वलनाने सल्फर डाय-ऑक्साइडही हवेत मिसळू लागला. विसाव्या शतकात कोळशाबरोबर खनिज तेल आणि इंधन वायूंच्या ज्वलनामुळे निर्माण होणाऱ्या कार्बन डाय-ऑक्साइडची भर पडली. नैसर्गिक तेल आणि वायू इतक्या मोठ्या प्रमाणावर वापरले जाऊ लागले की वातावरणात कोळसा जाळून जमा होणाऱ्या कार्बन डाय-ऑक्साइडमध्ये भर पडून हरितगृह परिणाम वाढू लागला.

**हवामान बदल थांबवण्यासाठीची उपाय योजना :-**

1. घरगुती उर्जा कार्यक्षमता ही हवामान बदलाच्या अथक वाटचालीची गती कमी करण्यासाठी तुम्ही घेऊ शकता. लाइट बल्ब फ्लुरोसेंट्स किंवा एलईडीमध्ये बदलले जाऊ शकतात आणि इलेक्ट्रॉनिक डिव्हाइस वापरात नसताना प्लग इन केले जातात (जर आपण केशरचनेच्या मानकाची मालकी घेतली असेल तर, यामुळे तुमची चिंता अगदी कमी होईल).
2. आपण सौर, वारा किंवा जलविद्युत सारख्या क्लिनर उर्जा स्रोतावर स्विच करू शकत असल्यास आपल्या उपयुक्तता प्रदात्यास हे विचारणे योग्य आहे. ही त्यांनी ऑफर केलेली सेवा नसल्यास आपण त्यांची विनंती



PRINCIPAL
Swami Vivek... Mahavidyalaya

करू शकता. सोशल मीडियावर फोन कॉल करा, ईमेल पाठवा, त्यांना @ टॅगमध्यामुळे बदलाच्या स्वतंत्र प्रक्रिया सुकर होते.

3. गोमांसाच्या संगोपनाशी संबंधित मिथेन उत्सर्जन आणि जंगलतोड केल्यामुळे गोमांस उद्योग हा हवामान बदलाचा एक प्रचंड चालक आहे. शक्य असेल तेथे प्रयत्न करून पहा आणि टाळण्यासाठी किंवा दिवसातून कमीतकमी एक मांस-मुक्त जेवण करण्याचा प्रयत्न करा.
4. पृथ्वीवरील चांगल्यासाठी (आणि, पृथ्वीवरील स्वतःच दीर्घायुष्य) पृथ्वीवर नेव्हिगेट करण्याचे अनेक मार्ग आहेत. व्यवसायांनी स्वच्छ आणि अधिक पर्यावरणास अनुकूल व्हिडिओ कॉन्फरन्सिंगसाठी ट्रान्सअटलांटिक प्रवास अदलाबदल करण्याचा विचार केला पाहिजे.
5. लँडफिल मिथेन आणि सीओ 2 तयार करतात, जे आधी चर्चा केल्याप्रमाणे ग्रीनहाऊस गॅस उत्सर्जनाच्या 14% बनते. त्याऐवजी, पुनर्वापराचे बिन किंवा कंपोस्ट ढीग निवडा जेणेकरून कचराकुंड्यांची संख्या कमी होईल ज्यायोगे लँडफिल्समध्ये अनावश्यकपणे पुचकी मिळते. दरम्यान, प्लास्टिकचा अनावश्यक वापर थांबविण्यासाठी लॉबिंग कंपन्या मदत करू शकतात. याचा अर्थ असा नाही की स्वतः या दोषी कंपन्यांकडे साखळदंड उभे राहणे आवश्यक नाही - सोशल मीडिया हे एक शक्तिशाली साधन आहे, ज्यात स्टेन ड्रॉ टिकाव यासारख्या खात्यांमुळे हिरव्या क्रियेत वाढ होते.
6. ग्रीनपीस, वुडलैंड ट्रस्ट किंवा पर्यावरण लॉ फाउंडेशन सारख्या वकिलांच्या गटांसह पर्यावरणीय बदलांसाठी मोहीम राबविणे या कारणासाठी अत्यंत दृश्यमान आणि अमूल्य योगदान देते.

**निष्कर्ष :-**

1. हवामान बदलण्याच्या कारणाचा शोध घेतला असता यामध्ये यामध्ये जंगल तोड, कंपन्या, कारखाने, वाहने, हवाई जहाज, मोठी धरणे, रस्ते, हरितगृह वायू इत्यादी घटकांमुळे हवामानात बदल होत आहे.
2. भारत हा कृषी प्रधान असल्यामुळे हवामान बदलाचा सर्वात जास्त ऱ्हास कृषी क्षेत्राचा झाला आहे. हवामान बदलामुळे तापमाणात झालेली वाढ ही सजीव व निर्जिव घटकांसाठी हाणीकारक ठरली आहे.
3. हवामानाचे संतुलन राखण्यासाठी जंगलाचे संवर्धन करण्यासाठी नवीन वृक्ष लागवड करणे, कंपन्या, कारखाने, वहाने प्रदुषण मुक्त करणे, हरितगृह वायूला आळा घालणे महत्वाचे आहे.

*संदर्भग्रंथ सूची :-*

1. *रोबोक ऍलन, ज्वालामुखी और वायुमंडल, अमरिकी भौतिक संघ, वाशिंग्टन डीसी, 2003*
2. *जलवायु शोध समिति, राष्ट्रीय शोध परिषद 2004*
3. *www.wikipedya.org*
4. *Joseph J. Romm, Climate Change, 2016.*
5. *Naomi Klein, This Changes Everything : Capitalism vs. the Climate, Canada*
6. *लोकमत ३१ मार्च २०१२*

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq. Mukhed Dist Nanded

2021-2022

जानेवारी - 2022



MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

**Special Issue**
**01 January 2022**

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले
-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

158

Date of Publication
01 January 2022

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

www. विद्यावार्ता .कॉम
YouTube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

The Views expressed in the published articles, Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. *Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

*If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.*

Indexed

IMPACT FACTOR 7.940 IIJIF

Govt. of India, Trade Marks Registry Regd. No. 2611690

http://www.printingarea.blogspot.com



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

January 2022
Special Issue

07

159

13) आदिवासी क्रांतिवीर बिरसा मुंडा — अभ्यासपूर्ण चरित्रग्रंथ
डॉ. सखाराम डाखोरे, जि. पालघर ||50

14) धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींचे सांस्कृतिक जीवन
डॉ. शरद बाबुराव सोनवणे, जि.धुळे ||54

15) आदिवासी साहित्य परंपरेचा इतिहास
प्रा.डॉ. एकनाथ भिंगोले, जि. नांदेड ||60

16) A Case Study of the Role of Birsa Munda As a Great Indian Freedom Fighter
Dr.Phole Kamal Bhaurao, Dist. Nanded ||63

17) Movements of Tribal Communities in India (Before and After Independence)
Prof.Dr.Dalve D. R., Dist- Ahmednagar ||68

18) आदिवासी समाजासाठीच्या योजना आणि अमंलबजावणी
प्रा. मनोहर शामराव वागतकर, अकोला ||72

19) आदिवासी समाज : दशा आणि दिशा
प्रा. पंडित त. काळे, अमरावती ||75

20) उच्च प्राथमिक स्तरावरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या स्व-संकल्पना विकासासाठी राबविता येणाऱ्या ...
श्रीमती.कामिनी रामदास पवार & डॉ.श्री.संजय शालकराव शिंदे, नंदुरबार ||77

21) लोकशाहीची सत्तर वर्ष
प्रा.डॉ. वंदना माहुरे, औरंगाबाद ||79

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

Swami Vivekanand Mahavidyalaya, Mukramabad Ta. Mukhed Dist. Nanded

# आदिवासी साहित्य परंपरेचा इतिहास.

प्रा.डॉ.एकनाथ भिंगोले
मराठी विभाग
स्वामी विवेकानंद महाविद्यालय,मुक्रमाबाद
ता.मुखेड जि.नांदेड.

भारतात विविध धर्म, जाती, वंश, भाषा, बोली, परंपरा आणि संस्कृतीचे लोक राहतात. त्यामुळे भारतीय समाजात विविधता आहे. भारतीय समाजात विविध प्रकारचे लोक राहत असले तरीही भारतात वास्तव्य करणारी प्रत्येक व्यक्ती ही भारतीय आहे. म्हणूनच भारतात राहणाऱ्या समाजास भारतीय समाज म्हटले जाते. भारतीय समाज विविध जाती-जमातींमध्ये विभागला गेला आहे. विविध जातींप्रमाणेच अनेकविध आदिवासी जमातीसुद्धा भारतात वास्तव्यास आहेत.

## आदिवासींचा अर्थ

इंग्रजीतील 'Tribes' या शब्दाचा अर्थ 'जमात' किंवा 'जमाती' असा होतो. आदिम काळापासून जंगलात किंवा दऱ्याखोऱ्यात राहणारे लोक म्हणजे आदिवासी होय. भारतीय संविधानात आदिवासींना 'अनुसूचित जमाती' असे संबोधले आहे. अनुसूचित जमातीमध्ये डोंगराळ प्रदेशात आणि जंगलात वास्तव्य करणाऱ्या आणि जे आधुनिक संस्कृती तसेच जीवनपद्धती पासून अलिप्त आहेत अशा लोकांचा समावेश केला आहे.

## व्याख्या

'आदिवासी कोणाला म्हणावे?' या प्रश्नाचे अचूक उत्तर शोधण्यासाठी विविध मानवशास्त्रज्ञांनी व अभ्यासकांनी आदिम समाजाच्या केलेल्या व्याख्या विचारात घेणे आवश्यक आहे.

१) गिलीन आणि गिलीन - "एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षरओळख नसलेल्या स्थानीय गटाच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात."

२) डॉ.रिव्हर्स - "जमात किंवा आदिवासी हा एक सरळ साधा सामाजिक समूह आहे. ज्यातील सदस्य एका समान बोलीभाषेचा वापर करतात व युद्ध वगैरे सारख्या उद्देशपूर्तीकरिता एकत्रित कार्य करतात."

थोडक्यात, एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणारा आणि समान जीवनपद्धती असणारा तसेच तांत्रिक ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला समाज म्हणजे आदिवासी समाज होय.

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Ta.Mukhed.Dist.Nanded

भारताच्या विविध प्रदेशात जवळपास ५५० आदिवासी जमाती वास्तव्य करतात. उदा. कोया, भिल्ल, गोंड, कोलाम, गदबा, गारो, खासी, काचरी, बैगा, बंजारे, मुंडा, कोरवा, संथाळ, उराँव, वारली, कोळी, ठाकूर, कमार, कोत, कुरूमन, पनियन, तोंड, चेंचू, येरव, बोंदो, जतपूस, भोट, कातकरी, हे, गड्डी, गुर्जर आणि लांब इत्यादी.

१९५१ ते २००१ या कालखंडात आदिवासींची लोकसंख्या उत्तरोत्तर वाढतच गेली आहे. २००१ च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या ८ कोटी ४३ लाख इतकी आहे. भारतातील एकूण लोकसंख्येच्या ८.२० टक्के आदिवासी आहेत. तर महाराष्ट्रात त्यांची संख्या ८५ लाख ७७ हजार २७६ इतकी होती. महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येच्या ८.८५ टक्के आदिवासी आहेत.

कोणत्याही देशाचा विकास व्हावयाचा असेल तर प्रत्येक समाजाचा विकास होणे आवश्यक आहे. एखादा समाज मागासलेला असेल तर त्या देशाची प्रगती होणे अशक्य आहे. भारतातील ग्रामीण, नागरी, आदिवासी समाजाला योग्य न्याय दिल्याशिवाय सर्वार्थाने प्रगती करणे शक्य आहे. भारतातील कोणत्याही समाजात काही मूलभूत सामाजिक समस्या आहेत. तशाच समस्या आदिवासींच्या आहेत. परंतु नागरी व ग्रामीण भागाच्या तुलनेत आदिवासींच्या समस्येचे स्वरूप भिन्न-भिन्न आहे. म्हणून येथे आदिवासींच्या समस्यांचा विचार करण्यात आला आहे.

१) **दारिद्र्याची समस्या** - आदिवासी समाजाची दारिद्र्य ही एक अत्यंत महत्त्वाची समस्या आहे. एकूण आदिवासींमध्ये ८५ टक्के लोक आजही दारिद्र्य रेषेखाली जीवन जगतात. दारिद्र्य ही आर्थिक समस्या आहे. व्यक्तीला मिळणाऱ्या अत्यल्प उत्पन्नामुळे ही समस्या निर्माण होते. उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांचा जीवनमानावर होणारा खर्च कमी होतो. त्यामुळे अशा व्यक्तींचा जीवनस्तर खालावलेला असतो. कोणत्याही समाजात दारिद्र्याने प्रवेश केला की त्यातून उपासमारी, गुन्हेगारी, घटस्फोट, भिक्षावृत्ती, वेश्यावृत्ती व बालगुन्हेगारी वाढते. दारिद्र्य ही एक आर्थिक समस्या नाही तर ती एक सामाजिक समस्यादेखील आहे. भारतातील ७ टक्के आदिवासी अजूनही प्रारंभिक अवस्थेतील जीवन जगतात. जीवनाचा एक न्यूनतम स्तर टिकवून ठेवण्यासाठी व्यक्तीला अन्न, वस्त्र व निवारा या गोष्टी आवश्यक असतात.

२) **सामाजिक समस्या** - आधुनिक समाजाच्या संपर्कामुळे आविासी समाज ढवळून निघाला. आदिवासींच्यात न्यूनगंडाची भावना निर्माण झाल्यामुळे त्यांच्या जीवनातील मानवी मूल्यांचा त्यांनी त्याग केला. श्रीमंत जमीनदार, धर्मप्रसारक, हिंदू लोकांचा आदिवासींशी संपर्क आल्यामुळे आदिवासींच्या जीवनात बदल घडू लागले. वन्य जीवन जगणाऱ्या आदिमांना बाह्य जगातील लोकांबद्दल आदर वाटू लागला. आदिवासींच्या मनात त्यांच्याबद्दल श्रेष्ठत्वाची भावना निर्माण झाली. आदिवासींनी सभ्य लोकांच्या

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad To.Mukhed.Dist.Nanded

रीतिरिवाजांचा आणि जीवनपद्धतीचा स्वीकार केला. त्यातून आदिवासी विफल बनले व पुन्हा परंपरागत जीवन जगू लागले. आदिवासींच्या जीवनात सामाजिक विस्कळीतपणा निर्माण झाला. त्यातून त्यांची एकत्वाची भावना संपली व त्यांच्यात द्वेष, मत्सर निर्माण झाला. बाह्य संपर्कामुळे आदिवासींच्या वैयक्तिक जीवनात वादळ उठले. आदिवासींची स्वतंत्र बोलीभाषा होती ती आता इतर भाषेचे अनुकरण करताना दिसून येतात. बाह्य जगाच्या संपर्काने आदिवासी समाजाच्या वेषभूषेत बदल होत आहेत. तसेच आदिवासी समाजात बालविवाहाची व वधूमूल्याची पद्धती नव्हती. सुधारलेल्या समाजाशी त्यांचा संपर्क आल्यामुळे त्यांच्यात बदल होत गेला.

३) **सांस्कृतिक समस्या** - भारतातील सर्व आदिवासी एकाच वंशाचे नाहीत. त्यांच्यात वांशिक विविधता आढळून येते. त्याचप्रमाणे सर्व आदिवासींची संस्कृती सारखी नाही. आदिवासी समाजात भौगोलिक, वांशिक, भाषिक, आर्थिक आणि सामाजिक भिन्नता आढळते. त्यामुळे त्यांच्यात सांस्कृतिक विविधता असणे साहजिक आहे. भारताच्या विविध प्रदेशात राहणाऱ्या आदिवासी जमाती जशा भिन्न-भिन्न आहेत तसेच त्यांची संस्कृतीही भिन्न-भिन्न आहे. इतकेच नाही तर एकाच प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या आदिवासींची संस्कृतीही वेगळी आहे. जे लोक ग्रामीण व शहरी समुदायाच्या संपर्कात आलेत त्यांच्या संस्कृतीमध्ये व संपर्कात न आलेल्या आदिवासींच्या संस्कृतीमध्ये फरक आढळून येतो. भिल्ल व नागा जमातींचे लोक बाह्य संस्कृतीच्या संपर्कात आले असले तरी त्यांनी आपली प्राचीन संस्कृती जतन करून ठेवली आहे. तर काही आदिवासी बाह्य संस्कृतीच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या परंपरा, प्रथा, कला, नृत्य, वाद्य इत्यादी बदल होत असल्याचे दिसून येते.

४) **व्यसनाधीनता** - ही आदिवासी समाजातील आणखी एक समस्या आहे. त्यामुळे आदिवासी खरोखरच अगतिक झाले आहेत. सर्व आदिवासी जमातच व्यसनी असते. आदिवासी जमातींना व्यसनमुक्त होण्याची मुभा नसते. त्यामुळेच ते दारिद्रयाच्या दुष्टचक्रात सापडले आहेत. व्यसनाधिनता ही आदिवासी समाजाला लागलेली कीड आहे. अगतिकता, गुलामी वृत्ती, शारीरिक अनारोग्य, मानसिक दौर्बल्य आणि दारिद्र्य इत्यादी सर्व प्रश्नांचे मूळ आदिवासींच्या व्यसनाधीनतेतच दडलेले आहे.

५) **आरोग्यविषयक समस्या** - आदिवासींच्या समस्यांपैकी आणखी एक गंभीर समस्या म्हणजे आरोग्यविषयक समस्या. आदिवासी ही एक वनात किंवा जंगलात राहणारी जमात. परंतु आधुनिक युगात आदिवासी समाज प्रगत समाजाच्या संपर्कात आला. त्यामुळे प्रगत समाजाची वेषभूषा त्यांनी स्वीकारल्याचे दिसून येते. आदिवासी समाज आधुनिक काळात सुती कपडे घालू लागले. पण दारिद्रय हे त्यांच्या पाचवीला पूजलेले असल्याने त्यांना अधिक कपडे खरेदी करणे शक्य नसते. एकच कपडा अंगावर अनेक दिवस परिधान केल्याने कपडे अस्वच्छ होतात व त्यामुळे त्यांना अनेक रोगांना बळी पडावे लागते.

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad To.Mukhed Dist.Nanded

आदिवासींच्या दारूनिर्मितीवर सरकारने बंदी घातली. मांरा-मारो, ताडमाडाची दारू यामुळें त्यांना योग्य जीवनसत्वे मिळत होती. याला आदिवासी कायमचे मुकले. कारखान्यात तयार झालेल्या दारूने आदिवासींच्या शरीरावर अनिष्ट परिणाम होऊ लागले. आदिम समाजात काही अनिष्ट प्रथा व श्रद्धा प्रचलित आहेत. आरोग्यविषयक उपचाराची सोय असूनही त्याचा ते उपयोग करून घेताना दिसून येत नाहीत. उद्योग क्षेत्राच्या आसपास राहणाऱ्या आदिवासींना एक भयंकर आरोग्यविषयक संकट आले आहे. आदिवासींच्या गरिबीचा फायदा घेऊन आदिवासी स्त्रियांना वेश्यावृत्तीचा स्वीकार करण्यास भाग पाडले जाते. त्यामुळे आदिवासी स्त्रियांना गुप्तरोगाची लागण होण्याचे प्रमाण वाढले आहे.

६) **शेतीसंबंधीची समस्या -** आदिवासी समाजाकडे असलेले जमिनीचे क्षेत्र अत्यंत कमी आहे. आदिवासींच्या जमिनीतून येणारी पिके पावसाच्या पाण्यावर अवलंबून असतात. पावसाच्या लहरीपणामुळे पिकांचे नुकसान झाले तर त्यांचे अर्थचक्र एकदम कोलमडते. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची पाळी येते. त्यातून अनेक समस्या उद्‌भवतात. उदा. रोगराई, कुपोषण इत्यादी. बालक व गर्भवती यांना सकस व पुरेसा आहार मिळत नाही. त्यामुळे नंदूरबार जिल्ह्यातील खडकी (धडगांव), चिखलदरा, धारणी व वावरवांगणी या ठिकाणी कुपोषणाचे बळी जात आहेत.

७) **निरक्षरतेची समस्या -** भारतात २००१ च्या जनगणनेनुसार केवळ ४७.१० टक्के आदिवासी साक्षर होते. याचाच अर्थ ५२.९०टक्के आदिवासी हे निरक्षर आहेत. निरक्षरता हे त्यांच्यातील अज्ञान, शोषण, दारिद्र्य आणि मागासलेपणाचे सर्वात महत्त्वाचे कारण आहे. त्यांच्यात असलेल्या अशिक्षितपणामुळे शासनाच्या ज्या विविध योजना आहेत त्यांना त्याचा फायदा घेता येत नाही. म्हणूनच ते स्वत:चा विकास करून घेऊ शकत नाहीत.

८) **कर्जबाजारीपणाची समस्या -** जंगलात व दऱ्याखोऱ्यात राहणारे आदिवासी निसर्गाने समृद्ध बनविलेले संतुष्ट जीवन जगत होते. त्यांच्या मूलभूत गरजांची पुर्तता नैसर्गिक संपत्तीवर पूर्ण होत असत. प्रामाणिक, समाधानी व शोषणमुक्त जीवन ते जगत असत. परंतु बाह्य लोकांचा त्यांच्याशी संपर्क वाढल्यावर त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला. धनदांडग्यांनी आदिवासींच्या जमिनी व्याजाच्या पैशावर बळकावल्या. आदिवासी क्षेत्रात बँका नाहीत आणि तालुक्याच्या गावात बँका असल्या तरी आदिवासी बँकेत जात नाहीत. बँकाचा लेखी व्यवहार पूर्ण झाल्याशिवाय बँका कर्जपुरवठा करीत नाहीत. त्यामुळे आदिवासी समाज नाइलाजास्तव सावकाराच्या दारात कर्जासाठी उभा राहिला व तो कर्जबाजारी होत गेला. अत्यल्प उत्पन्न, नैसर्गिक संकट, जोडधंद्याचा तुटवडा, महागाई, अज्ञानपणा इत्यादींमुळे तो कर्जबाजारी होतो आहे.

PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed.Dist.Nanded

९) **प्रतिकूल शासनामुळे निर्माण झालेल्या समस्या -** आदिवासींच्या गरजा नीट समजून न घेता शासनाने अवलंबिलेले धोरण हे निश्चितच सदोष होते. ठक्करबाप्पा व डॉ.मजुमदार यांनी आदिवासींचे जीवन विस्कळीत होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणून प्रतिकूल शासनाचा उल्लेख केला आहे.

थोडक्यात, जगात असा कोणताच समाज नाही की ज्यांच्या कोणत्याच समस्या नाहीत. मानवी समाजात सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक आणि राजकीय समस्या असतात. प्रत्येक समाजातील समस्यांचे स्वरूप आणि त्या समस्यांची तीव्रता यात फरक असतो. ग्रामीण व नागरी समुदायापेक्षा आदिवासींच्या समस्या वेगळ्या आहेत. आदिवासींच्या समस्या विस्तृत व जटिल आहेत यात मुळीच शंका नाही.

**संदर्भ**


१) डॉ.प्रदीप आगलावे-आदिवासी समाजाचे समाज़शास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पाचवे पुनर्मुद्रण, २०१२

२) प्रा.गुरूनाथ द. नाडगोंडे-भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती २००३

३) डॉ.दिलीपसिंह निकुंभ / डॉ.रणजित आठवले-मानवाधिकार आणि मूल्यशिक्षण, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्र.आ. २०१४

४) महाराष्ट्रातील आदिवासी, सुगावा प्रकाशन, पुणे

५) कोळंबे रंजन-मानव संसाधन विकास आणि मानवाधिकार, भगीरथ प्रकाशन, पुणे


PRINCIPAL
Swami Vivekanand Mahavidyalaya
Mukramabad Tq.Mukhed Dist Nanded